

अधिक एक बरोबर बीज एक अधिक एक बरोबर कोंब एक अधिक
बरोबर मळ एक अधिक तीन बरोबर खोड एक अधिक चार बरोबर
एक अधिक पाच बरोबर फूल एक अधिक सहा बरोबर फळ एक
सात बरोबर वृक्ष बरोबर साहित्य चित्र नाट्य नृत्य संगीत
वाणिज्य काव्य ,
मॉडर्न ७८

PROGRESSIVE EDUCATION SOCIETY'S

# MODERN COLLEGE OF ARTS, SCIENCE & COMMERCE POONA 5.

**Our Faculty 1977-78**

## Heads of the Departments

| | | |
|---|---|---|
| 1. Prof. M. B. Limaye, Principal | M. Com. | Business Administration |
| 2. Prof. L. H. Gadgil, Vice-Principal | M.Sc., Ph.D. | Chemistry |
| 3. Prof. B. B. Kulkarni, Vice-Principal | M. A., Ph.D. | Marathi |
| 4. Prof. S. Y. Gambhir | M. Sc. | Physics |
| 5. Prof. P. S. Chirputkar | M.Sc. (Maths) M.Sc. (Stats) | Mathematics and Statistics |
| 6. Prof. S. Y. Paranjape | M.Sc., Ph. D. | Biology |
| 7. Prof. S. R. Raykar | M. A., D. F. E. | English |
| 8. Prof. M. S. Mahajan | M. A. | Economics |
| 9. Prof. S. G. Datar | B. A., M.Com. | Commerce |
| 10. Prof. (Mrs.) S. S. Vanarase | M.A. Ph.D. | Psychology |
| 11. Prof. P. D. Apte | M. A. | Geography |
| 12. Prof. S. N. Navalgundkar | M.A., Ph.D. | Political Science |
| 13. Prof. M. R. Bhave | B.Com., F.C.A. | Accountancy |
| 14. Prof. P. D. Parkhi | M.Sc. I.C.W.A. | Cost Accounting |

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे ...

**मॉडर्न कला, शास्त्र व वाणिज्य महाविद्यालय शिवाजीनगर, पुणे ५.**

**संपादन समिती**

प्राचार्य मो. भा. लिमये, **अध्यक्ष**
उपप्राचार्य ल. ह. गाडगीळ, **उपाध्यक्ष**
उपप्राचार्य भीमराव कुलकर्णी, **उपाध्यक्ष**

प्रा. श्री. दा. संगोराम, **सदस्य**
प्रा. म. रा. मराठे, **सदस्य**
प्रा. सु. व्यं. धायगुडे, **सदस्य**
प्रा. सौ. हेमा लेले, **सदस्य**
प्रा. जयंत जोरवेकर, **सदस्य**

विलास सातभाई, **विद्यार्थि प्रतिनिधी**
स्मिता पुंडले, **विद्यार्थि प्रतिनिधी**

# मॉडर्न ७८


संपादक
सीताराम रायकर

मुखपृष्ठ
विनोद गोडसे

मुद्रक
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय, पुणे ३०.

ठसे
सुप्रीम प्रोसेस, पुणे ३०.

प्रकाशक
प्राचार्य मो. भा. लिमये,


**मॉडर्न कला, शास्त्र व वाणिज्य महाविद्यालय शिवाजीनगर, पुणे ५.**

## श्रद्धांजली

पु. शि. रेगे
ग. दि. माडगूळकर
भवानीशंकर पंडित
सुमित्रानंदन पंत
महाकवी कुरूप
हमीद दलवाई
केसरबाई केरकर
उदय शंकर
पंकज मलिक
चार्ली चॅप्लिन
प्रभाकर गोरे
बाळाचार्य खुपेरकर शास्त्री
प. ल. वैद्य
अनंतशयनम् अय्यंगार

महाराष्ट्रात बँकिंगचा पाया घालणारे, महाराष्ट्राच्या शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक जीवनाशी कायावाचामने एकरूप झालेले **श्री. सी. व्ही. जोग तथा अण्णासाहेब** यांचे दिनांक २७ सप्टेंबर १९७७ रोजी दुःखद निधन झाले.

कै. जोगांचा प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीशी गेली ४० वर्षे घनिष्ठ संबंध होता. मृत्युसमयी ते संस्थेचे उपाध्यक्ष ( व्हाइस प्रेसिडेंट ) होते. मॉडर्न महाविद्यालयाच्या उभारणीत त्यांनी जातीने लक्ष घातले होते. त्यांनीच महाविद्यालयाच्या इमारतीच्या बांधकामाकरिता सवलतीने कर्ज उपलब्ध करून दिले होते.

त्यांच्या निधनाने महाविद्यालयाचा आणि प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचा एक आधारस्तंभ नाहीसा झाला आहे.

# संपादकीय

मॉडर्न महाविद्यालयाचे हे आठवे वर्ष. १९७० मध्ये सुरू झालेले आपले महाविद्यालय पहिल्या दशकाकडे यशस्वीपणे वाटचाल करीत आहे. या आठ वर्षांत महाविद्यालयीन शिक्षण पद्धतीत मूलगामी ठरतील अशी कित्येक स्थित्यंतरे झाली. या सर्व स्थित्यंतरांना सामोरे जाऊन, त्यांना आपलेसे करून, एवढेच नव्हे तर अनेक वैशिष्ट्यपूर्ण पायंडे पाडून महाविद्यालय आज अतिशय सुस्थिर आणि समृद्ध स्वरूपात उभे आहे. पुण्यात असलेल्या महाविद्यालयात आणखी एकाची भर असे न होता विद्येच्या या माहेरघरातील एक दर्जेदार शिक्षण देणारे महाविद्यालय म्हणून सर्वांनी या महाविद्यालयाकडे पाहिले पाहिजे या ईर्षेने प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीने या महाविद्यालयाची स्थापना केली आणि गेल्या आठ वर्षांत महाविद्यालयाने केलेल्या प्रगतीमुळे हा विश्वास सार्थ असल्याचे सिद्ध झाले आहे. पहिल्या वर्षी ७०७ विद्यार्थी असलेल्या आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थी संख्या आज तीन हजारांवर गेली आहे. प्राध्यापकांची संख्या २८ वरून ७० पर्यंत गेली आहे. अकरावी कला, शास्त्र, वाणिज्य वर्गापासून पदव्युत्तर वाणिज्य वर्गापर्यंतचे शिक्षण देण्यात येते. अशा प्रकारे १९७० साली अंकुरलेल्या बीजाचे आज अनेक शाखा असलेल्या पूर्णोन्नत वृक्षात रूपांतर झाले आहे.

शिक्षणसंस्थांमधील संख्यावाढ आणि गुणवत्ता यांचे नाते व्यस्त असते असे सर्वसामान्यपणे मानले जाते परंतु मॉडर्न महाविद्यालयाने आपण या बाबतीत अपवाद आहोत हे दाखवून दिले आहे. गेल्या आठ वर्षांत या महाविद्यालयातील तिन्ही शाखांमधील विद्यार्थ्यांनी सातत्याने विद्यापीठीय परीक्षांमध्ये पहिल्या दहांत क्रमांक संपादन केले आहेत. अचूक व कठोर नियोजन आणि नियोजनाची व्यवस्थित आणि शिस्तबद्ध कार्यवाही यांच्या जोरावर संख्यावृद्धी आणि गुणात्मकता यांचा मेळ बसू शकतो हे दाखवून दिले आहे. महाविद्यालयाची संख्यात्मक व गुणात्मक वाढ होत असतानाच आर्थिक व सामाजिक परिस्थितीने मागासलेल्या विद्यार्थ्यांच्याकडे आमचे विशेष लक्ष आहे. या विद्यार्थ्यांच्यासाठी वर्षाच्या सुरुवातीला व दुसऱ्या सत्रामधे

विशेष तयारी वर्गांचे आयोजन आम्ही यंदा केले. यातून आलेला अनुभव लक्षात घेऊन पुढील वर्षापासून महाविद्यालयात प्रवेश घेतल्यापासून सातत्याने अशा उजळणी व विशेष तयारी वर्गाचे नियोजन आम्ही करणार आहोत व अशा सर्व विद्यार्थ्यांना सर्वतोपरी सहाय्य करण्याचा प्रयत्न करणार आहोत.

**कनिष्ठ महाविद्यालयात अकरावीचे वर्ग सुरू**

पूर्वीच्या शासकीय धोरणानुसार अकरावी माध्यमिक शाळांकडे आणि बारावी महाविद्यालयाकडे अशी काहीशी चमत्कारिक विभागणी झाली होती. कनिष्ठ महाविद्यालयांचे घटक म्हणून अकरावी, बारावी यांचे वर्ग सलगपणे, संघटितपणे चालविणे आवश्यक आहे ही गोष्ट शासनाने वेळीच लक्षात घेऊन महाविद्यालयांना अकरावीचे वर्ग सुरू करण्याची परवानगी दिली. परंतु अकरावी बारावी चे वर्ग दिल्यामुळे इमारत-विस्तार, प्रयोगशाला व ग्रंथालय विस्तार अपरिहार्य झाला आहे. याबाबत शासनाने आवश्यक ते अनुदान तावडतोब उपलब्ध करून दिले पाहिजे. तसेच अनुदान संहितेत जरूर ते बदल केले पाहिजेत. अन्यथा महाविद्यालयांना या वर्गाचा अपेक्षित दर्जा टिकवण्यात अनेक आर्थिक व व्यवस्थापकीय अडचणी येण्याचा संभव आहे. त्यानुसार यंदा महाविद्यालयात कला, शास्त्र आणि वाणिज्य या तीनही शाखांचे अकरावीचे वर्ग सुरू करण्यात आलेले आहेत. यंदा अकरावीच्या ६ तुकड्यातून व १२ वीच्या १० तुकड्यांतून १४०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शालान्त ( दहावी ) परीक्षेत उत्तम यश मिळविलेले पुण्यातील व पुण्याबाहेरील अनेक विद्यार्थी आमचे महाविद्यालयात यंदा ११ वी मध्ये शिकत आहेत. दहावीच्या परीक्षेत सर्व महाराष्ट्रात १५ व्या क्रमांकाने उत्तीर्ण झालेला कुमार गणपुले याने आमचे महाविद्यालयात ११ वी वाणिज्य विभागात प्रवेश घेतला आहे.

**पदव्युत्तर विभागाची सुरुवात**

१९७७-७८ या शैक्षणिक वर्षापासून महाविद्यालयात एम् कॉम ( भाग १ ) चे वर्ग सुरु करण्यात आले. आणि अशा रीतीने महाविद्यालयातील वाणिज्य शाखेचा पदव्युत्तर विभागापर्यंत विकास झाला आहे. गेल्या सात आठ वर्षात वाणिज्य शाखेच्या अनेक विद्यार्थ्यांनी विद्यापीठ पातळीवर प्रथम श्रेणीचे यश मिळवलेले आहे. त्यामुळे पदवी शिक्षण यशस्वीरीत्या देणाऱ्या आमच्या महाविद्यालयाचे पदव्युत्तर शिक्षण देणाऱ्या महाविद्यालयात रूपांतर होणे ही आमच्या महाविद्यालयाची नैसर्गिक वाढ म्हणावी लागेल. महाविद्यालयात पदव्युत्तर केंद्र सुरु होणे ही आम्हास अभिमानास्पद गोष्ट होय.

आमच्या या एम् कॉम वर्गाचे प्रमुख वैशिष्ट्य हे की महाराष्ट्रातील कोणत्याही विद्यापीठात एम् कॉमच्या पातळीवर संख्याशास्त्र शिकविण्याची नसलेली सोय आम्ही आमच्या महाविद्यालयात पदव्युत्तर स्तरावर करीत आहोत.

**सत्र पद्धती : चर्चासत्र**

या शैक्षणिक वर्षापासून प्रथम वर्ष कला, शास्त्र आणि वाणिज्य वर्गाचा नवा सत्रपद्धतीचा अभ्यासक्रम सुरू झालेला आहे. हा अभ्यासक्रम यशस्वीपणे राबवण्याच्या दृष्टीने महाविद्यालयाने सुरुवातीपासूनच दक्षता घेतली होती. इतकेच नव्हे तर सत्र पद्धतीतील गुणावगुणांचा सर्वंकष विचार करण्याकरिता पुणे विद्यापीठाच्या कक्षेतील पुणे शहरातील सर्व महाविद्यालयातील प्रतिनिधी आमंत्रित करून ३० ऑक्टोबर १९७७ रोजी एक दिवसाचे चर्चासत्र घेण्यातही आमच्या महाविद्यालयाने पुढाकार घेतला होता. पुण्याबाहेरील महाविद्यालयांशी संपर्क साधून त्यांचेही प्रश्न व मते मागविण्यात आली होती. या सत्राचे अध्यक्षपद फर्ग्युसन महाविद्यालयाचे प्राचार्य पी. एल. गाडगीळ यांनी स्वीकारले होते आणि कुलगुरू प्राचार्य देवदत्त

दाभोळकर यांनी स्वतः चर्चासत्रास उपस्थित राहून मार्गदर्शन केले. चर्चासत्रात सकाळी सत्रपद्धतीमुळे निर्माण होणाऱ्या सर्वसामान्य अडचणींची चर्चा झाली. व दुपारी विषयांवार बैठका होऊन त्या त्या विषयाच्या अध्यापनात सत्रपद्धतीमुळे होणाऱ्या समस्यांबद्दल व शिक्षण पद्धतीत आवश्यक होणाऱ्या बदलांचीही चर्चा करण्यात आली. या चर्चांतून जे मुद्दे उपस्थित झाले ते सर्व संकलित करून विद्यापीठाकडे व पुणे विद्यापीठ कक्षेतील सर्व महाविद्यालयांकडे अधिक विचारार्थ पाठवून देण्यात आले. त्यातील अनेक सूचनांची दखल घेण्यात आली आणि काही बदल कार्यान्वित होण्याच्या मार्गावर आहेत. ही या चर्चासत्राच्या यशाची पावतीच होय. या चर्चासत्राला २५० प्राध्यापक हजर होते व तिन्ही विद्याशाखांतील २६ विषयांवर चर्चा झाली. शिक्षणक्रमात सत्रपद्धती स्वीकारणे म्हणजे केवळ अभ्यासक्रम, परीक्षा-पद्धती, स्वाध्यायपद्धती यात बदल घडवून आणणे नव्हे. या बदलांबरोबरच महाविद्यालयातील दैनंदिन प्रशासकीय व्यवस्थेमध्येही मूलगामी बदल घडणे अपरिहार्यच होते. याची दखल न घेतल्यास सत्रपद्धती राबवणे कदाचित अशक्यप्रायच होऊन बसेल, ही गोष्ट लक्षात घेऊन या चर्चासत्रामध्ये महाविद्यालयातील ग्रंथपाल, लेखापाल व अधीक्षक यांचेही चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते त्यांनी केलेल्या सूचना देखील सर्व महाविद्यालयांच्याकडे पाठविल्या आहेत. सत्रपद्धतीमुळे निर्माण होणाऱ्या प्रशासकीय अडचणींचा आणि बदलांचा त्यामुळे विचार झाला.

**पदव्युत्तर वाणिज्य सत्रपद्धती-परिसंवाद**

या वर्षीपासून आपल्या महाविद्यालयात वाणिज्य शाखेतील पदव्युत्तर शिक्षण विभाग सुरू झाला. पदव्युत्तर शिक्षणात अंगीकारलेल्या सत्रपद्धतीमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांचा विचार करण्यासाठी पुण्यातील वाणिज्य महाविद्यालयांचे प्राचार्य व पदव्युत्तर वर्गांना शिकवणारे प्राध्यापक यांचा एक परिसंवाद ता. १४-८-७७ ला घेण्यात आला. या परिसंवादाचे उद्घाटन कुलगुरू प्रा. दाभोळकर यांनी केले व समारोप वाणिज्य शाखेचे अधिष्ठाते डॉ. प्र. चिं. शेजवलकर यांनी केला. याच उपक्रमाचा पाठपुरावा करण्यासाठी दुसऱ्या सत्रात ता. २२-१-७८ रोजी एक दिवसाचा परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. हे दोन्ही परिसंवाद घडवून आणण्याचे श्रेय प्राचार्य लिमये व वाणिज्य शाखेतील त्यांचे सहकारी प्राध्यापक यांचे आहे.

सत्र पद्धतीची यशस्वी वाटचाल होण्यासाठी पदवी वर्ग व पदव्युत्तर वर्ग यांना शिकविणाऱ्या सर्व प्राध्यापकांची विषयवारी २।३ दिवसांची कृतिसत्रे या उन्हाळ्याच्या सुट्टीत आयोजित करण्याची अत्यंत गरज आहे.

**प्राध्यापक अभ्यास मंडळ**

महाविद्यालयातील तिन्ही विद्याशाखांची त्यांमधील अत्याधुनिक प्रगतीची, त्याचबरोबर काही मूलभूत समस्यांची परस्परांना ओळख व्हावी या हेतूने हे मंडळ १९७१-७२ मध्ये सुरू करण्यात आले. गेली आठ वर्षे दरवर्षी साधारणतः सहा ते सात अभ्यासपूर्ण निबंध या मंडळापुढे वाचले गेले. त्याचप्रमाणे प्रत्येक सत्रात एक याप्रमाणे काही अधिकारी व्यक्तींची भाषणेही घडवून आणण्यात आली. या वर्षीचे शेवटचे सत्र हे रौप्यमहोत्सवी असल्यामुळे विशेष प्रकारे साजरे करण्याचे योजले आहे. त्यानुसार आतापर्यंतच्या सर्व सत्रांच्या अध्यक्षांना ५० व्या सत्राला आमंत्रित करण्यात येणार आहे. तसेच यांप्रसंगी आतापर्यंत वाचल्या गेलेल्या निबंधाचे सार असलेली पुस्तिकाही काढण्याची योजना आहे. मंडळ अधिक कार्यक्षम होण्यासाठी विद्यापीठ अनुदान मंडळाकडून मदत मिळविण्यासाठी प्रयत्न चालू आहेत.

**विद्यापीठ अनुदान मंडळाकडून साहाय्य**

आपल्या महाविद्यालयाच्या वाढीमध्ये विद्यापीठ अनुदान मंडळाचा मोठाच वाटा असणार आहे. आपण करीत असलेल्या अनेकविध उपक्रमांचे विद्यापीठ अनुदान मंडळाने स्वागत केले आहे आणि वेळोवेळी उत्तेजनही दिले आहे. गेल्या वर्षी महाविद्यालयाने विविध वर्गासाठी सर्व विषयांच्या प्रश्नपेढ्या तयार केल्या होत्या. या प्रश्नपेढ्यांच्या प्रकाशनार्थ आलेला खर्च विद्यापीठ अनुदान मंडळाने द्यावा यासाठी केलेल्या प्रयत्नांना यश येऊन या प्रश्नपेढ्यांच्या प्रकाशनार्थ आलेला सर्व खर्च मंडळाने विशेष अनुदान म्हणून देण्याचे मान्य केले आहे. व अशा उपक्रमांना सक्रिय प्रोत्साहन देण्याचे आश्वासन दिले आहे.

त्याचप्रमाणे महाविद्यालयाच्या विविध विस्ताराच्या योजनांनाही विद्यापीठ अनुदान मंडळाने भरघोस साहाय्य करण्याचे मान्य केले आहे. या मदतीतून ग्रंथालयासाठी ग्रंथ, भाषा शिक्षणासाठी आधुनिक प्रयोगशाळा व उपकरणे घेणे महाविद्यालयास शक्य होईल.

त्याचप्रमाणे ग्रंथालयासाठी वेगळी इमारत, प्रयोगशाळांचा विस्तार, आधुनिकीकरण तसेच इतर सुविधा यांसाठी सुमारे पाच लाख रुपये विद्यापीठ अनुदान मंडळाकडून महाविद्यालयाला मिळणार आहेत. या सर्व मदतीबद्दल महाविद्यालय अनुदान मंडळाचे ऋणी आहे.

**प्राचार्य आणि प्राध्यापकांचे अभिनंदनीय यश**

प्राचार्य मो. भा. लिमये यांची राज्य शासनातर्फे महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक मंडळाच्या राज्य-मंडळ व विभागीय मंडळ यांवर नियुक्ती झाली होती. तसेच महाविद्यालयांचे आर्थिक, व्यवस्थापकीय व शैक्षणिक प्रश्न सोडविण्यासाठी व शिक्षणाचे काम परस्पर चर्चा व सहकार्याने जास्ती चांगले करण्यासाठी स्थापन केल्या गेलेल्या ' Principals' Forum Poona University Area या पुणे विद्यापीठांतर्गत प्राचार्य संघटनेच्या खजिनदार पदी प्राचार्य लिमये यांची एकमताने निवड झाली. प्राचार्य लिमये यांचे आम्ही हार्दिक अभिनंदन करतो.

आपल्या महाविद्यालयातील कला, शास्त्र व वाणिज्य विभागातील अनेक प्राध्यापकांनी ज्यूनिअर कॉलेज व सीनिअर कॉलेज पातळीवरील पाठ्यपुस्तके व संदर्भग्रंथ लिहिले. या सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन.

**आंध्र वादळग्रस्तांकरिता निधी**

वार्षिक स्नेहसंमेलनातील कार्यक्रम, अल्पोपहार इत्यादीवरील खर्चात कपात करून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आंध्र प्रदेशातील वादळग्रस्तांकरिता रु. ३०४२–०० चा निधी पाठविला. आमच्या विद्यार्थ्यांनी दाखवलेली ही सामाजिक भावना अभिनंदनीय आहे.

प्राध्यापकांतर्फेही रु. ८४५ चा निधी वादळग्रस्तांना पाठविण्यात आला.

**चतुर्थ श्रेणी सेवक कल्याण योजना**

महाविद्यालयातील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना आर्थिक सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत महाविद्यालय सुरुवातीपासून प्रयत्नशील आहे. चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांच्या आकस्मिक गरजा भागविण्याकरिता सुलभ हप्त्याने कर्जाऊ रक्कम देण्याची व्यवस्था ' दिवाळी–बक्षीस–निधी ' द्वारे उपलब्ध आहे. चालू वर्षी सेवकांना योग्य किंमतीत चांगले धान्य उपलब्ध करून देण्याची आणि ते खरीदण्याकरिता कर्जाऊ रक्कम देण्याची व्यवस्थाही केलेली आहे. चतुर्थ श्रेणी सेवकांना समाजात सन्मानाने वावरता यावे, म्हणून महाविद्यालय प्रयत्नशील असते.

**स्वागत**

या वर्षी महाविद्यालयात प्रा. य. म. सुमन्त, अहिरराव वा. ह., शिळाडे स. द. तसेच ज्यूनिअर विभागात श्री. राजगुरू व. गो., श्री. जोशी रा. वा., सौ. कुलकर्णी ज. अ., श्री. फरास म. जि., श्री. देशपुत्रे ज. बा., श्री. भालेराव अ. मु., कु. कौशल सुमन म., सौ. शिंदे मंगला भि., सौ. पै. माधुरी ग., श्री. जोवेंकर ल. कु. वर्तन शशी वा. श्री. पोतदार शि. के.

श्री. वडवे श. ब. श्री. गोते भावा. सौ. ओझरकर शुभदा, वि. श्री. वाणी, श्री. कुलकर्णी रा. ब., डॉ. आवटे अ. वि., कु. देशपांडे वंदना व.

**कर्मचारी सेवक वर्ग**

श्री. मो. रा. पित्रे, सौ. शुभांगी फडके, श्री. म्हसवडे बि. ह. यांची विविध विभागांत विविध स्तरांवर नियुक्ती झाली. आम्ही त्यांचे मनःपूर्वक स्वागत करतो

**निरोप व शुभेच्छा**

डॉ. राजेन्द्र व्होरा, प्रा. डी. एम शहा. (सीनिअर विभाग) व ज्यूनिअर विभागामधून श्री. व्ही. सी. देशपांडे, श्री. बी. एस देशमुख, श्री. एस. जी. खुर्द, श्री. व्ही. बी. जोशी, सौ. यू. पी. अकोलकर सौ. व्ही. डी. मनोहर सौ. एस. ए. पुजारी सौ. ए. व्ही. धडफळे तसेच खालील कर्मचारी

(१) अ. म. मल्हार

(२) प. गो. सुरत्राण.

यांना अधिक चांगली संधी मिळाल्याने ते इतरत्र गेले त्यांना शुभेच्छा.

**अभिनंदन**

या वर्षीही आपल्या महाविद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी शैक्षणिक व क्रीडा विभागात उत्कृष्ट यश संपादन केले आहे.

**अजित कानिटकर** प्रथमवर्ष वाणिज्य हा विद्यापीठाच्या एप्रिल १९७७ च्या परीक्षेत सर्व प्रथम आला. **यशवंत पटेल** याने पदवीपूर्व वाणिज्य परीक्षेमध्ये वाणिज्य विभागामध्ये विद्यापीठात नववा क्रमांक मिळविला.

आंतरमहाविद्यालयीन राज्य व राष्ट्रीय पातळीवर खालील खेळाडूंनी विशेष गौरवास्पद कामगिरी केली.

कु. बनबेरू (व्हॉलीबॉल) संजीवनी पत्की (खोखो) अतुल जोशी व उदय भागवत, (बास्केट बॉल) कु. छाया कुकडे, सुवर्णा कुंभार, अनुराधा पेद्राम.

श्री. क्षीरसागर (वजन उचलणे) श्री क्षीरसागर, श्री. ढोरे कुस्ती ढमाले.

व्हॉलीबॉल मुलींच्या संघाने ओळीने चवथ्यांदा विजेतेपद मिळविले.

बॉलबॅडमिंटन मुलींच्या संघाने सलग दुसऱ्यांदा विजेतेपद मिळविले.

नाशिक येथील युवक महोत्सवात 'पक्षी' या एकांकिकेस द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. विनोद गोडसे याच्या कवितेस सुवर्णपदक मिळाले.

ज्यूनिअर विभागात

खोखो– मुलींच्या संघाने विजेतेपद मिळविले.

खोखो– मुलांच्या संघाने विजेतेपद मिळविले.

राष्ट्रीय पातळीवर खोखो साठी आमच्या महाविद्यालयातील ६ मुली व ४ मुले यांची निवड झाली.

राज्य पातळीवर विविध विभागांत कु. सिंधू, कु. जयश्री साने, निशिगंधा अंबिके, कु. तुमपल्लीवार यांची निवड झाली.

एन्. सी. सी. मधील अनिलकुमार मनराई या विद्यार्थ्याची राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनेमध्ये निवड झाली.

भूपाळ व्हावळ यांस ग्लायडिंग पायलटचा परवाना मिळाला. आपल्या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना पथकाचा सचिव जोगळेकर याची पुणे विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळावर निवड झाली. या सर्व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन.

**आभार** श्री. हनुमंत कृष्ण बर्वे ह्यांनी त्यांचे वडिलांचे स्मृती प्रित्यर्थ विद्यार्थ्यांना उत्तेजन देण्याचे दृष्टीने रु. ५० चे बक्षिस ह्या महाविद्यालयातून मार्च/एप्रिल १९७७ च्या तृतीय वर्ष बी. ए. परीक्षेत मराठी ह्या विषयात जास्त गुण मिळवून उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थी अगर विद्यार्थीनी-साठी दिले त्याबद्दल आभार.

**प्रस्तुत अंक** ज्युनिअर कॉलेज आणि सीनिअर कॉलेज यांमधील शिक्षण आणि शिक्षणेतर उपक्रमांच्या बाबतीत महाविद्यालयाने पहिल्यापासून कोणत्याही प्रकारचा भेदभाव राखलेला नाही. याचे उदाहरण म्हणून प्रस्तुत अंकाकडे पाहता येईल. अकरावीपासून पदव्युत्तर वाणिज्य वर्गा-पर्यंतच्या सर्व घडामोडींची प्रतिबिंबे यात पहावयास मिळतील.

**कृतज्ञता** नियतकालिक आणि तेही प्रगतिपथावरील महाविद्यालयाचे नियतकालिक संपादित करणे, प्रकाशित करणे; ही तशी अवघडच गोष्ट. पण संपादन समितीचे अध्यक्ष प्राचार्य मो. भा. लिमये यांनी प्रत्येक गोष्टीत जातीने मार्गदर्शन केले. उपप्राचार्य कुलकर्णी यांनी मुद्रणप्रत तयार करण्यापासून कागद उपलब्ध करून देण्यापर्यंतची उस्तवारी केली. उपप्राचार्य गाडगीळ, जिमखाना कार्याध्यक्ष आपटे यांच्या प्रेरणा आणि सूचना यांचा आम्हास सतत लाभ झाला. समितिसदस्य प्रा. संगोराम, प्रा. धायगुडे, प्रा. मराठे, सौ. हेमा लेले आणि श्री. जोर्वेकर यांनी कामाचा भार उचलला. भूतपूर्व संपादक प्रा. पुंडे यांनी या अंकाच्या घडणीत प्रथम-पासून लक्ष घातले व त्यांच्या अनुभवाचा फायदा आम्हास करून दिला. इतर प्राध्यापकांनी विविध छोटी मोठी कामे सुकर व गतिमान केली. कार्यालय अधीक्षक श्री. देशपांडे, ग्रंथपाल श्री. बापट आणि इतर सेवक वर्ग यांनी महत्त्वपूर्ण तपशील तत्परतेने सादर केला.

कल्पना मुद्रणालयाचे श्री. चिं. स. लाटकर आणि ब्लॉकमेकर श्री. खाडिलकर यांनी अल्पमुदतीत छपाई व ठसे यांचे कार्य उरकले.

या साऱ्यांचे आणि अंक सिद्ध करताना साहाय्यभूत झालेल्या सर्वांचे आम्ही कृतज्ञ आहोत.

**विलास सातभाई, स्मिता पुंडले**
विद्यार्थी–प्रतिनिधी

**सीताराम रायकर**
संपादक

# क्रीडा संघटना व्यवस्थापन समिती



खुर्चीवर बसलेले : डावीकडून — श्री. अतुल जोशी, प्रा. पद्माकर आपटे ( कार्याध्यक्ष ), उपप्राचार्य भीमराव कुलकर्णी, प्राचार्य मो. भा. लिमये, उपप्राचार्य ल. ह. गाडगीळ, प्रा. स. य. गंभीर. कु. बनबेरू.

उभे पहिली रांग : डावीकडून — प्रा. गोसावी, श्री. छाब्रा, श्री. लागू, प्रा. नातू, प्रा. पाथरे, प्रा. पी. डी. कुलकर्णी, प्रा. म. आ. कुलकर्णी, प्रा. सौ. लेले.

उभे दुसरी रांग : डावीकडून — कु. हर्डीकर, अहिरकर, इंगळे, हेगडे, सातभाई, पाटील, ढोले, जाधव, हंडे, कु. अरगडे.

## व्हॉली बॉल — महिला संघ



खुर्चीवर बसलेले : डावीकडून — अरगडे, बनबेरू, उपप्राचार्य कुलकर्णी, प्राचार्य मो. भा. लिमये, उपप्राचार्य गाडगीळ, प्रा. पाथरे, प्रा. आपटे, पत्की.

उभे : डावीकडून — हर्डीकर, सोमण, पाठक, देशपांडे.

## खो खो — महिला ज्युनिअर कॉलेज विभाग



खुर्चीवर बसलेले : डावीकडून : श्री. छाब्रा, श्री. लागू, उपप्राचार्य भीमराव कुलकर्णी, प्राचार्य मो. भा. लिमये, उपप्राचार्य ल. ह. गाडगीळ, प्रा. पद्माकर आपटे, ( कार्याध्यक्ष ), कु. वर्तक.

उभे पहिली रांग : डावीकडून : सविता देशपांडे, राजश्री भोसले, निशा अंबिके, मेधा अवधानी, रंजना जोशी, वसुधा तुमपल्लीवार, संगीता ताटके, जयश्री साने, नंदिनी कुलकर्णी, मिथिला जबडे.

उभे सेवक : श्री. पवार व श्री. माळी.

## शारिरीक शिक्षण — गटनायक



खुर्चींवर बसलेले : डावीकडून : कु. लोकापूर, श्री. छाब्रा, उपप्राचार्य भीमराव कुलकर्णी, प्राचार्य मो. भा. लिमये, उपप्राचार्य ल. ह. गाडगीळ, प्रा. पद्माकर आपटे (कार्याध्यक्ष) श्री. लागू, श्री. आवटे

उभे पहिली रांग : डावीकडून : खानविलकर, क्षीरसागर, हंडे, अंजली नांगरे, कदम, कु. तवले, जोगळेकर, चिरमुरे, जोशी, देशमुख

उभे दुसरी रांग : डावीकडून : गोलवलकर, देशमुख, भागवत, सिध्धू, आलेकर, सिन्नरकर, चाटी, भुतडा

## विद्यापीठ युवक महोत्सव १९७७-७८ — कलाकार



खुर्चींवर बसलेले : डावीकडून : प्रा. पद्माकर आपटे ( कार्याध्यक्ष ), उपप्राचार्य भीमराव कुलकर्णी, प्राचार्य मो. भा. लिमये, उपप्राचार्य ल. ह. गाडगीळ, प्रा. सौ. बनारसे, सौ. लेले

उभे पहिली रांग : डावीकडून : वंदना संगोराम, माधवी देशमुख, हेमलता प्रधान, साधना जोगळेकर, माणिक वैद्य, दुबळे, माधुरी सोमण, विजया आहुजा, नंदिनी मराठे, स्मिता पुंडले

उभे दुसरी रांग : डावीकडून : कु. स्मिता जोशी, सर्वश्री धर्माधिकारी, संगोराम, अहिरकर, पंडित, शहा, अजवी, कुलकर्णी, कु. भिडे

# राष्ट्रीय खो खो – ज्युनिअर कॉलेज विभाग



खुर्चीवर बसलेले : डावीकडून : श्री. छाब्रा, कु. वर्तक, उपप्राचार्य भीमराव कुलकर्णी, प्राचार्य मो. भा. लिमये, उपप्राचार्य गाडगीळ, प्रा. पद्माकर आपटे ( कार्याध्यक्ष ), श्री. लागू.
उभे डावीकडून : व्ही. डी. अस्निकर, जे. सी. कुलकर्णी, निशा अंबिके, सुनिता देशपांडे, वसुधा तुमपल्लीवार, नंदिनी कुलकर्णी, संगीता ताटके, मिथिला जबडे, आश्विन पुंडलिक, अतुल वाकणकर.

# वर्ग-प्रतिनिधी – ज्युनिअर कॉलेज



खुर्चीवर बसलेले : डावीकडून : उपप्राचार्य भीमराव कुलकर्णी, प्राचार्य मो. भा. लिमये, उपप्राचार्य ल. ह. गाडगीळ, प्रा. पद्माकर आपटे ( कार्याध्यक्ष).
उभे : डावीकडून : सर्वश्री हावळ, भोई, लोणकर, कारवा, ओझा, टाकळकर, साळुंके

## वर्ग-प्रतिनिधी — सिनीअर कॉलेज विभाग



खुर्चींवर बसलेले : डावीकडून : सर्वश्री बाफना, टेलर, शर्मा, उपप्राचार्य भीमराव कुलकर्णी, प्राचार्य मो.भा. लिमये, उपप्राचार्य ल.ह. गाडगीळ, प्रा. पद्माकर आपटे, (कार्याध्यक्ष), सातपुते, लाखनगावकर.
उभे डावीकडून : सर्वश्री पाटील, जाधव, दांगट, गुप्ता, कु. इंगळे, सर्वश्री शिंगाटे, गुजराथी, शिलिमकर, सासवडे.

## राष्ट्रीय सेवा योजना



खुर्चींवर बसलेले : डावीकडून : श्री. जोगळेकर, प्रा. गोखले, उपप्राचार्य भीमराव कुलकर्णी, प्राचार्य मो.भा. लिमये, उपप्राचार्य ल. ह. गाडगीळ. प्रा. कुलकर्णी, प्रा. गोसावी, प्रा. न्हाळदे
उभे : डावीकडून : श्री. जाधव, श्री. खरात, कु. मीनाक्षी येडुरे, श्री. भिलारे.

## प्रथमवर्ष सत्रपद्धती परिसंवाद




डावीकडून : प्राचार्य पा. ल. गाडगीळ, फर्गसन महाविद्यालय, प्रा. दे. अ. दाभोलकर, कुलगुरू, पुणे विद्यापीठ व प्राचार्य मो. भा. लिमये

## प्रथमवर्ष सत्रपद्धती परिसंवाद




डावीकडून : प्रा. दे. अ. दाभोलकर, कुलगुरू, पुणे विद्यापीठ, प्राचार्य मो. भा. लिमये आणि प्राचार्य पा. ल. गाडगीळ.

## पदव्युत्तर वाणिज्य सत्रपद्धती परिसंवाद




उद्घाटक डॉ. प्र. चिं. शेजवलकर, अधिष्ठाता वाणिज्यशाखा उद्घाटनाचे भाषण करीत असताना. उजवीकडे प्राचार्य मो. भा. लिमये.

## पदव्युत्तर वाणिज्य सत्रपद्धती परिसंवाद



परिसंवादास उपस्थित असलेले पुण्यातील वाणिज्य महाविद्यालयांचे प्राचार्य व पदव्युत्तर वर्गास शिकविणारे प्राध्यापक.

कुस्ती-विशेष नैपुण्य



श्री. टाकळकर
ज्युनिअर कॉलेज

"मॉडर्न श्री"



श्री. ससाणे



श्री. श्रीरंग इनामदार
राष्ट्रपती श्री. संजीव रेड्डी
यांचे हस्ते
अर्जुन पारितोषिक
स्वीकारताना

ग्लायडर पायलट



भूपाल वाव्हळ
तृतीयवर्ष वाणिज्य

राष्ट्रीय सेवा योजना
विद्यापीठ प्रतिनिधी



जयन्त जोगळेकर
द्वितीय वर्ष वाणिज्य

नॅशनल डिफेन्स
अ‍ॅकॅडमीत प्रवेश



अनिलकुमार मनराय

# प्रथम-श्रेणीचे मानकरी – विशेष प्राविण्यासह

## बारावी - शास्त्र



प्रविण ढवळे



श्रीनिवास हिंगणे



दिलिप लुंकड



शिरीष पाटील



सीमा गुणे



सरोज राजाध्यक्ष



अमला सरदेसाई



सुनिता ठाकूर

## तृतीय वर्ष-कला - प्रथम श्रेणी



उषा भटेवरा



त्रिवेणी पाटील



शुभांगी पळशीकर



शोभा भोसले

## तृतीय वर्ष वाणिज्य



संजीवनी हसबनीस

# तृतीय वर्ष – शास्त्र – प्रथम श्रेणी


मधुमिलिंद लागू


श्रीराम सराफ


दिलीप चौधरी


जगदीश मोघे


निर्मला बुलाख


शंकर चौगुले


जयन्त जाधव


प्रशांत क्षीरसागर


अरुण मुके


प्रकाश शिंगटे


नीता शहा


प्रदिप कुलकर्णी


जयन्त कुलकर्णी

# गंभीर

**रवींद्र खरात**
द्वितीय वर्ष वाणिज्य

नववीत होतो तेव्हा ! आमची ताईटली कॉलेजला जात होती. मला वाटलं कॉलेजला गेल्यावर ती बरीच हट्टी होईल; बाबांना सांगेल, "मला पॉकेटमनी हवा. बेल-बॉटम हवी." पण अंहं ! नाव काढू नका. पूर्वीची स्कर्टमधली ताई आता पातळांमध्ये वावरत होती. एवढेच काय ते ! महिन्यातून एकदा ती बसच्या पाससाठी बाबांकडे पैसे मागत असे; बाकी महिनाभर ती कधी पैसे मागतच नसे.

मी दहावीत गेलो नि तिचा चेहरा दिवसेंदिवस गंभीर होत चालला. मला काही कळेना. तिच्या मैत्रिणी घरी यायच्या त्या कशा हसत-खिदळत ! पण ताईचं हसू लोप पावलेलं होतं. आम्ही दोघंच बहिणभावंडं होतो. मी दहावीत नि ती टी. वाय्. बी. ए. ला होती ! कधी अभ्यास तर कधी गाणी, याशिवाय बाहेरचं जग तिला माहितच नव्हतं. मला कधी कधी वाटायचं, आपल्या ताईनं खूप हसावं, खेळावं; कॉलेजातल्या गमती सांगाव्यात. मला शाळेतल्या गमती विचाराव्यात. पण ताई असं कधी बोललीच नाही.

एके दिवशी संध्याकाळी मी फिरून आलो नि पलंगावर पडलो; तोच ताई धावत आली. माझ्या कपाळावर हात टेवीत ती म्हणाली, "काय रे हे नंदू ? काय होतंय तुला ?"

ताईचा हात मी तिथेच पकडला नि म्हणालो, "ताईटले, मला काहीच झालं नाही. पण तू अशी का वागतेस ?"

"म्हणजे," ती दचकूनच म्हणाली, "कशी"

"अग तू बोलत नाहीस, हसत नाहीस..."

"हं ! त्याचा राग आलाय होय तुला ? मग काय देऊ तुला ? चहा, कॉफी, दूध..."

"हे सगळे गरम पदार्थ देऊन तू मला आणखी गरम करणार वाटतं ! मला हे सांग..."

"काय सांगू तुला ?"

"तू अशी का वागतेस ?"

तेवढ्यात बाबांच्या चपलांचा आवाज झाला. मलाही तेच हवं होतं. बाबा आल्याबरोबर मी त्यांना विचारलं, "बाबा ! आपली ताई एवढी गंभीर का ?"

बाबा हसतच म्हणाले, "अरे लग्न झाल्यावर होईल ती हासरी !"

'इश्श' म्हणून ताई जी आत पळाली ती पुन्हा बाहेर आलीच नाही.

रात्री आम्ही जेवायला बसलो तेंव्हा बाबांनी विचारलं, "अलका ? कुलकर्ण्यांचा प्रवीण तुला माहीत आहे?"

"हो. गेल्या वर्षी आमच्याच कॉलेजात होता." ताई.

"कसा काय आहे तो ?" बाबांचा प्रश्न.

"म्हणजे ?" ताई दचकलीच.

"त्याच्या वडिलांनी मागणी घातलीय तुला. मी काहीच सांगितलं नाही. म्हटलं तू त्याला ओळखतेसच ! तुझा विचार घ्यावा."

"वा ! काय ताई, यंदा लाडूंची तयारी..." मी बोलू लागलो तोच ताई म्हणाली—नि तेही एका दमात !

"मला पसंत नाही तो ! मी त्याच्याशी लग्न करणार नाही."

"का ?" ताईला बाबांनी अडवलं.

"पोरींची टवाळकी करीत राहतो तो !"

यानंतर बाबांनी प्रवीणचा विषय काढला नाही.

*

दिवाळीची सुट्टी लागली नि मी खूपच आनंदलो. परंतु ताईचं जेवण कमी व्हायला लागलं. एके दिवशी ताई गॅलरीत आरामखुर्चीत कोणतेसे पुस्तक वाचीत बसली होती. मी गेलो तेंव्हा तेच पुस्तक तिने मांडीवर ठेवले

होते. ताईची खोडी करावी म्हणून मी ताईच्या मागून गेलो नि गपकन् तिचे डोळे झाकले आणि काय आश्चर्य! माझ्या हातांना ओलावा लागला. ताई रडत होती. मी तिला कारण विचारलं तर शेवटपर्यंत ती सांगेनाच. चिडून मी म्हणालो,

" नको सांगूस! मला नाही सांगितलंस तरी आईला सांगशीलच!"

" नंद्या! तुला शपथ आहे माझी; कोणाला सांगितलेस तर!"

ताई रडत होती हे आई–बाबांना सांगायचं मला धैर्यच झालं नाही.

दिवाळी सुरू झाली. लाडू करंज्यांना नुसता ऊत आला होता. पण ताई काही खातच नसे. कधी-कधी जेवताना तिला हुंदका येई; पण तो कोणाला समजतच नसे. मला काही बोलायचीही चोरी झाली होती. ताईला दिवसातून एकदा तरी रडताना मी पाही.

भाऊबीज आली. माझा आनंद गगनात मावेनासा झाला होता. खाऊचे सर्व पैसे मी जपून ठेवले होते. ते होते जवळ जवळ चाळीस रुपये! कालच मी माझ्या पसंतीने ताईला एक सुंदर साडी घेतली होती. आज सकाळीच ताईने मला उटण्याने आंघोळ घातली होती. दुपारची वेळ होती. आई आणि बाबा काही खरेदी करण्यासाठी गेले होते. मी कॉटवर एक कादंबरी वाचीत होतो. ताई देखील काहीसं वाचीत होती. तोच एक पत्र आत आलं. मी पत्राकडे झेपावलो. आंतरदेशीय पत्र होतं ते! वर नाव होतं!" अलका शामराव सडोलीकर."

मी लगेच पत्राची बाजू पाहिली. त्यावर लिहिलं होतं. From Sudam Sonawane.

ताईला देत मी म्हणालो, " ताई, तुझं पत्र आलंय!' मी पुन्हा पुस्तक वाचायला लागलो. थोडा वेळ गेला आणि काय आश्चर्य! ताई पुन्हा रडत होती एकसारखी! मी ताईजवळ जाऊन तिच्या पाठीवर हात ठेवीत म्हणालो " ताई, तुला झालंय तरी काय?"

ताईने पत्राकडे बोट केले. मी ताईचं पत्र घेतले नि वाचू लागलो.

" प्रिय अलकाताईस,

खरं म्हणजे सुट्टी लागल्यापासून भलताच आनंद वाटायला लागलाय. परंतु रोज सकाळचे साडेदहा वाजले की मला तुझी आठवण येते. आपला तो गप्पांत जाणारा वेळ! खरं सांगू का ताई, इतरांच्या गप्पांपेक्षा मला तुझ्या गप्पांतच जास्त मूड यायचा.

का ग ताई? तू बरीच आनंदी असशील, होय ना? भाऊबीजेचा आनंद तर काही वेगळाच असतो. तुझा भाऊ जवळ असल्याने तू खूप असशीलच! मला मात्र तीन बहिणी असूनही तुझी आठवण प्रकर्षाने होते. तुला भेटच देणार होतो; परंतु मी पडलो गरीब! हे पत्रच भेट समज तुला. मला खात्री आहे की ह्या पत्राचा तुला आणि घरातील लोकांना राग येणार नाही. छोट्या नंदूस गोड आशीर्वाद.

यंदाची दिवाळी तुम्हा सर्वांना सुखाची व समृद्धीची जावो.

तुझा भाऊ
सुदाम सोनवणे.

" खाली सही चक्क मराठीत केली होती. मी म्हणालो " असं! तर ह्या तुझ्या दुसऱ्या भावासाठी रडत होतीस होय?"

" नंद्या! तुला नाही समजायच्या ह्या गोष्टी!"

तिच्या रडण्याप्रमाणे ही गोष्टदेखील मी कोणालाच सांगितली नाही.

*

दिवाळी संपली. माझी शाळा सुरू झाली होती, अभ्यासाला जोर चढत होता. ताईचा चेहरा दिवसेदिवस गंभीर होत होता. एके दिवशी मी पहाटेच उठलो. सर्वजण झोपलेले होते. सहज ताईची वह्या-पुस्तकं चाळीत होतो. तिची एक विचित्र वही होती. ती तिची डायरी होती. तीमधे रोजच्या लिखाणात त्या सुदाम सोनवणेविषयी काही ना काही लिहिलं होतं; अशीच एक आठवण तिनं लिहिली होती.

" सोनवणे भेटला की रोज आनंद वाटतो मला! पण आज खूप वाईट वाटलं. बिचारा अनवाणीच आला होता कॉलेजात! चहाचा आग्रह केला तर येईनाच. तो तरी कसा येणार? गरिबीमुळे त्याला इतरांना चहा पाजता येत नाही; म्हणून लाजतो. त्याला म्हणाले.

' सोनवणे, चप्पल घे आता नवी!'

' सडोलीकर, अनवाणी फिरण्यातला आनंद नाही कळणार तुला.'

काय बोलणार मी यावर?"

असाच दुसरा प्रसंग पहायला गेलो, तर भाऊबीजेचाच प्रसंग होता तो!

" आज सोनवणेचं पत्र आलंय! साधं असलं तरी

भारदस्त वाटलं मला! वेड्यानं ताई म्हटलंय! खरं म्हणजे सोनवणे मला जीवनसाथी म्हणून हवा आहे. तो गरीब आहे. त्याच्या झोपडीत त्याच्या बाहूत मी विसावू शकत नाही का? पण तो जातीनं चांभार आहे. त्याचं धैर्य होत नसावं. मी पडले मुलगी! मला त्याला काहीही म्हणता येत नाही. आई-वडिलांना सांगणं तर अशक्यच. रोज मी इथे दिवाळीचा फराळ खाते. बिचारा तिथं काय खात असेल देव जाणे. रोज त्याच्या आठवणींनी इतका ऊर दाटतो की रडण्याशिवाय मार्गच नाही. नंद्या रोज विचारतो आता त्याला काय सांगणार?"

आता कुठं माझ्या टाळक्यात प्रकाश पडला की ताई त्या सुदाम सोनवणेवर प्रेम करते आहे. आणि तो वेडा तिला बहीण मानीत होता. एखाद्याने जेवणाचे आमंत्रण मिळाल्यावर आमंत्रिताने लाडूच्या जेवणाचा विचार करावा आणि त्याच्या पुढ्यात यावी चटणीभाकर! ताईची तरी हीच स्थिती झाली होती. मी ठरविले, आंतरजातीय का होईना, पण ताईचे लग्न ह्याच सोनवणेशी लावून द्यायचं.

मी त्या प्रयत्नांना लागलो. हळूहळू गप्पांतून ताई-कडून त्याचा पत्ता मिळविला नि त्याच्या खोलीवर गेलो. शनिवारवाड्याशेजारील गजबजलेल्या कळकट चाळीत 'दोंदे वसतिगृह' आहे. तिथे रहात होता तो! खोली-नंबर पाहून दारावर टक-टक केलं. किरकिरत दार उघडलं गेलं, नाईट पायजमा आणि बनियनवर एक मुलगा उभा होता.

"सुदाम सोनवणे आपणच का?"

"हो." तो.

"मी नंदू सडोलीकर."

"म्हणजे अलका सडोलीकरचा..."

"धाकटा भाऊ." त्याचं वाक्य मी पुरे केले.

"या ना! आत या."

मी खोलीत गेलो. कॉटवर बसलो. समोरच्या खुर्चीत तो बसला.

"मी तुमच्याकडे एका महत्त्वाच्या कामासाठी आलोय. मी सुरुवात केली.

"बोला ना!" तो.

"तुम्ही आंतरजातीय विवाह कराल?"

"नाही."

"का? तुम्ही जातपात मानता?"

"नाही; परंतु कारणं वेगळी आहेत."

"स्पष्ट बोलतो म्हणून माफ करा. माझ्या बहिणीचं प्रेम आहे तुमच्यावर! तुमच्याशी लग्न करण्याची इच्छा आहे तिची."

"तुम्हाला काय माहीत?"

"तिनेच पाठवलंय मला." मी थाप ठोकली.

"ह्या प्रश्नाचे उत्तर मी चिठ्ठीत लिहून देतो. चालेल का?"

"हो! चालेल की!"

नंतर थोडा वेळ तो लिहीत बसला-

चिठ्ठी घेऊन मी बाहेर पडलो. बससाठी रांग लावली. बस काही येईनाच. शेवटी करमणूक म्हणून मी ती चिठ्ठी वाचायला सुरुवात केली.

"प्रिय मैत्रीण अलका,

तुझ्या अविरत प्रेमाची साक्ष तुझ्या भावाकडून कळली परंतु माझं तुझ्यावर प्रेम असूनही सफल होणं शक्य नाही. लक्षात ठेव तुझी जात श्रेष्ठ आहे. त्यामुळे तुझ्याशी लग्न केलं तर तुझ्या आणि माझ्या आईवडिलांची छळणूक होणार आहे. माझ्यामुळे आई-वडिलांच्या केसाला देखील धक्का लागलेला मला आवडणार नाही. दुसरी गोष्ट तू श्रीमंत आहेस. माझ्या झोपडीतील दारिद्र्याची झळ मी तुला देऊ इच्छित नाही. मला क्षमा कर! आपण जातपात मानीत नाही, ह्याचा भक्कम पुरावा म्हणून एवढेच सांगतो की भावी आयुष्यात तुझ्या मुलाला मी माझी मुलगी देईन.

पण मला विसरून जा! विसरून जा!!

तुझा केवळ हितचिंतक
सुदाम सोनवणे"

समोरच्या फळीवर डोके टेकून मी खूप गंभीर झालो. माझी ताई आता आयुष्यभर गंभीर राहणार होती.

## उपवर मुलीच्या मागण्या

सदा सर्वदा काळ चैनीत जावा
कधी कामधंदा न लागो करावा
असो सज्ज शय्या सुखे झोप येता
रघूनायका मागणे हेचि आता !
नको खाष्ट सासू, नको दीर जावा
तसा सासरा सांब भोळा असावा
तयांच्या वरी पूर्ण माझीच सत्ता
रघूनायका मागणे हेचि आता !
मला वाटले मी उशीरा उठेन
कधी जाग येता तशीही निजेन
चहा फक्त यावा पुढे हात होता
रघूनायका मागणे हेचि आता !
पगाराची येताच तारीख एक
असो सर्व स्वाधीन माझ्या अचूक
जमाखर्च त्याचा न देईन नाथा
रघूनायका मागणे हेचि आता !
मला पातळे नित्य घ्यावीत उंची
बरी पाचवारी जरी रेशमाची
हवा दागिना तो सणावार येता
रघुनायका मागणे हेचि आता !
कधी मी निघाले फिरावयास जाया
सवे नाथ येवोत पोरास घ्याया
मनीबॅग ती फक्त घेईन हाता
रघूनायका मागणे हेचि आता !
नका बांगड्या त्या रानटी उगाच
असो मनगटी फक्त ते रिस्टवाच
दिसावे असे नीट बांधीत हाता
रघूनायका मागणे हेचि आता !
असो पुत्रकन्या पुरे फक्त दोन
प्रतिवर्षी लेंढार सांभाळी कोण ?
पुढे ठेवी " कंट्रोल " तूचि समर्था
रघूनायका मागणे हेचि आता

**अनिल पांडुरग बोन्द्रे** तृतीय वर्ष, कला

## प्रश्नभेंडोळे

वळणावळणावरुनि उधळत
गर्द केशरी असा फुलोरा
रानफुलांचा परागगंध सांडत
कुठे उगवला पहाटवारा ?
त्या वीणेवर सूर हरवत
हया विणेवर सूर गवसत
हरवत गवसत या सरगमेतुन
कशी निखळली ही तारा ?
रेषा कशी विरामली एक
क्षितिजावर पल्याडल्या ?
रिमझिम वाटांच्या वळचणींवर
हा कोण वेडा पीर भांबावला ?
कसे भुलले तारू एक
चांदण्यातून दुधाळलेल्या ?
फूल कसे ओघळले एक
ओळींतून किलबिलणाऱ्या ?
पिऱ्या पिऱ्या वेड्यावानी
उत्तर शोधत फिरू नकोस
एकच उत्तर आहे सुंदर
प्रश्नमाळा गुंफू नकोस
आपण असतं हुळहुळायचं
सुकलेल्या मनांतून
रिकामा करावा अश्रुपिंड
टिपं क्षणांची दोन गाळून
डोळां झापड लावून चालायचं
कधी अनामिक वाटांवरून
भेदरून हळूच डोकवायच
रेंगाळणाऱ्या कवडशांतून
फुल फुल हळुवार वेचायची
मुग्ध किरमिजी मेघांतून
वाटा आपल्या नेमक्या हुडकायच्या
गुंतलेल्या दिशांतून

**राजू महाजन** द्वितीय वर्ष, वाणिज्य

# ‘ कोंडुरा ’तील घंटानाद

**वासंती इनामदार**
द्वितीय वर्ष कला

मराठी कादंबरीप्रांतात मानदंड ठरावी अशा तोलामोलाची कलाकृती—असे चिं. त्र्यं. खानोलकर यांच्या ‘ कोंडुरा’ला विशेषण द्यावेसे सर्वच समीक्षकांना वाटते; अशी खानोलकरांची ‘ कोंडुरा’—आगळी, वेगळी. झपाटून टाकणारी...!!

खानोलकरांनी आपल्या प्रतिभेने मराठी कादंबरीचा चेहरामोहराच बदलला. त्यांच्या अनुभवविश्वाच्या वेगळेपणामुळे त्यांचं साहित्य एक वेगळी वाट चोखाळताना दिसतं. आजच्या प्रायोगिक कादंबरीविश्वाला त्यांनी गूढ आणि वास्तव जीवनाचा संमिश्र, पण सजीव कलात्मक, रूपकात्मक, काव्यात्मक स्पर्श करून आपल्या असामान्य प्रतिभेने पार्थिव अपार्थिव अशा संघर्षाची अनोखी डूब दिली. नक्षत्रांचे ओंजळभर देणे आपल्या कादंबऱ्यांच्या रूपाने देऊन, हा महान कलावंत नक्षत्रांनाच सूर देण्यासाठी निघून गेला. नक्षत्रांच्यापाशी...!!...!!!

कै. खानोलकरांच्या, संख्येने कमी पण श्रेष्ठतेने अपूर्व असलेल्या कादंबऱ्यांतील ‘ कोंडुरा ’ हे एक दृष्ट लागण्याजोगे नक्षत्र. या कादंबरीतून त्यांनी मानवी जीवनाच्या संदर्भात पाप, पुण्य, श्रद्धा या संकल्पनांना काही अर्थ आहे का हे शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे. हा त्यांचा प्रयत्न जीवघेणा, झपाटून टाकणारा वाटतो.

फक्त पाच पात्रांच्या प्रकृतिवैशिष्ट्यांवर आणि त्या पात्रांच्या दृश्य, अदृश्य शक्तीवरील कमी अधिक श्रद्धा आणि निष्ठा यांतून या कादंबरीची गुंफण झालेली आहे. त्यांच्या कादंबऱ्यांतील प्रमुख व्यक्ती नेहमी विस्कटलेली उसवलेलीच असते. पर्शरामतात्या याला अपवाद नाहीत. त्यांच्या रूपाने खानोलकरांनी मानवाच्या मूलभूत प्रेरणा मनःप्रवृत्ती यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. आणि पापपुण्य, शुभअशुभ, यांचे विलक्षण तुफान ज्यांच्या मनात सतत गर्जत आहे असे तात्या; आपल्याला ऐकू येणाऱ्या घंटानादाचा वेध घेता घेता अखेर अपूर्णत्व लेऊनच वाचकांना सामोरे येतात. वाचकाच्या मनात चिरंतन तरळत राहतात. ग्रीक ट्रॅजेडीतल्या व्यक्ती जशा अपूर्णत्व लेऊन सामोऱ्या येतात असे या तात्यांचे व्यक्तीमत्त्व आहे. आणि त्यांना जाणवणारे भास–अभास हेही अपूर्णत्व लेऊनच संपूर्ण कादंबरीभर स्पष्ट–अस्पष्ट, धूसर स्वच्छ होत अनोख्या प्रतिमारूपाने नियतीच्या रूपाने सामोरे येतात. म्हणूनच त्यातल्या घंटानादाविषयी अनेक प्रश्नांचे मोहोळ मनात उठते.

हा घंटानाद तात्यांच्या मनाचा तीव्र संवेग म्हणून जन्माला आलेला आहे का ?

त्यांनी ठरविलेल्या एखाद्या संकल्पयुक्त शक्तीला प्रेरणा देणारा हा नाद आहे का ?

त्यांनी योजलेल्या उद्दिष्टपूर्तीसाठी वर्तनाची दिशा म्हणून अंतःस्थ शक्ती म्हणून हा नाद उद्‌भवलेला आहे का ?

हा नाद केवळ त्यांच्या मनाचाच खेळ आहे का ?

या नादाचा पापपुण्याशी काही संबंध आहे का ?

त्यांच्या आयुष्याची जी अटळ वाताहात झाली त्यामुळे त्या वाताहातीचे अदृश्य पण तरीही इंद्रियगोचर म्हणून हा नाद कादंबरीत सतत परावर्तित होतो का ?

हे सर्व प्रश्न वाचकांपुढे निर्माण होत राहतात मला स्वतःला जाणवलं ते असं की हा नाद केवळ एकच भूमिका घेणारा नाही. तर मग तात्यांच्या मानसिक विकासाचे सूत्र म्हणून तर खानोलकरांनी तो वापरलेला नसेल ? विश्वाचे रहस्य आणि श्रद्धावान मन आणि मानवी जीवनातील विसंगती यांचं द्वंद्व नादातून आक्रोश करताना दिसतं. **तात्यांच्या संघर्षात्मक मनाची ही एक हलती झुलती तटबंदी म्हणून हा नाद असा प्रतीकरूप होतो.** माणसाच्या मनातल्या श्रद्धेचं एक जबरदस्त अस्तित्व म्हणून हा नाद सूत्रबद्ध होतो. मनाच्या अंतर्मुखतेचा हा

एक अपरिहार्य परिणाम असतो. मात्र 'कोंडुरा'च्या गर्जनेसारखा नव्हे तर त्याहूनही व्यापक सर्वंकष, दिक्काल भेदून अनंत, पृथ्वीच्या अंतापर्यंत टिकणारा, किंबहुना कदाचित काम, क्रोध, लोभ मत्सर या विकारांच्या अंतापर्यंत राहणारा हा नाद फक्त तात्यांपुरताच मर्यादित नाही. तो कुठल्याही व्यक्तीच्या सर्वसामान्य असहाय्यतेमधून एक उद्दीपित प्रेरक म्हणून, विचारांची कार्यक्षमता भासात्मक रीतीने टिकवून धरणारा सुप्त प्रेरक म्हणून, तो मनुष्याच्या अस्वस्थतेचा निदर्शक होतो. त्याचं उद्दिष्ट तर्कदुष्ट असणं सहज शक्य होतं.

कोंडुऱ्यानं सांगितलं म्हणून अनसूयेपासून निग्रहानं दूर राहणारे तात्या, विहिरीला पाणी लागल्यास यतीने दिलेली, गर्भ जिरवून टाकण्याची शक्ती असलेली मुळीही खरी ठरणार म्हणून विष्णूदादाच्या विरोधाचं निमित्त घेऊन ते पाणी दोन हातांवरच खोळंबून ठेवतात. आणि अत्यंत अस्वस्थ मनःस्थितीत खळ्यात येतात आणि इथंच प्रथम, अशा अपराधी मनःस्थितीत असताना (त्यात अनुसूयेचा, म्हातारीने विचारलेला प्रश्नही डाचत असतोच.) खालच्या मठातून 'घणन् घणन् घण' असा घंटेचा आवाज त्यांना ऐकू येतो. इथे खानोलकर सहजतेने लिहून जातात,—"कुठल्यातरी अनामिक पक्ष्यासारखा काळोखातून घनदाट सावल्यात हा आवाज निघून गेला."

आणि मग 'तात्या त्या काळोख्या थंडगार खांबाच्या सभागृहात शून्य होऊन उभे राहिले.' आणि या 'शून्य अवधी'त त्यांची विचारशक्तीच गोठून गेल्यासारखी होते आणि मग असा प्रश्न पडतो की हा नाद भोवतालच्या वातावरणातून उद्दीपित झालेला तात्यांचा केवळ आत्मनिष्ठ प्रेरक तर नव्हे? की वास्तवतेपासून दूर पळण्यासाठी तात्यांचे हे 'स्वप्नरंजन' आहे? तात्यांच्या द्विधा मनःस्थितीतल्या त्या संघर्षाची ही सुरुवात असते. आणि हा घंटानाद इथून दर प्रसंगाला मोठा मोठा होत राहतो. **घंटा स्थिर होता. नाद हलत होता.** "तात्यांना वाटायला लागलं आपण एखाद्या अदृश्य शक्तीच्या हातातील बाहुले आहोत." या नादाची साथ ते आपल्यावर लादून घेतात. कुणाला ऐकू न येणारी घंटा आपल्यालाच ऐकू येते याचं भांडवल आता त्यांच्या 'आतल्या' मनाला करायचं होतं. घंटा ऐकायला ते मुद्दाम आवर्जून घरी येत कधी ते स्वतःशीच प्रश्न विचारीत राहतात. ते प्रश्न आदिम आदिवासी असतात. "मीच का तेव्हढा जगाची काळजी करीत बसू इथं? माझं काय अडलंय इथं? घंटा वाजते काय? नाद उठतो काय? मी धावतो काय? कुठून येतो हा नाद? कोण कुणाच्या नावानं घंटा वाजवतं? या जगात राहायचं तरी कसं?"

तात्यांचा शेवटचा प्रश्न हा मूलभूत प्रश्न आहे. म्हणून तर तो घंटानाद त्यांना ऐकू येतो कारण...कारण माणसाच्याच आयुष्याची वाताहत अटळ आहे. अनादि अनंतातून एखाद्या दिव्य विहंगासारखा त्यांच्याकडे पंख पसरून येत असलेला हा घंटानाद त्यांच्या साथीला होता म्हणूनच ते पार्वतीला गर्भपाताची मुळी उगाळून देण्याचे धाडस करू शकले. आणि तिचा भोग घेण्याची आपली इच्छा तृप्त करून घेण्यासाठी व्रतस्थ अनसूयेवर स्वतःच्या पत्नीवर ते बलात्कार करतात आणि स्वतःच खोदलेल्या विहिरीत आत्मनाश करण्यासाठी ते जातात. त्याचवेळेस हा घंटानाद त्यांना दिलासा देण्यासाठी धावतो. "हा नाद कशाचा आहे? याचा अर्थ काय? पाप आणि पुण्य म्हणजे तरी काय? कुणाचा संबंध कशाशी आहे? आपल्याच डोक्यातला मणी शोधायला हवाय."

हे विचार त्यांच्या मनात येतात. त्यांना वाटतं हा आपल्या पूर्वपुण्याईचा नाद आहे. आणि 'कोमेजलेल्या मोगऱ्याच्या कळीसारख्या जागत बसलेल्या अनसूयेला, वासनेच्या तांबूस डोळ्यांनी पाहताना, या पापी भावनेनंतरही त्यांना घंटेचा नाद ऐकू येतोच. तेव्हा ते मुद्दाम मठात जाऊन पाहतात तर—

"गाभाऱ्यातल्या समाधीकडील दीपज्योती स्थिर होत्या. निर्माल्याचा मधुरमंद वास हवेत पसरला होता."

मूलतः खानोलकरांनी लहानपणी प्रथम पाहिला तो मठच. देऊळ नाही. त्या बालपणात घर करून राहिलेलं मठाचं आकर्षण आणि त्यातल्या घंटांचा आवाज या 'कोंडुरा'त पूर्णत्वाने आकाराला आलेला आहे. 'त्या मठातल्या गाभाऱ्यातला अंधार आणि त्या अंधाराला असलेला तुळशीपत्रांचा वास यातूनच माझ्यातल्या 'मी'ची घटस्थापना झालेली आहे.' हे असं ते स्वतःच सांगतात. ते म्हणतात,

"माझं सगळं बालपण इथून संस्कार घेऊनच संपलं...! अजूनही गर्दीत अंतर्मुख झालो की प्रथम कानांवर येतो तसा भास होतो, त्या बागलांच्या राईतल्या मठातल्या घंटांचा नाद. हीच तर जगण्यातली मोठी गंमत असते. प्रत्येकाला स्वतःला जगण्याला संदर्भ देता येतो. या खोल

नकळत रुजून राहिलेल्या संस्काराचा. माझ्या 'कोंडुरा' या कादंबरीत मी नकळत वर्णन करून जातो ते या मटाचंच."

आणि म्हणूनच त्यांनी उभ्या केलेल्या तात्यांच्या अस्तित्वातून त्यांना पापपुण्याचा प्रश्न निर्माण करायचा नाही. तर माणसाच्या आदिम, मूलभूत भावनांचे दर्शन घडवायचे आहे असंच जाणवते. पापपुण्य ही मानवनिर्मित मूल्ये आहेत. पण हा घंटानाद मानवनिर्मित आहे का, हाच खरा प्रश्न आहे. या घंटानादाच्या साथीमुळेच ते पार्वतीवर मुळीचा प्रयोग करायला धजले का ? कोंडुऱ्याच्या गर्जनेसारखाच हा गूढ घंटानाद चिरंतन चालणार आहे का ? हा तात्यांच्या श्रद्धावान मनाचे आधार प्रतीक आहे का ? हा नाद त्यांना पाप केल्यावरही ऐकू येतो आणि पुण्य ( ? ) केल्यावरही ऐकू येतो. त्यामुळे तो वरकरणी गूढगहन वाटतो. तो तसा आहेही पण त्या घंटानादाने दिलेली शक्ती त्यांच्या डोक्यातला मणी उजळीलच अशी निष्ठा त्यांच्यात नाही. तरीही ते आपलं 'स्वत्व' मिळविण्यासाठी झटताना दिसतात. त्यांचे हे व्यक्तित्व द्रष्टे व्यक्तित्व आहे. त्यांचा हा घंटानाद हा जीवनाच्या आदिम तळाच्या स्पर्शाने सजीव झालेला, खानोलकराच्या संवेदनशीलतेने उभा केलेला, एक प्रतिकात्मक अनोखा अर्थप्रवाह आहे. तो संपूर्ण कादंबरीभर वहात राहातो. हा नाद तात्यांच्या जीवनाला अर्थपूर्णता आणतो तो त्यांच्या अस्वस्थ मनाचा एक समर्थ प्रक्षेप (Projection) असतो. अनसूयेवर, स्वतःच्या पत्नीवर बलात्कार केल्यावरही हा नाद त्यांना ऐकू येतो यावरून हेच सिद्ध होते.

कादंबरीच्या अखेरीला या नादाचा शोध घेण्याच्या मिषाने, आपल्या डोक्यातला मणी शोधण्यासाठी, शक्ती शोधण्यासाठी ते बाहेर पडतात.

पण...पण...एक प्रश्न, या कादंबरीचे वाचन संपवून पुस्तक खाली ठेवताना माझ्या मनात तरळत राहिला तो हा की, लाखो मैल जरी हे परशुरामतात्या भटकले तरी त्यांना या नादाचा अर्थ सापडेल काय ? त्यांच्या मनाच्या प्रक्षेपणाचा शोध बाहेर लागणं शक्य आहे का ?......!! ......!! ......खानोलकर याच अतर्क्य गोष्टीचा, माणसाच्या आदिम मनःप्रवृत्तीचा, जगण्याच्या इच्छेचा वेध या घंटानादाने घेत राहतात आणि पु. ल. देशपांडे म्हणतात त्याप्रमाणे, 'ज्ञानाच्या कुंपणापलीकडे उडी घेण्याची त्यांची ओढ' या घंटानादातून प्रत्ययकारी होते. वाचकाच्या मनात 'घणन् घणन्' करीत राहातो.

---

## व्यर्थ वेडे

आज दारी येऊ नकोस
अश्रूंचे नुपूर वाजवू नकोस
एकाकीच्या तालात नाचू नकोस
आज अमृत नसानसांतून वहातय ग,
हृदयी परिजात फुललाय
आकाशाचं गोरं गुटगुटीत बाळ
माझ्या मनाच्या अंगणात खेळतंय
नक्षत्रांची चंदेरी पाखरं
माझ्या खांद्यावर हसत आहेत ग,
माझ्या वळवळत्या जीवनाचा किडा
फुलपाखरू होऊन आकाशी उडतोय ग,
आज मला ना
गुलमोहरी हसायचंय
अबोली लाजायचंय
बकुळी फुलायचय ग
म्हणून सांगते....
आज उगाच येऊ नकोस
जीवघेणी खदखदू नकोस
काळी सावली पाडू नकोस
माझं जीवन फुलतंय ग,
खुलतंय ग,
उगाच गाली हसतंय ग !

**स्मिता पुंडले** प्रथम वर्ष, शास्त्र

# ' कोंडुरा 'तील व्यक्तिरेखन

**वर्षा प्र. डांगे,**
द्वितीय वर्ष, कला

' कोंडुरा ' ही कै. चिं. त्र्यं. खानोलकरांची एक लक्षणीय कादंबरी. खानोलकरांच्या सर्वच कादंबऱ्या एका अर्थाने लक्षणीय असतात. त्या अर्थाने कोंडुरा देखील लक्षणीय आहेच. पण खानोलकरांच्या कादंबरी संसारात देखील ती एका विशेषाने निराळी उठून दिसते. खानोलकरांची प्रतिभा ही प्रभाकर पाध्यांनी म्हटल्या-प्रमाणे ' आदिम ' प्रतिभा आहे. त्या प्रतिभेला स्थळ-काळाचं बंधन किंवा मर्यादा नाही. ती या अर्थाने स्वैर आहे. वास्तवतेच्या जवळपासही ती फिरकत नाही. फिरकण्याचं कारण नाही. " कोंडुरा मात्र याला अपवाद आहे. वास्तवतेच्या जवळ येण्याचा या कादंबरीचा प्रयत्न आहे. ' अगोचर 'मधला अच्या किंवा ' रात्र काळी...'-मधली लक्ष्मी कधीच खरी वाटत नाही. त्या माणसांचे आविष्कार फक्त खरे वाटतात. त्या आविष्कारांचे संदर्भ शोधू लागताच ती माणसे खोटी वाटतात. खानोलकरांच्या व्यक्तिरेखा त्यामुळेच उद्दाम, आवेगशील, मनस्वी आणि अकारण मनस्वी अशी वाटतात. कोंडुऱ्यात हे बऱ्याच अभावाने घडते.

कोंडुऱ्यातील व्यक्तिरेखा तौलनिकदृष्ट्या अधिक पूर्ण-विकसित वाटतात. कोंडुऱ्यातील प्रधान व्यक्तिरेखा—पर्शरामतात्यांची व्यक्तीरेखा कादंबरीकाराने मोठ्या ताकदीने उभी केली आहे. विरोधलयावर ही व्यक्तिरेखा उभी आहे. अशी व्यक्तिरेखा साकार करण्यामागचे धोके कादंबरीकाराने पुरेपूर ओळखलेले दिसतात. कारण व्यक्तिरेखेचा तोल कादंबरीत कुठेही ढळू दिला गेला नाही. संपूर्ण कादंबरीभर ही व्यक्तिरेखा दोन स्तरांवर जगताना दिसते. एक आंतरिक स्तर आणि दुसरा बाह्य किंवा गोचर स्तर. प्रथम एकाच स्तरावर वावरणाऱ्या या व्यक्तिरेखेचे दोन स्तरांवर वावरणे आणि या दोहो-तील प्रवास कादंबरीकार फार समर्थपणे रंगवितो. पत्नी वयात आली नाही म्हणून 'बांगरासारखे डोळे मस्तकात चढविणारा ' तात्या, विषयासक्तीवरून भावाने हिणविले म्हणून गाव सोडून जाणारे तात्या ही एका आणि एकाच स्तरावर वावरणारी व्यक्तिरेखा होय आणि तेच तात्या ' महाराज ' झाल्यावर ब्राह्यात्कारी साधुपुरुष म्हणून जगणारे आणि मानसिक पातळीवर वासनेनी लडबडलेल्या सामान्य, अतिसामान्य माण-साच्या रूपाने जगणारे असे दोन स्तरांवर वावरताना दिसतात. हा विरोधलय कादंबरीकाराने अचूक पकडला आहे.

कोंडुरा ही कादंबरी मनोविश्लेषणात्मक आहे. प्रमुख व्यक्तिरेखेच्या—तिच्या अनुभवाच्या अंगानी ती उलगडत रहाते. या व्यक्तिरेखेचे विश्लेषण अनेकांनी अनेक अंगाने केले आहे. कुणाला ती व्यक्तिरेखा विकृत, ' कामगंड आणि भयगंड ' यांच्या चमत्कारिक मिश्रणातून जन्माला आल्यासारखी वाटते. एखाद्या भोगाबद्दल उत्कट इच्छा धरायची आणि तो हातात आल्यावर त्यापासून दूर पळायचे अशी तात्यांची मनोवृत्ती आहे. हाती आलेल्या भोगापासून कायमचे दूर पळण्याकरिता तात्या आधार शोधत आहेत आणि कोंडुऱ्याच्या रूपाने त्यांनी तो मिळविला आहे. या मिळालेल्या आधाराकरिता घ्यावे लागलेले, किंबहुना लादले गेलेले सोंग आणि आत्मवंचनेतून होणारी मनाची तडफड, यांतून पर्शरामतात्यांची व्यक्ति-रेखा साकारते, असे ही भूमिका घेणाऱ्यांचे विश्लेषण आहे. पण या विश्लेषणात एक विसंगती वाटते. त्यानंतरच्या आठ-दहा रात्री सोडल्या तर पर्शरामतात्यांनीच पुढच्या सगळ्या रात्री तिच्यासाठी वाळवंटासारख्या " कोरड्या करून पसरून ठेवल्या " असे कादंबरीकार लिहून जातो. जर पर्शरामतात्यात कामगंडच असता तर या भोगा-जवळ एकदाही जायचे त्यांचे धारिष्ट्य झाले नसते.

तात्यांची व्यक्तिरेखा ही नियती आणि आत्मस्वातंत्र्य यांच्या अटळ अशा तणावातून निर्माण झाली आहे, ही दुसरी भूमिका आत्मस्वातंत्र्याकरिता, आपले आयुष्य आपल्याला हवे तसे घडविण्याकरिता तात्या धडपडत असतात. प्रयत्न करीत असतात. पण तो अखेर प्रयत्नच राहतो. माणसाचे आत्मस्वातंत्र्य म्हणजे आपल्या हातात काहीच नाही आणि नव्हतं हा निष्कर्ष शेवटी तात्यांच्या व्यक्तिरेखेने स्वीकारला आहे. असे हे विश्लेषण केले गेले आहे.

पण खानोलकरांच्या व्यक्तिरेखा स्वतःच्या आत्मस्वातंत्र्याकरिता काही करत आहेत असं वाटत नाही. स्वतःच्या प्रज्ञेनुसार, प्रेरणेनुसार त्या वागताना दिसतात. आणि त्यामुळेच त्या काही ठिकाणी मनस्वी होतात. पर्शरामतात्या देखील या अर्थानेच मनस्वी आहेत. तडजोड करण्याची त्यांची कुठेही तयारी दिसत नाही. भावाच्या फटकळ स्वभावाला कंटाळून आणि त्याने विषयासक्तीवरून हिणविले म्हणून अहंकार दुखावले गेलेले तात्या स्वतःच्या पायावर उभे रहाण्याकरिता मुंबईला जाण्यास निघतात आणि एका यतीने दिलेली मुळी पदरात घेऊन परततात. भावाने सतत कोणत्या ना-कोणत्या कारणाने हिणविल्यामुळे तात्यांचा अहंकार स्वतःला प्रतिष्ठा प्राप्त करून घेण्यासाठी काहीतरी कारण शोधीत रहातो आणि ते अखेर त्याला यतीच्या रूपाने गवसते. तात्यांना यती भेटला असेल अगर नसेल. पण स्वतःला सामर्थ्य प्राप्त झाल्याची खोटीखोटीच: समजूत तात्यांनी उरीपोटी सातत्याने बाळगल्यामुळे त्यांना आपोआप घंटानाद ऐकू येऊ लागतो. आता तर स्वतःला शक्ती प्राप्त झाल्याचा निर्वाळाच तात्यांना घंटानादाच्या रूपाने मिळतो. आणि ब्रह्मचर्य पाळणे सक्तीचे होऊन बसते. हे ब्रह्मचर्य पाळताना तात्यांच्या मनाचा होणारा कोंडमारा, पत्नीला उपदेश करण्याच्या निमित्ताने तिच्या जवळ जाणे किंवा वासूच्या कमळासारखे सुंदर पाय असणाऱ्या बायकोने नमस्काराकरिता पायाला तरी स्पर्श करावा अशी तात्यांच्या मनात इच्छा उद्भवणे, यासारख्या छोट्या, छोट्या, प्रसंगातून कादंबरीकाराने कमालीच्या सामर्थ्याने व्यक्त केला आहे.

खानोलकरांच्या व्यक्तिरेखा संवेदनानिष्ठ असतात. अनुभव घेताना संवेदनालाच प्रमाण मानण्याचा त्यांचा आग्रह असतो. खालील वर्णन त्या दृष्टीने फार उल्लेखनीय आहे. " खळ्यात गारेगार काळोख पसरला होता. समोरील माडांची बाग एकमेकात गुंतून फाटलेल्या पडद्याप्रमाणे आडवी-उभी दिसत होती. काळोखात वस्तूंचेच आकार विचित्र श्वापदासारखे झाले होते...माडासारखा माड दिसत नव्हता. तो कसल्यातरी काळोखात आत्ताच उतरलेल्या केवढ्यातरी प्रचंड सापळ्यासारखा दिसत होता...सगळ्या माडाझाडांचे चेहरेच आपल्याला दिसतायत, त्यावरून कुणाचा तरी गिधाडासारखा पंजा फिरतोय...तात्याना वाटलं सगळ्या जगाचं मरून आपल्या समोर भूत झालंय. प्रत्येकातून आपल्या बुबुळावर नखं रोवली जात आहेत. "

खानोलकरांच्या व्यक्तिरेखा बऱ्याचदा निर्हेतुकपणे वागताना दिसतात. एखादा लहान, क्षुल्लक प्रसंग किंवा वरपांगी वाटणारी निरर्थक, अर्थहीन बडबड या गोष्टीही त्या त्या व्यक्तिरेखांना परिपुष्ट करीत प्रधान व्यक्तीरेखा त्यातून अधिक गडद करण्यास मदत करतात. उदाहरणार्थ, बुटक्या बाळीला घेऊन तात्या रवळनाथाच्या देवळात जातात. अत्यंत लहान प्रसंग पण बुटक्या बाळीच्या व्यक्तिचित्रणाबरोबरच तात्यांच्या व्यक्तिरेखेतील लहानसहान अंगावरही त्याने प्रकाश पडतो. सुतारणीची निरर्थक बडबडही तिच्या व्यक्तिरेखेबरोबरच तात्यांची व्यक्तिरेखा विकसनशील होण्यास मदत करतात. आणि मग या निर्हेतुकपणातही एक प्रकारचे पूर्वनियोजन दिसू लागते.

पर्शरामतात्यांच्या प्रधान व्यक्तिरेखेखेरीज अनेक गौण व्यक्तिरेखाही कादंबरीत तितक्याच रेखीवपणे साकार होतात. नारबा जडयेचा स्वार्थी आणि क्रूर स्वभाव कमालीच्या काटकसरीने कादंबरीकाराने रंगविला आहे. वासूच्या व्यक्तिरेखेतून कधी करुणा तर कधी मानवी जीवनाची विफलता झिरपते. " घरातल्या कुठल्यातरी कोपऱ्यात काळोखासारखी घराशी मिसळून गेलेली " अनसूया आणि आपल्या ' वेड्याबागड्या ' नवऱ्यासाठी स्वतःचे स्वत्व जपणारी पार्वती जिवाला चटका लावून सोडतात. स्वतःच्या तान्ह्या मुलाची पर्वा न करता 'देवी' झालेली आणि ' सुतारीणच खलय आता मिया ' हे अखेर कळल्यावर कोंडुरात जीव देणारी सुतारीण, तात्यांच्या मागे, मागे फिरून तांदूळ, नारळ गोळा करणारा, डोळ्यांतून पाणी झिरपणारा तिचा नवरा ' एकाक्ष सुतार ', या तांदळानारळाकरिता सुताराच्या डोक्यात दगड हाणणारा जनार्दन भटजी, नारोबांचा ' नाऱ्या ' असा एकेरी उल्लेख करणारा मात्र आपल्या पोटातल्या व्याधीकरिता तात्यासमोर लाचार होणारा बुटक्या बाळी, फटिंग सडेतोड सोहोनी मास्तर—ही सारी व्यक्तिचित्रे खानोलकरांनी

विलक्षण प्रत्यकारी करून सोडली आहेत. भावनाशयाच्या अनंत छटा आणि रंग या व्यक्तिरेखेतून जिवंत होतात आणि मानवी अनुभवाच्या संमिश्रतेची सूक्ष्म जाण प्रकट करतात.

*

## अशी ही वीस कलमे

एक दोन एक दोन
लवकर करा ब्रह्मदेवाला फोन
विचारा महागाईला जबाबदार कोण ?
तीन चार तीन चार
' लोकशाही समाजवादाचा ' जयजयकार
गरीबांचा होऊ द्या स्वाहाकार
पाच सहा पाच सहा
एकदा स्वर्गात जाऊन पहा
त्या करता थोडासा ' धतुरा ' मिश्रित मिलो खाऊन पहा
सात आठ सात आठ
घोषणा आमच्या सर्व पाठ
कधी होईल ' गरीब ' सपाट ?
नऊ दहा नऊ दहा
भेसळ करून मजा बघा
आणि बरोबर काळा बाजार करूनही पहा
अकरा बारा अकरा बारा
सुजलाम सुफलाम देश हमारा
येथे नाही वशिल्याशिवाय सहारा
तेरा चौदा तेरा चौदा
कुठवर चालणार हा जीवनाचा सौदा ?
काम चालू आहे पुरं होईल का औंदा ?
पंधरा सोळा पंधरा सोळा
करा दारू भरपूर गोळा
सतरा अठरा सतरा अठरा
जरा दम धर रे बेकार जठरा
एकोणीस वीस एकोणीस ' वीस '
सर्वांनी घ्यावे एकदाचे ' विष '

**देशमुख रा. पा.** द्वितीय वर्ष, वाणिज्य

## समांतर रेषा

जर जायचेच नाही तुला
उगाच आशा लावू नको
मीही आठवणार नाही तुला
तूही मला आठवू नकोस
तूही भान हरपतेस स्वतः
मलाही धुंद करतेस स्पर्शात
मृगजळा सारखे कशास मीलन
काय अर्थ त्या व्यर्थ हर्षास
अजून वेडे तुला नाही उमगत
नियतीची कठोर भाषा
विसरू नकोस तू हे कठोर सत्य
आपण आहोत न मिळणाऱ्या
समांतर रेषा—

**चव्हाण पी. एस.** प्रथम वर्ष वाणिज्य

## बादल

स्मशानाची अवकळा
अंगणास आली
संजीवनी इतक्यात
ह्याला लाभली
डोलणाऱ्या प्राजक्ताने
ओंजळ भरून
फुले फेकताच गेले
अंगण बहरून

**सविता टेंबे** १२ वी शास्त्र

# नक्षत्रांचे देणे

**राजू महाजन**
द्वितीय वर्ष, वाणिज्य

एखाद्या कुंद संध्याकाळी, धूसर ढग दाटून यावेत, सारी क्षितिजे गुमनाम व्हावीत आणि मग भावनांचे अनेक थेंब वेडेवाकडे, आडवेतिडवे, तिरकस बागडत जमिनीवर उतरावेत आणि निळ्याशार गारव्याबरोबर मनाच्या कप्प्याकप्प्यांतून स्पंदून जावेत असं कधी झालंय ? असा अनुभव घ्यायचाय ? तर मग हळूच पान उघडा ' नक्षत्रांचे देणे 'चं.

नक्षत्रांहूनही सुंदर असा हा काव्यसंग्रह एका वेड्या सायंपक्ष्याच्या अतिशय संवेदनाशील अशा मनातून आकार घेत उतरला आहे. अनेक सारे भावनारंग आभाळात उधळत आहेत. या सायंपक्ष्याचं नाव आहे. चिं. त्र्यं. खानोलकर ! हा एक असा हिरा होता ज्याचं मोल आम्हाला आतापर्यंत कळलंच नाही. आणि त्यामुळे हाती लागलेल्या आयुष्यातही तो ज्या उत्कटपणानं जगला, त्यामुळेच मन भारावून जातं. ' नक्षत्रांचे देणे ' मधील एक एक कविता त्याच्या प्रतिभा फुलोऱ्याची मूर्तिमंत साक्ष आहे. एक वेगळाच अनुभव, एक वेगळीच मिती, शब्दसामर्थ्याची एक वेगळीच झलक त्यांच्या कवितांतून उतरली आहे. त्यांच्या सहवासानेच मी बेभान झालो आहे. वेडा झालो आहे.

खानोलकर पहिल्यांदाच ' कविता ' या कवितेमध्ये म्हणतात, ' माझ्या या कवितेच्या वाटेला जाऊ नका ', खरंच, खानोलकरांची कविता फार फार भावनाशील आहे. हुळहुळणारी आहे. तिला हाताळायचं तर हात चांदण्याहूनही पारदर्शक करावे लागतात, आपलाच आत्मा एका स्वातीच्या थेंबासारखा तळहातावर घ्यावा लागतो. वाटेवरून फूल चुकवत फार फार जपून चालावं लागतं. चुकून जर कवितेला धक्का लागला, तर त्यातले रानचिमणे विभ्रम हुडहूळून जातात. शब्दांचे अर्थ अंतरिक्षात उद्ध्वस्त होतात. आणि म्हणूनच, या माणसाला समजावून घ्यायचा, तर मनाच्या गाभाऱ्यात निमिषमात्रात उमटून जाणारे सूक्ष्म भावना पडसाद टिपून घेण्याइतके तुम्ही संवेदनाशील हवेत. त्यासाठी भावनांची खोली अनुभवली पाहिजे. त्यासाठी काळोखी दाटत चाललेल्या क्षितिजावरला, अजून रेंगाळणारा एक किरण व्हायला पाहिजे. खानोलकरांनी ही ताकीद पहिल्यांदाच दिलीय.

खानोलकरांच्या कवितेतून दोन रेषा जाताना सापडतात. एक आहे स्तब्ध, शांत आणि उदास रेषा. ही उदासी अनुभवातून वर आलेली आहे. ही उदासी एखाद्या तीराप्रमाणे मनाला उदास करते. त्यांची वळणं ही कविता त्यांचा हा सूर जास्त ठसवते.

> वळणावर रस्ता येतो,
> रस्त्यापाशी वळण येते,
> वळणावरून कोण येते ?
> वळणावर काळीशार
> आडवी तिढी
> सावली.
> येते...पसरते लांब लांब.

आयुष्यातील ती उदासीन वळणे आणि त्यावरून पसणाऱ्या लांबचलांब सावल्या ह्या उदासीचे ओले पदर आहेत.

' दिवे ' या कवितेतूनही त्यांच्या कविमनाला प्रकाशातून जातानाही अंधार चाचपडत होता हे स्पष्ट होते. या जीवनाची खरी किंमत ते ' भुते ' या कवितेतून सांगून जातात. कधी कधी उंबरठ्यावर उदास मन अडकले असताना येणारा अनुभव व खानोलकरांची ' अर्थ ' ही कविता टिपून घेते.

> अर्थ कशाचा पाहसी ? कोरी पाटीच हाताशी
> फक्त धापा; कुठे खोपा ? आल्या चिमण्या दाराशी

पण ही उदासी परमोच्च बिंदूला पोहचते ती ' पारवे '

आणि 'गाडा' या कवितेतांन. 'पारवा' ही कविता खरोखर एका भटक्या तत्त्वज्ञाने गायलेले जीवनगीत आहे. त्यातील उदासी ही मनाला त्या भावनेचा खरा स्पर्श सांगते, समजावते.

जन्म अन् मृत्युमधे ते, ते घरी अन् अंतरी,
कोण मी अन् का इथे मी प्रश्नचिन्हांच्यापरी ?

ह्या ओळी नाना प्रश्नचिन्हे मनासमोर उभी करून जातात. पण त्याच कवितेतील

हालली का गर्द जाळी, कांपरे झाले दिवे ?
गोठलेल्या अन् गळ्यांचे स्तब्ध येथे पारवे

ह्या ओळी ह्या उदासीचे आणि प्रश्नचिन्हांचे सुंदर उत्तर आहेत. जीवनात आपण सर्व उदासी गिळून टाकून सर्व प्रश्नचिन्हे विरामून टाकून फक्त पारव्यांप्रमाणे गोठलेले आणि स्तब्धच राहू शकतो. हे विदारक सत्य ही कविता सांगून जाते.

'गाडा' ही कविता मात्र साऱ्या प्राणिमात्रांना कळत वा नकळत पडलेल्या एका वर्षानुवर्षाच्या प्रश्नाला वाचा फोडते. माणूस निरनिराळे पडदे फेडून जगतो, आयुष्यावर वेगवेगळे रंग सांडवतो, पण मग खूप रक्त ओकलं की त्याच्या लक्षात येतं की आपला सारा हिशेबच चुकला. आपण जे काही केलं, त्याला अर्थच नव्हता. ते कुणासाठी केलं हे आपल्याला माहीत नाही. साध्य मृगजळाप्रमाणे ठरल्यानंतर येणाऱ्या या अशा उदासीनतेला सीमा नसेल ही भावना, आपल्या मितींच्या कोनातच बसणार नाही. आपल्या सप्तकिरणांनी ती रंगवता येणार नाही. म्हणूनच त्यांच्या

कुणासाठी भरू पाहे डोळां ऐसे उष्ण पाणी ?
कुणासाठी झरताहे, झरा गप्प ऐशा रानी ?
कुणासाठी झरताहे आयुष्य हे क्षणोक्षणी ?
कुणासाठी रस भरे सालोसाल फळांतुनी ?

ह्या ओळी, हृदयाला आत कुठेतरी छेदतात, प्रश्नचिन्हांचे अनेक गाडे डोळ्यांसमोर उभे करतात. हा जीवनाचा अर्थ खानोलकरांना समजला होता. जीवनाचा अतिशय खोल आशय त्यांना उमजला होता. आणि त्यावर उपाय नाही हेही त्यांना कळलं होतं, म्हणूनच ते पुढे म्हणतात.

प्रश्न नव्हे पतंग अन् खेचू नये त्यांची दोरी
आणि खेचली तरीही मिटेल का चिंता सारी ?

असा हा त्यांच्या सप्तरंगी इंद्रधनुष्यातील उदासीचा रंग. एखाद्या 'तरुण वेश्येच्या गर्भाशया'प्रमाणे उद्ध्वस्त आणि एखाद्या पानझडीतील उदास सायंपक्ष्याप्रमाणे गोठलेला आर्त स्वर.

आणि ही दुसरी रेषा, रंगीबेरंगी, आनंदी जीवनाचे उमलते उन्मेष रंगवणारी, धुंद स्वैर गाणारी. दुधाळलेल्या चांदण्यातून नौकाविहार करणारी अशी ही दुसरी मिती 'दुसरा रंग' जीवनाचे असे चित्र रेखाटताना सुकलेल्या पाचोळ्यावर पहिल्या पावसाचे टपोरे मोती टपटप आवाज करत पडत असतानाचा असा एक नवा अनुभव ते घेऊन जातात.

चाचपडावे जसे चांदणें वनराईतून तसे चालणे.
घन वळला घन घनघोरपणे,
मनमोर तिचा मनमोर,
आनंद करी, लखलखाट,
हिच्या अंगांगांच्या गर्दपणेः
घन वळले घन एकत्रपणे.

या ओळी फुलांचे गंध आणि इंद्र धनुष्याचे रंग शब्दाशब्दांतून खेचून आणतात तर.

ही वेळ गाण्याची दूर डोंगराची रेघ
खोलवर चकाकतेय, एक किरमिजीमेघ

ह्या ओळी उत्फूर्त गाणे ओठांवरून ओघळवतात. ही भावना उदासभावनेच्या मानाने कमी कवितांतून आहे पण केवळ तिचे अस्तित्वही खानोलकरांच्या स्वभावाचे पैलू दाखवते.

या कवीची शब्दांची एक वेगळीच बलाकमाला आहे. त्यांच्यात एक आगळेवेगळे सामर्थ्य आहे. तो खास खानोलकर टच् आहे. श्यामघन, वनभोर, संधिप्रकाश, काळोखकोने, रानचिमणे, सायंचकोर, रानपक्षी, ऐक गारगारसा मेघखंड, जडशीळ, किरमिजी फुलोरा, पानझड, कंचकाले सांजतारा, मिनिटांमिनिटांमधील लोलक हे सारे शब्द अगदी सरळ पायवाटेने मनापर्यंत येऊन भिडणारे आहेत. खानोलकरांच्या सुंदर विचारांना या सुंदर शब्दांची योग्य साथ मिळाल्याने त्यांची वर्णनशैली अफाट झाली आहे. अनामिकाच्या चाहुलीने थरथरणाऱ्या कळीच्या तमाची कंपने सांगणारी ती वर्णन क्षमता आहे. 'निसर्गचित्त' या कवितेतील.

नक्षत्रांनी गोंधळलेल्या काळोखातून सौम्य आभाळी तिचे डोळे."

हे वर्णन उत्कृष्ट आहे. 'सूर्यास्त' या कवितेतील

जाहला सूर्यास्त राणी खोल पाणी जातसे
दूरचा तो रानपक्षी ऐल आता येतसे

ह्या ओळी मनाच्या खरोखरच त्या ऐलतीरावर नेतात आणि मावळत्या किरणांच्या रंग करामतीत रंगवून टाकतात. 'संध्याकाळ' या कवितेतून त्यांनी संध्याकाळचे केलेले वर्णन अप्रतिम आहे.

खानोलकरांच्या कवितेतील उदासी आणि आनंदी समाधान या दोनही रेषा समांतर आहेत. दोघीही आपापल्यापरीने श्रेष्ठ आहेत. पण त्यांची उदासी ही मनाचा पगडा लवकर घेते. त्यांच्या स्वप्नाळू डोळ्यांतील दूरच्या स्वप्नगावास जाण्याची आसही त्यांच्या कवितांतून प्रतिबिंबित झाली आहे.

तेव्हां मलाच माझा वाटेल फक्त हेवा.
घरदार टाकुन मी जाईन दूर गावा.

त्यांच्या मनाने वसवलेली ती आदर्श स्वप्नगावे आपल्यालाही भुरळ पाडतात, अशा एका रिमझिम वळचणींच्या गावाला जाण्याची आस मनाला लागते. ही आस त्यांच्या

एका रिमझिम गावी भरून आहे हृदयस्थ तान
पण स्वागत विसरून तिथे जाता आले पाहिजे.

ह्या ओळी अधिकच स्पष्ट करतात. पण तरीही अशी वाटच नाही की या गावाला घेऊन जाईल हेही त्यांना माहीत होते.

ह्या माणसाचा उरलेला सर्व भाग ह्याने अशा लोकांसाठी वेचला आहे ज्यांच्या घरांवरून निरंतर घाणा फिरत राहिला आहे. अशा दीन दलितांच्या, झोपडपट्ट्यांतील मृत श्वासांच्या जीवघेण्या वेदनांना खानोलकरांनी वाचा फोडली. 'सामन्यातील गाणे हे त्याचे मूर्तिमंत प्रतीक आहे. ही दलितांची लक्तरे आपल्या काव्यातून प्रतिबिंबित करण्यासाठी प्रथम त्यांनी साऱ्या जगाला जागे केले आहे. त्यांच्या 'जाग आली' या कवितेमधून त्यांच्या

"एका सरळ रेषेला एकाएकी इजा झाली.

वक्र झाली...थांबली...भांबावली ह्या ओळींनी वाचणारा खडबडून जागा होतो.

फिरो पृथ्वी, फिरो घर, की नांगर,
घरावर...मात्र फिरो घाणा निरंतर.

या ओळी फुटपाथवरील बेघर जीवनांची करुण कहाणी आहेत, या ओळींतून अशा जीवनांचा उद्वेग संतप्त आणि उपहास खच्चून भरला आहे. ज्यांचा जन्माआधी अस्त झाला, मरण ज्यांना व्याधीप्रमाणे आले आणि जे आयुष्यभर कातल्या गेलेल्या पंजावरील नशीबरेषा चोरून शोधत दुसऱ्यांचे ओझे घेऊन हिंडले अशा आयुष्यांसाठी त्यांची कविता रडत आहे, झुरत आहे. 'सरणार्थ'मधील या ओळीच पाहाना.

अगदीच कोणी रस्त्याकडेला, स्वस्तात मरता,
नयनात दोन्ही
उत्स्फूर्त भीती...वेळीप्रसंगी, उडवी खांदे देतोही
वन्ही

अशा या चिरडून मरणाऱ्या जीवांच्या थांबलेल्या किंकाळ्यांवरील विरामचिन्हे काढून घेणाऱ्या खानोलकरांचे मोल अमोल आहे. त्यांचा प्रश्न त्यांनी दोन सुंदर ओळींतून शेवटी उभा केला आहे—

संपूर्ण मी तरु की आहे नगण्य पर्ण
सांगेल राख माझी गेल्यावरी जळून

या प्रश्नाला उत्तर फार मोठे आहे, खानोलकरांचं, त्यांच्या कवितांचं मोल एवढं आहे की लक्ष लक्ष तरुही फिके आहेत, कोणत्याही एका मापात त्यांना बसवता येणार नाही. कोणत्याही एका साच्यात त्यांच्या आशयाला बसवता येणार नाही. तो या महान कविवरचा अन्याय ठरेल. त्यांच्या ओघळणाऱ्या ओळींवर एकाच अर्थाचा पूर्णविराम देऊ नका.

अर्थाने आणि आविष्कारानेही अरे माणसा कोणत्याही जिवंत माणसापेक्षा तू अधिक उत्कटपणानं जगलास, इतकं ऋण करून ठेवलंस आमच्यावर अन तरीही म्हणतोस,

गेले द्यायचे राहून तुझे नक्षत्रांचे देणे
माझ्यापास आता कळ्या आणि थोडी ओली पाने

अरे, देणं तर आमचं काहीच नव्हतास तू. पण तुझ्या या ओल्या पानाचं आणि कळ्यांचं एवढं प्रचंड ऋण लक्ष लक्ष नक्षत्रांची देणी, लक्षलक्ष वर्षांनी सव्याज फेडली तरी फिटणार नाही. डोळ्यांच्या बाहुल्यांना पारदर्शकता मोजण्याची जी शिकवण तू दिलीस, तिचे मोजमापच नाही, जीवनाचे जे विविध पदर तू उलगडवून दाखवलेस ते पाहाताना होणारा आनंद लक्ष लक्ष आनंदसागरही देऊ शकणार नाहीत. वाईट तर आम्हालाच वाटतं, की आम्हाला 'जाग आली' फार उशीरा, जेव्हा, तुझे 'जाईन दूर गावा'चे स्वप्न खरे ठरले होते. या तुझ्या नक्षत्रांच्या ऋणांच्या परतफेडीत आमचे फक्त अश्रूच पडतील, कारण तेवढेच ते आमच्या जवळ पण...पण त्यांनीही कदाचित तू विटाळशील- कविता तुझी...निसटून जाईल दोन आर्त स्वरांमधल्या रिकाम्या स्वर्गात...म्हणून ...म्हणूनच तुझ्यापाशी जाणाऱ्या पायवाटांचा गुंता सोडवत...आम्ही थांबलो आहोत... ★

# परमहंस

अविनाश धर्माधिकारी
तृतीय वर्ष, वाणिज्य

नदीतून वर येत आजचा सूर्य तेजाने निथळत होता. त्याचे किरण पाण्यातून दूरवर पसरलेले-त्यातला एक किरण साधून त्याच्या टोकाशी मी नित्यक्रम नदीच्या घाटावर नुकताच स्नान करून उभा होतो...भगवं अधरीय मांड्यांना चिकटलेलं. उत्तरीय नव्हतंच. दाढी-तून पाण्याचे थेंब गळत होते...मानेवर रुळणाऱ्या कुरळ्या केसांची ओल मानेला जाणवत होती.

घाटाच्या शेवटच्या पायरीवर मी उभा...ही पायरी नदीत:बुडालेली. छोट्यांना स्पर्शून पाणी गरगरत परतत होतं. पूर्वेकडे तोंड केलं. मुखावर उगवता रक्तिमा पसरला. वाकून ओंजळीत पाणी घेतलं. 'ॐ भूर्भुवःस्वः... धियो योनः प्रचोदयात्' सकाळी नदीत स्नान केल्यामुळे शरीरात ऊब भरलेली सर्वांगातून किरण आत शिरत आहेत....आमच्या बुद्धीला तो प्रचोदना देवो. बुद्धीला! आणि 'माझ्या' नव्हे आमच्या!...एकशे आठव्यांदा अर्घ्य देण्यासाठी जलतत्त्व ओंजळीत साठविलं...प्राण फुंकरीत म्हटलं...ॐ भूर्भु...

छुन् छुन् छुन्. गावाकडच्या धुळीच्या रस्त्यावरून ती येत होती. जरीची शुभ्र किनार असलेली काळीचोळी काळं लुगडं. डोक्यात धवल बिंदी आणि हातात माझ्या अन्नाचं ताट. रोजच यायची ती. ताट ठेवायची. नमस्कार करायची आशीर्वाद घ्यायची अशी तिची श्रद्धा बापडी. तशीच ती आजही येत होती धुळीत पावलं उमटवीत.

धुळवडीचा रस्ता मंदिराकडे जाणारा. जुनं भक्कम हेमाडपंती मंदीर. मंदिरापासून उतरत्या सुमारे चाळीस पायऱ्यांचा घाट. नदीत बुडत जाणारा. सुबक. त्याच्या मध्यावर एक कमान होती. मी उभा आहे इथून बरोबर पाहिलं की त्या रेखीव कमानीतून मंदिराचा कळस दिसायचा.

हात आपला तसा थांबला. ओजळीत पाणीही अर्पित होण्याची वाट पहात...हसरा सावळा चेहरा...काळा वेश. पवित्र प्रामाणिक काळा रंग देखील तेजस्वी असतो हे माझ्या पहिल्यांदा लक्षात आले. क्षण गोठला. जगतातील गती माझ्यापुरती सापेक्ष थांबली. सर्व आवाज स्तब्ध. शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध सारे सारे स्तंभित. फक्त छुन् छुन् . छुन्...

आता त्या कमानीतून ती दिसायला लागली. कळस लपला. प्रसन्न हास्य...जललहरी सारखी थिरकत्... पायरीपायरीने जवळजवळ.

आणि ..

सर्रकन नागाने फडा काढला. क्षण दोन क्षण डोलत किरण साधून डंख मारला. मी पळत सुटलो कड्याकडे. वाटेवरून स्वतःच्या पायाने. विष रक्तात भिनलं आणि चौवाटांनी धावत सुटलं मूठभर हृदयाचा ग्रास करायला. रक्तातल्या उकळीनं शरीर थडथडायला लागलं...कड्या पर्यंत पोचलो...रक्तानं हृदयाची दारं ठोठावायला सुरुवात केली.

ती समोर येऊन उभी राहिली. मान खाली घालून ताट समोर धरून.

सूर्याला अर्घ्य देण्यासाठी हातात घेतलेलं पाणी तसंच सांडून गेलं. वाहत्या नदीला मिळालं आणि उताराकडे धावत सुटलं.

हो वेळी अवेळी फडा काढणारा बेभान नागराज ओळखीचा होता. डांबरी रस्त्यावरनं...चौकांमधून फिरताना हा पाठलाग करायचा. चित्रं, जिवंत शिल्पं पाहताना विळखा घालायचा. डंख करायचा. हे नको होतं मला.

तसं त्यात काही चूक नव्हतं. सगेसोयरे हा डंख आनंदाने, समारंभपूर्वक घेताना मी पाहात होतो. त्याचे निळे, लाल डाग अंगावर घेऊन ते कौतुकाने फिरायचे. ते विष टोचून घेऊन बेभान सुख अनुभवण्याची वाट पहा

आमुसलेले...पण मला ते नको होतं. नको आहे.

म्हणून तर इथे आलो. तिथून लांब निळ्या आभाळाखाली...सगळे बंध तोडून कारण गळ्याभोवती पडलेले ते नागाचे बंधन तोडायचे होते पण इथेही आला होता. वेळ साधून डसला होता.

पाणी झटकत वळलो तिच्याकडे. एकदा डोळ्यांनी नखाशिखांत न्याहाळली ती श्यामा...

ॐ सत्यम्...

पाऊल पुढे टाकले. हात वर केला...

अन् कोणीतरी केस पकडुन झिंजाडल्यासारखा उभा राहिलो कापत. कडा आणि पतन. विष आणि मरण, सीमारेषेवर. थरथर गात्रांमध्ये. गतिमान झालेला काल पुन्हा थांबला. भविष्यात काय होते ते पाहाण्यासाठी.

झटक्यासरशी लगाम खेचले. टाचा भक्कम रोवल्या कड्याच्या टोकावरच. हृदयाकडे जाणारं रक्त...हृदयाचं काय...आपल्याकडे येणारं रक्त शुद्ध करून शरीराकडे पाठवायचं एवढंच काम. येणारं रक्त काय घेऊन येणार ...ते...

"...आमच्या बुद्धीला तो प्रचोदना देतो..."

ते विष रोखून धरलं. डोक्यात व साठायला लागला. ठोक्याठोक्याने...लाल लाल चेहरा...शिरा टरटरून फुगलेल्या...डोळ्यात खून उतरलेले...दिशा झाकोळल्या आता कातडे फोडून या रक्ताच्या चिळकांड्या उडणार तिच्यावर...माझ्यावर...शिंतोडे उडवीत जगभर जीवनभर...असं वाटलं.

पण वाटायच्या आधीच घडलं...दिशा उजळत गेल्या सावकाश...रक्त उतरत गेलं...मस्तकातले घणाघात अवरुद्ध झाले...शांत...शांत...धूपानं भरलेल्या उपासना-मंदिरात तंबोऱ्याची तार झंकारावी...तसं शांत... देहमंदिर...अन आतापर्यंत सावरून धरलेलं शरीर खचलं. शक्तिपात झाल्यासारखा कोसळलो तिच्या पायापाशी. 'माते, मला क्षमा कर' म्हणत. तिनं एक क्षणभर पाहिलं. वाकत झटकन हातातलं ताट सोडलं. दाणकन ताट आदळलं. पदार्थ एकमेकांत मिसळले. गर्रकन् ती वळली नमस्कार करूनच. तोंडात पदराचा बोळा घालून हुंदका आवरत ती सुसाट सुटली. घुंगरू वाजवत...

बराच वेळ पायऱ्यावर तसाच हडून राहिलो. गलितगात्र. पायाला पाणी स्पर्शून जातच होते. नदी वाहात राहिली. पायऱ्या तापल्या. चटके बसायला लागले तेव्हा शक्ती गोळा करीत उठलो. कमानीतून दिसणाऱ्या कळसामागे सूर्य तळपत होता. डोळे दिपून गेले.

अंतरंगात तो परावर्तित प्रकाश पसरला. उजळून निघालो. शक्ती ग्रहण केली. तेव्हाच त्या नागाशी युद्ध पुकारलं.

मी वेडाच. तसं म्हटलं तर हे सगळं करायची काही जरूर नव्हती पण माझ्या डोक्याने वेगळंच वेड घेतलेलं. एवढा मोठा नाग ज्याचं रक्षण करतो, तो खजिना कसा असेल. किती प्रचंड, किती तेजस्वी, माझी चौऱ्याऐंशी लक्ष पिढ्यांची संपत्ती आत दडलेली असणार. माझ्या आयुष्यातले गुंते सोडवायचे धागे त्यात असणार. बस्स, मला ती संपत्ती हवी. मग त्याच्या डंखाचं सुख वाटेनासं झालं. तो बेभानपणा मला परतंत्र करणारा वाटायला लागला. त्या पलीकडे...ती मुक्ती!

आपण कुठलं संकट मोले घेत आहोत. हे त्या वेळेला लक्षात नाही आलं. आता मी ओळखतो की मी एका कड्यावरून चाललो आहे. इथून एकतर पोचणार आहे गगनाला गवसणी घालायला. कळसाआड तळपणारा सूर्य हस्तगत करण्यासाठी नाही, एक तळपता सूर्य होण्यासाठी. नाहीतर कोसळून पडणार आहे खालच्या गर्द अरण्यात. बरेच कोसळून पडले आहेत तिथे.

मग सुरू. काळाच्या ठोक्याबरोबर युद्ध...त्या बांध घातलेल्या नदीच्या किनारी ...तप.

वाहणं हा तर नदीचा गुणधर्म पण तिला इथे बांध घातला होता. उन्हाळ्यातसुद्धा आजूबाजूला ती ओलावा पुरवायची. काठावर हिरवीगार शेतं बहरली होती. आणि भरलेल्या नदीतून आपल्यासाठी पाणी घेऊन लोक सुखी होत होते. जग आनंदाने शिंपून काढत होते. संयमित सरितेकाठी.

मी! ते फक्त अडविणारा! मला त्याचा उपयोग फक्त अर्घ्य देण्यासाठी.

टाचा रोवल्या...मुठी मिटल्या...उघड्या बोडक्या खडकावरचा मी एक निश्चल खंड शैल झालो. अर्घ्य देत त्या नागाला घट्ट आवळून धरलं सगळीकडून अंधारून आलं. नागानं विळखे चढविले. तडफड सुरू केली. त्याचं सामर्थ्य प्रचंड होतं. एकदा तो सुटला की खलास...एक भ्रष्ट देह...नदीकिनारी म्हणून प्राणांतिकतेने शक्ती एकवटून आवळून धरले.

दोन दिवस खायलाच मिळालं नाही. ती आली नाही ना! मंदिराच्या ओसरीवर म्लान पडून राहिलो दोन

दिवसांनी घुंगरु नाही वाजले...दबकते पाय बोलले. ती मंदिराच्या दारात उभी राहिली. अंधाऱ्या मंदिरातून दारात फक्त आकृती दिसली. मग सावकाश पुढे माझ्या पायापाशी ताट ठेवायला वाकली. किंचित पदर ढळला. चेहऱ्यावर लाली उतरली...मोहक.

पुन्हा तडफडून शिवलिंगाला मिठी मारली. नागराजाची शक्ती वाढत गेली. फुस्कारत फणा काढला. डोलायला लागला...आता डंख...आपली शक्ती कमी पडणार तो पकडीतून निसटणार...श्वास घुसमटायला लागला...मग एकदम वाटलं की आपली शक्ती आटत चालली आहे. आडविलेल्या प्रपातामधून वीज निर्माण होत आहे आणि कडाडत उजळते आहे माझं देह मंदिर...

आता मी चाललो आहे भरारत गरुडासारखा. चोचीत त्या तडफडत्या नागाला पकडून...माझ्या विशाल पंखांनी वैशाखवणव्यात पोळणाऱ्या पक्षिगणांना सावली देतोय. डोळ्यांमधून तेजशलाका प्रक्षेपित होतायत.

मग रोज ती निर्धास्तपणे येऊ लागली.

एखाद्या वेळेस माझ्या ताटातलं फळ मी तिला द्यायचो नी आनंदाने नाचत जायचो. त्यादिवशी ती आली साक्षात लक्ष्मीस्वरूप. आपल्या आई बाबांना घेऊन हिरव्या बांगड्या खळाळवत मला नमस्कार केला. तिच्या गळ्यात निळा रत्नहार होता. ती नमस्कार करून उठताना तो हार घड्याळाच्या लंबकासारखा हलत राहिला....

निळा...हार निळं रत्न...तेच त्या नागराजाच्या मस्तकावर आहे...त्यानं फणा काढला होता तेव्हा त्याचं दर्शन घडलं...असीम, नीलीम तेज. देहात क्षणैक तो नील प्रकाश झगमगून गेला. त्यानंच त्या निर्णायक क्षणी आवश्यक ती शक्ती पुरविली होती. त्याचंच मला वेड लागलं...तो नीलमणी हवा. नागाला जिंकून. आता ते भांडारही नको. ते उघडेलच. पण ते उघडायचे ते त्यातली संपत्ती विश्वात उधळण्यासाठी...माझ्यासाठी नाही. मला फक्त नीलमणी हवा. शब्दातील कल्पांतापाचा. चिरंतन.

नागराज गतप्राण झाला!

तेव्हा डोळ्यांसमोर ब्रह्मांड गरगरलं...लाल, पिवळ्या हिरव्या रंगसमुद्रांचा बेभान पाशवी नाच झळाळला... उसळत्या तुफानी बहुरंगी लाटा...

पण त्या साऱ्या भूत, वर्तमान, भविष्याच्या कालसीमेच्या चतुर्थमितीच्या पलीकडे अमित...नीलमणी...निश्चल... आणि म्हणून मीही निश्चल.

आणि त्या मण्यात बांधलेलं तेज हस्तगत करायला गेलो तर काय...मणी अनुपस्थित. तो नव्हताच त्या नागाच्या फड्यावर तो मणी ही होती एक अव्यक्त संकल्पना. निर्गुण.

आता मीच तो व्यक्त. अंतर्बाह्य नील ईश्वर! भांडाराची दारं उघडली. माझ्या चौऱ्याऐंशी लक्ष जन्मांच्या संपत्तीचा प्रकाश सप्ताश्व रथातून उधळत जगभर पसरला. अष्टसिद्धी, चौसष्ट, कला चेचाळीस गुण. मी अनासक्तच.

दारं उघडल्याचं सर्वत्र पसरलं. सगळे धावत आले. पाचही ज्ञानेंद्रियांनी उपभोगायची संपत्ती...गोड... देखणी...कोमल...सुगंधित...अनाहत नादाचं संगीत...

दुर्गंधीला विटलेल्यासाठी सुवास...आपसात भांडून कान किटलेल्यांसाठी एकतानतेचं मधुर संगीत आणि रक्तबंबाळ देहरथ हतबुद्ध...स्वतःच्या पायात पाय घालून अडखळणारे...म्हणून पडता पडता इतरांच्या पायात पाय घालणारे...कारण डंख मारणाऱ्या नागाच्या वेड्यात अडकलेले...स्वतःला अडकवून घेतलेले.

सगळे धावत आले. आपली दुःखं आपल्या पिशव्यात भरून...भांडारात घुसले. दुःख रिकामी केली आणि भांडारातली संपत्ती भरभरून परतू लागले...

एक भक्त धावत आला. म्हणाला, "महाराज ते तुमची संपत्ती लुटून नेत आहेत."

मी म्हटलं, "लुटून नाही नेत. मी देत आहे. पण त्यांना काही उपयोग नाही. त्यांना त्यांच्याच संपत्तीचा उपयोग. त्यांना स्वतःचच भांडार उघडायला हवे आणि तेही स्वतःच. मी फारतर 'ते उघडायचे असते' एवढच सांगू शकतो.

काही न समजल्यामुळे बरंच काही समजलं असं दाखवून मान खाली घालून तो उभा राहिला. कारण ती येत होती. चेहरा किंचित प्रौढ. चेहऱ्यावर नवनिर्मितीचं तेज. भारानं ती झुकलेली.

मी विचारले, "काय हवे आई!"

ती वदली, "काहीही नको."

"आशीर्वाद सुद्धा!"

"........"

न बोलता तिनं ताट खाली ठेवलं. ती मला ते देण्यासाठी आली होती. पहिल्यासारखीच. माझ्याकडून काही मागण्यासाठी नाही. सगळं काही तिच्यापाशीच आहे. शोधायला हवं.

मी निर्विकार आनंदाने हात उचलले. " सुखी भाव " म्हटलं.

आता मी निरपेक्ष आहे. चैतन्यरूप आहे चिरंजीव आनंदी आहे. माथ्यावर निळेशार आकाश...सभोवताली निळा दर्या असा उसळलेला...फेसाळलेला...पण त्यातल्या एका खडकावर मी अस्पर्श...अचल... उगवत्या आणि मावळत्या सुद्धा सूर्याच्या साक्षीने माझ्या उत्तरेला बाहू पसरून उभ्या असलेल्या विशाल भूशैलावर मुठी उधळत असतो सुवासाच्या...सुकृताच्या ...विराट शक्तीच्या.

*

---

## कधी वाटते

कधी वाटते, जगायचे कशाला
का काढायचा निष्फळ जिण्यातून अर्थ
साधायचा अन तो स्वार्थ
का घ्यायचे पाठीवरती निंदा-स्तुतीचे ओझे व्यर्थ
वाढवायचा कशाला शब्दांचा पसारा
फुलवायचा कशाला भावनांचा पिसारा
ओथंबायचे कशाला शर कटाक्षांचे प्रेमामृत
आणि कोणालाजहरी बाबाण मारून
करायचे शब्दी मृत अन
का खेळायचे हे जीवन धूत ?
कधी वाटते, जगायचे कशाला
साऱ्या मनाच्या संवेदनाच गळून जाव्या
सजीवाच्या निर्जीव जगण्याचा साक्षात्कार व्हावा
प्रश्न आणि उत्तर मनाच्या ओंजळीतून
हरवून जावे
करावे अंत:करण रिकामे, व्हावे हृदय रिते
कधी होते कधी नव्हते
मर्त्य असून व्हावे अमर
करावी संवेदनाशून्य स्वर्गसुखाची सफर

कु. नयना जोगळेकर १२ वी जी.

# पराधीन आहे – पुत्र मानवाचा

**रमेश शेलार**
तृतीय वर्ष कला

असं म्हटलं जाते की काव्य करुणेतून जन्म घेते. कदाचित ते कवि-मनाचे प्रतिबिंब असू शकते. शुद्ध आनंद देणारे काव्य काही कवींच्या ओठांतून बाहेर पडत असते. परंतु आध्यात्मिक बैठकीची दारे खुली करणारे काव्य खचितच आगळे ठरू शकते. कारण त्यात मानवाच्या रहस्याची हळुवार उकल केलेली असते. काव्य कसे असते आणि ते कसा जन्म घेते यापेक्षा ते काय संदेश देते याला रसिक महत्त्व देत असतात. आज ग. दि. माडगूळकर नसले तरी त्यांचा संदेश रसिकांच्या अंतःकरणात आहे. त्यांच्या काव्य सामर्थ्याचे दर्शन "पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा" ह्या ओळीत दिसून येते. या ओळीचा सामान्य अर्थ असा आहे की मानव हा परावलंबी आहे. तो दुसऱ्याच्या अधीन आहे, हा समाज माणसामाणसांनी बनलेला आहे आणि प्रत्येकजण एकमेकांवर अवलंबून आहेत. मनुष्याच्या बालपणी तो माता-पित्यांवर अवलंबून असतो. कारण त्याला लहानाचे मोठे व्हायचे असते. तरुण झाल्यावर तो कुटुंबाच्या, पत्नीच्या अधीन असतो. तर म्हातारपणी काठी त्याचा आधार असते. आपल्या मुलांवर तो अवलंबून असतो. परंतु याहीपेक्षा तो समाजातील इतर घटकांवर अवलंबून असतो. शिक्षण घेताना, व्यवसायात त्याला इतरांच्या सहकार्याची जरुरी असते. त्याची गरज इतरांना असते. म्हणजेच मनुष्य जात ही परस्परसहकार्याने बांधलेली आहे. ती पूर्ण स्वतंत्र नाही, हा समाज एकमेकांच्या मदतीशिवाय म्हणजेच परावलंबित्वाशिवाय जगूच शकणार नाही.

परंतु ग. दि. मां-च्या वरील पद्य-पक्तीचा हा अर्थ सामान्य व व्यवहारी आहे. त्याचा खरा अर्थ वेगळा आहे. जशी दृष्टी तशी सृष्टी याप्रमाणे ज्यांच्या नजरेत अध्यात्म आहे त्यांना याचा अर्थ समजणे कठीण नाही. "पराधीन आहे, जगती पुत्र मानवाचा" म्हणजे मनुष्य हा 'परा'च्या आधीन आहे. "परा" म्हणजे परब्रह्म आणि त्या पराच्या अधीन म्हणजे परब्रह्माच्या अधीन हा मानवाचा पुत्र आहे. परब्रह्म ही जगातील सर्वश्रेष्ठ अशी शक्ती आहे, सर्व सत्ता तिच्या हाती असल्यामुळे तिला सुप्रीम पॉवर असे म्हटले जाते. परंतु ह्या परब्रह्माजवळ सामान्य मनुष्य पोहचत नाही. कारण तो सामान्य असतो जे ह्या शक्तीजवळ पोहचतात ते असामान्य होत त्यांनाच आपण साधुसंत-श्रेष्ठपुरुष म्हणून ओळखतो. कारण तो परब्रह्म जाणू शकतो. सामान्य माणूस ते जाणू शकत नाही. त्याजवळ जाण्याची त्याची मानसिक–शारिरिक कुवत नसते कारण ही परब्रह्म शक्ती आणि मनुष्य यामध्ये एक पडदा असतो. हा पडदा म्हणजेच महामाया होय. हा मायेचा पडदा पार करून परब्रह्माजवळ जाता येते. परंतु ह्या मायेचा प्रभाव सामान्य मनावर इतका असतो की सामान्य मनतो पडदा ते पार करू शकत नाही. मनुष्य जात ही मायेने व्याप्त असलेल्या अनेक विकारांच्या अधीन असते म्हणजेच मायेचे त्यांच्यावर स्वामित्व असते. ते माया सोडू शकत नाहीत. हा मायेचा प्रवाह ते फोडू शकत नाहीत. उलट ते त्यात अधिकच गुरफटून जातात. त्यामुळे त्यांना परब्रह्माजवळ जाण्याचा रस्ता दिसत नाही. म्हणून मायेचा हा पसारा फार मोठा आहे असे म्हटले जाते. हा मायेचा मनुष्यावरचा पगडा म्हणजे परब्रह्माच्या दिशेने चालण्याच्या वाटेवर ठेवलेले काटे होत.

भारतीय तत्त्वज्ञान आत्मा हा अमर आहे असे सांगते तो पुन्हा पुन्हा जन्म घेत असतो. कारण त्याने प्राप्त जन्मामध्ये मायेत गुरफटून न जाता परब्रह्माजवळ जावे. मनुष्य जन्म घेतो म्हणजेच त्या शरीरात परब्रह्माच्या आदेशानुसार आत्मा प्रवेश करतो. त्याने त्या कुडीत प्रवेश केल्यानंतर त्याचा तो मानव-जन्म ठरतो. म्हणजेच प्रत्येक आत्मा जन्म-मृत्यू ह्या फेऱ्यातून जात असतो. परंतु

जर तो त्या जन्मात मायेचा पडदा दूर सारून परब्रह्मा-जवळ पोहचला तर त्याला इहलोकाच्या यात्रेची मुक्ती मिळते. ज्यावेळी मनुष्य मरतो त्यावेळी परब्रह्माच्या आदेशानुसार तो आणि कुडी किंवा शरीर सोडत असतो. आत्मा त्या शरीरातून निघून जाताच ते शरीर अचेतन बनते व मनुष्य मेला असे आपण समजतो. परंतु शरीर–धारणा व शरीर-त्याग हे जन्म-मृत्यूचे दर्शक ठरत असतात त्यामुळे एखाद्या शरिरात आत्मा प्रवेश करतो त्यावेळी तो त्या जगातील मायेच्या आवरणात जातो. कारण त्याला जन्म देणारी माता समजत असते. आणि तो माता-पिता ह्या नात्यात रंगून जातो. माझी आई माझे वडील, हे माझे, ते माझे, अशा 'मी' 'माझे' ह्यात दंग होऊन परब्रह्माला विसरतो कारण मायेचा अंमल त्या शरीरावर होत असतो हा मानव मग संसार, धन, घर यासारख्या भौतिक सुखात रमून जातो. माया ज्यावेळी शरीरावर पगडा बसत असते त्यावेळी ती अनेक रूपाने वावरत असते राग, लोभ, मोह, मत्सर, मंद हे विकार म्हणजेच मायेची रूपे होय. अशावेळी मनुष्य त्या सर्वश्रेष्ठ परब्रह्माजवळ कसा पोहचणार ? कारण शरीर-धारणा व शरीर-त्याग ह्यामुळे मनुष्य-आत्मा नाती-गोती निर्माण करतो म्हणजे ही नाती-गोती परब्रह्माच्या मार्गातील धोंड आहे. आत्मा स्वतंत्र व अमर असला तरी मायेच्या प्रभावामुळे नाती निर्माण करतो. अंतिमतः कोणी कोणाचे भाऊ, बहीण, आई, वडील नाहीत कारण शरीर हे पर-ब्रह्माजवळ पोहचण्याचे साधन आहे. त्यासाठी त्याने सुखाच्या अधीन न होता त्यावर मात करावी. ज्याप्रमाणे शाळेत जाणारा मुलगा म्हणतो "ही माझी शाळा आहे. हा बेंच माझा आहे. हा वर्ग माझा आहे." परंतु अंतःकरणा तून त्याला हे माहीत असते खरोखर आपल्या मालकीचे काहीच नाही. त्यावर सत्ता, मालकी दुसऱ्याची आहे. परंतु तो तसे समजून वागत असतो. ही माया अशीच आहे. जगातील सर्व नाती, विकार, वासना यांचा मनुष्य गुलाम असतो. परंतु त्याचा आत्मा जाणत असतो आपण नंगे आलो आणि नंगेच जाणार आहोत. जाताना काही बरोबर नेणार नाही. सर्व येथेच राहणार आहे.

हे ज्यांनी ओळखले, जाणले असे श्रेष्ठ आत्मे देवरूपास पोहचले. वास्तविक पाहाता संत निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ता ह्या चार भावंडांची नावे हीच परब्रम्हाच्या रहस्याची गुरुकिल्ली आहे. ह्या परब्रम्हाशी एकरूप होण्यासाठी हे मानवा तू संसार, मोह यापासून अलिप्त रहा. मानवी पाशातून तू सुटका करून घे. म्हणजे तुला प्रकाश दिसेल अशा प्रकारे मोहमयी संसार सुखाची अपेक्षा धरू नकोस. हे निवृत्त होणे म्हणजेच निवृत्तिनाथ. आणि अशा प्रकारे जर तू निवृत्त झाला तर परब्रम्ह म्हणजे काय याची ओढ तुला जाणवेल. ह्या विकारावर मात केल्याने ज्ञान प्राप्त होईल. म्हणजेच तू परब्रह्म व माया जाणू शकतील. हे ज्ञान प्राप्त होणे म्हणजेच ज्ञानदेव. हा मायेचा पसारा दूर सारल्याने तुझी दृष्टी ज्ञानमय होऊन जाईल आणि मग परब्रम्हाशी पोहचण्याचा मार्ग तुला दिसेल. ही परब्रम्हाजवळ मानवाला पोहचविणारी शिडी म्हणजेच सोपान–देव होय. आशा रीतीने ह्या शिडीच्या आधाराने तू परब्रम्हा जवळ पोहचलास की तुझ्या देहाचे, ह्या मानव जन्माचे सार्थक होईल. तू जन्म–मरणाच्या फेऱ्यातून सुटशील म्हणजेच तुला मुक्ती लाभेल. ही मुक्ती मिळणे म्हणजेच "मुक्ता" होय. अशी मुक्ती तुला लाभल्या-नंतर (तू) तुकाराम बनणार नाहीस. याचा अर्थ "तू का राम" बनणार नाहीस. तर तू जरूर राम बनशील.

माणसाच्या ह्या वागण्यात त्याचा दोष नाही. कारण परब्रह्म हे इतक्या सोपेपणाने प्राप्त होत नसते. खऱ्या अर्थाने पाहिले तर दोष हा मायेचा म्हटला पाहिजे. ती माणसाला सोडत नाही आणि माणूस तिला सोडत नाही. मग या साठीच संतश्रेष्ठांचा उगम झाला असे म्हणावे लागेल. नाही तर ह्या धुंद मानवाला योग्य मार्ग कोण दाखवणार? कारण शरीर जरी परब्रह्म प्राप्तीचे साधन असले तरी भौतिक सुखे, विकार उपभोगण्यासाठी ते मायेला पण साह्य करू शकते. आणि हे साह्य नाकारणे म्हणजेच परब्रम्ह-प्राप्तीचे साधन बनणे होय. कै. ग. दि. मां. च्या काव्याची ही गूढता हे मानव कितपत जाणू शकतील? ह्या पवित्र आत्म्याच्या अंतरातून हे रहस्य बाहेर पडले, ते रहस्य भौतिक भोग भोगणाऱ्यांना समजणार नाही. कारण ते अजून "त्या" सुखात दंग आहेत आणि मग म्हणावे लागेल की दोष कुणाचाच नाही, मानव हा परब्रह्माच्या तंत्रानुसार वागत असतो पण साथ कोणाला द्यायची, मायेला की परब्रह्माला, हे फक्त आत्माच ठरवीत असतो. कदाचित ह्या श्रेष्ठ कवीचं मन ओरडत असेल की हे मानवाच्या पुत्रा तू कोणाच्या अधीन आहेस, हे तरी तुला समजणार का?" "का तू त्याचा आश्रय भौतिक सुखाप्रमाणेच घेणार आहेस." "हेही मला समजणार नाही कारण मी एक मानव-पुत्र तोसुद्धा पराधीन."

*

# पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा

मृणालिनी देशमुख
१२ वी, वाणिज्य

त्या दिवशी रात्री बातमी ऐकली ग. दि. माडगूळकर गेले आणि डोळ्यांत टचकन पाणी उभे राहिले. रात्रभर त्यांच्या मी वाचलेल्या कविता आठवत होत्या. साहित्य-संमेलनातील कविता म्हणतानाचे ग. दि. मा. भाषण करतानाचे ग. दि. मा. अशी अनेक रूपे डोळ्यांसमोर येत होती. नुकतेच साहित्यसंमेलनात त्यांना अगदी जवळून पाहण्याचा योग आला होता त्यामुळे तर जास्तच वाईट वाटले. साहित्यसंमेलनात दुर्गाबाईंनी ग. दि. माडगूळकरांवर टीकास्त्र सोडले होते. पण ग. दि. मा. त्यावर काहीही बोलले नाहीत. साहित्यसंमेलनात नाही किंवा त्यानंतरही नाही. हा त्यांचा मनाचा मोठेपणा.

ग. दि. माडगुळकर एक संतकवी होते. अवघड लिहिणे हे सोपे लिहिण्यापेक्षा जास्त सोपे असते असे म्हणतात. तुकाराम महाराजांनंतर ग. दि. मांइतके सोपे व सुटसुटीत कोणीच लिहिले नसेल असे मला वाटते.

जा सांग लक्ष्मणा सांग रामरायाला
समजला म्हणावे न्याय तुझा सीतेला.

फिरत्या चाकावरती देसी
मातीला आकार, विठ्ठला तू वेडा कुंभार

त्यांच्या अशा प्रकारच्या कविता वाचल्या म्हणजे वाटते आपण पूर्वीच्या संत कवींच्या कविता तर वाचत नाहीना ?

ग. दि. माडगुळकरांनी ४२ च्या लढ्यात, भारत चीन युद्ध किंवा भारत पाक युद्ध चालू असताना केलेल्या अवाहनपर कविता आजही आपल्याला रणोत्साह आणतात.

माणुसकीच्या शत्रू संगे युद्ध आमुचे सुरू
जिंकू किंवा मरू

नाना पाटलांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या प्रति-सरकार चळवळीत त्यांनी भाग घेतला होता एवढेच नव्हे तर पोवाडेही रचले होते. त्या पोवाड्यांच्या सहाय्याने त्या चळवळीचे तेज त्यांनी शब्दांकित केले होते व शाहीर म्हणून पदवी–हो पदवीच मिळवली होती. त्यांना आपल्या महाराष्ट्राबद्दल, आपल्या देशाबद्दल . अभिमान होता. म्हणूनच त्यांच्या हातून देशभक्तीपर रचना झाली. ग. दि. माडगूळकरांनी सगळ्याच क्षेत्रात स्वैर संचार केलेला आहे. सारी क्षेत्रे त्यांनी काबीज केली आहेत. कवितेचे किंवा लिखानाचे एकही क्षेत्र असे नाही की जिथे त्यांच्या प्रतिभेच्या कळ्या उमलल्या नाहीत. त्यांच्या कवितेतून जसा वीररस निर्माण झाला. असाच शांतरसही निर्माण झाला. जसा करुणरस आहे तशीच प्रेमातुर व्यक्तीपण आहे. नऊ रस त्यांच्या कवितेत मुक्तपणे विहार करतात. विविध भावछटा त्यांच्या कवितेत आढळतात. त्यांना शब्द शोधावे लागत असतील असं वाटत नाही. शब्द त्यांच्या सामोरे येत असणार आणि ' मला घ्या, मला घ्या ' असे म्हणतात. असे वाटते. त्यांची प्रतिभाशक्ती इतकी तीव्र होती की कोणत्याही विषयावर त्यांना कविता लिहायला सांगितली तर ते तात्बडतोब लिहीत असत. यांचा प्रत्यय आला गीत रामायणाच्या ध्वनिमुद्रणाच्या वेळेस–त्यांचा गीत लिहिलेला कागदच हरवला आणि रेडिओवरून तर गीत ऐकवायचे मग अण्णांनी तिथल्या तिथे एका तासात कविता केली.

गीतरामायण हा त्यांच्या प्रतिभेचा उच्चांक होय. म्हणूनच महाराष्ट्राचे वाल्मिकी हा किताब आपण रसिक जनांनी मोठ्या आनंदाने त्यांना देऊन त्यांचा गौरव केला. गीत रामायणाच्या अमर गीतांनी आपली मराठी संस्कृतीच संपन्न केली आहे. ग. दि. माडगूळकरांना लहानपणापासून त्रास सहन करावा लागला. सतत संकटांना तोंड द्यावे लागले. पण त्याचा परिणाम त्यांच्या काव्य-

शक्तीवर झाला नाही. ती आकार घेतच राहिली. लोकांना सुखवीतच राहिली. जो झगडतो तोच खरा जगतो हे वचन अण्णांनी अगदी यथार्थ केले.

ग. दि. माडगूळकर हे मध्यमवर्गीयांचे खरेखुरे प्रतिनिधी होते. अनेकांवर प्रेम करणारे ते एक कवी होते.

ग. दि. माडगूळकरांनी सिनेमा गीते व कथा लिहिल्या व सिनेमातून कामेही केली. त्यांच्या अभिनयकलेची या भूमिका पाहून कल्पना आपल्याला येते. त्यांनी मराठी सिनेमाला पुनरुज्जीवन दिले.

भावगीत हा अभिजात काव्याचा प्रकार असतो हे ग. दि. मां. नीच सिद्ध करून दाखवले.

दोन वर्षांपूर्वीच त्यांच्यावर मोठी शस्त्रक्रिया झाली होती व कॅन्सरसारख्या असाध्य रोगातून ते बचावले होते व पूर्वीसारख्याच कविता वगैरे करू लागले होते. त्यामुळे सगळ्यांनाच बरे वाटले होते. मरण कल्पनेशी थांबे तर्क जाणत्यांचा. मृत्यू त्यांच्यापासून दूर गेला. आता आणखी अनेक वर्षे अशीच मराठी भाषेची सेवा करत राहातील व रसिकजनांना सुखवत राहातील असे वाटले होते. पण मृत्यू दूर गेला नव्हता तो तेथेच घोटाळत होता. कसले तरी अगम्य गणित मांडत. काबीज करण्याची वाट पाहात. इकडे त्यांच्या मातेचा आदर्श माता सत्कार होत असतानाच त्यांचा अंत व्हावा हा दैवदुर्विलास बैठकीच्या खोलीतून माजघरात जावे इतक्या सहजपणे ते जीवनाच्या दालनातून पडदा सारून मृत्यूच्या दालनात गेले.

मी मैत्रिणीकडे गेले तिला म्हटले गदिमा गेले आणि माझ्याच डोळ्यातून अश्रू ओघळू लागले. पण तिने अश्रू पुसून म्हटले गदिमा गेले...नाही ते गेले नाहीत त्यांच्या या कविता हे गीतरामयण या रेकॉर्डस् माझ्याजवळ आहेत, त्यामुळे ते इथे आहेत. मी रडणार नाही. जर रडले तर तो त्यांचा आपमान होईल. त्यांनी सांगितलेल्या उपदेशाचा आपमान होईल. तू सुद्धा रडू नकोस. जेव्हा तुला हे विश्वाचे चाललेले अगम्य गणित समजणार नाही तेव्हा तू त्यांच्या कविता वाच. त्यांनी गीतरामायणात केलेली भरताची समजावणी वाच. तुला त्यातून जीवन जगण्याची स्फूर्ती मिळेल. मी तिला म्हटले तू सांगतेस ते खरे असले तरी पंचवटीतील काव्य आता वैकुंठाला पोहोचले आहे व आपल्या ओठांत फक्त हुंदकाच उरला आहे. त्यामुळे शब्दांना गहिवर आला आहे. गदिमांच्याच शब्दात सांगायचे तर—

पापण्यात गोठवली मी नदी आसवांची

ही गीतरामायणातील ओळ मला म्हणावीशी वाटते.

पु. भा. भावे यांनी म्हटल्याप्रमाणे गदिमा म्हणजे पारिजातकाचे झाड होते. मराठी जमिनीवर सुंदर सुगंधी फुलांचा सडा घालणारे. काळाने ते झाड आज नजरेआड नेले आहे. त्याची फुले पारिजातकासारखी प्रसन्न होते बकुळीसारखी सदैव सुवासिक होती. त्यांचा सुगंध मराठी रसिकास आणि मनास अमोल आनंद देत राहील. मनःपटलावर उमटलेल्या त्या सुखद स्मृती कधीच नाहीशा होणार नाहीत. कारण मृत्यू जरी अजिंक्य सम्राट असला त्याच्या सीमा अगोचर असल्या तरी आठवणी ह्या हत्तीच्या पावलांसारख्या आहेत. मनाच्या ओल्या रेतीत आपला ठसा खोलवर उमटवून ठेवणाऱ्या.

*

---

## भावचित्र

मनातील अनेक आठवणींनी
रेखाटत आहे मी एक चित्र,
असंख्य रेघा रेघोट्या
कागदावर उमटवून
भावपूर्ण चित्रात,
आकांक्षा आहेत, व्यथा आहेत
चित्रात स्मृती आहे,
एक आगळ्या प्रकारची
असंख्य रंगांनी रंगवलेले
चित्र सगळं सांगून जाते
कधीही न उलगडणारे कोडे
एका क्षणात उमगते ॥

**मीनाक्षी नारायण पाटणकर** प्रथम वर्ष, वाणिज्य

# चार्ली : लपलेले हास्य

**भोसले नंदकुमार बाळाजीराव**
प्रथम वर्ष, शास्त्र

सार्वजनिक जीवनात अशा काही असामान्य व्यक्ती असतात की, त्यांच्या जाण्यामुळे एखाद्या युगाचा अस्त झाल्यासारखा होतो. व्यक्तिगत तसेच सामाजिक जीवनातही पोकळी निर्माण झाल्यासारखी वाटते. एक सामान्य राहणीचा परंतु असामान्य प्रतिभेचा चार्ली चॅपलीन काळाच्या पडद्याआड झाला असला तरी, रुपेरी पडद्यावरील चॅपलीन कधीच दृष्टीआड होणार नाही. परंतु त्याच्या जाण्यामुळे त्याच्या असंख्य रसिकांना आता त्याच्या प्रतिभेचा आविष्कार पाहावयास मिळणार नाही.

गबाळी काळ्या रंगाची पँट, अंगाला न बसणारा घट्ट कोट, गोल गरगरीत हॅट, पायापेक्षा मोठे असलेले बूट, हिटलर टाईप मिशी असा हा चार्ली हातात काठी घेऊन जेव्हा रुपेरी पडद्यावर अवतरत असे, तेव्हा हजारो प्रेक्षक अक्षरशः मंत्रमुग्ध होऊन जात. त्याच्या डोळ्यांत दिसणारे कारुण्य माणसाच्या हृदयाचा क्षणात ठाव घेत असे. ह्या थोर कलावंताने तब्बल साठ वर्षे स्वदेशातच नव्हे तर संपूर्ण जगतात आपला चाहतावर्ग निर्माण केला होता.

अंतरराष्ट्रीय कीर्ती लाभलेल्या ह्या इतक्या मोठ्या कलावंताला लहानपणी भीषण दारिद्र्याला तोंड द्यावे लागले होते. लंडनच्या केनिंग्टन रोडच्या परिसरातील गलिच्छ अशा वस्तीत चार्ली चॅपलीन १८८९ साली जन्मला. घरी अठरा विश्वे दारिद्र्य, बापाने दारूमध्ये आपले सर्वस्व बुडवून सिडने आणि चार्ली ह्या दोन पोरांना जन्माला घालून ३७ व्या वर्षीच परलोकाचा रस्ता धरला होता. त्याची आई रूपसंपन्न, बुद्धिमान अभिनेत्री होती. परंतु परिस्थितीच्या दुष्टचक्रात तिचे सर्व गुण लुप्त झाले. छोटा चार्ली स्मशानभूमीवर फुले विकत बसे. मोठा भाऊ सिडने बोटीवरून प्रवास करताना बेपत्ता झालेला. त्यामुळे आई उदास कष्टी झालेली होती. शिवणकाम करून ती कसा-बसा उदरनिर्वाह करीत असे. आणि एक दिवस शिवणाचे मशीन वेळेवर हप्ता न भरल्यामुळे परत नेण्यात आले होते. त्य वेळी आईने क्रुद्ध होऊन निर्दयपणे चार्लीला घरातून चालता हो, तुझं भवितव्य तूच घडव म्हणून बजावले होते. आणि चार्लीनेही त्याची आई थोड्याच दिवसांची साथीदार आहे हे माहीत असूनही वयाच्या २१ व्या वर्षी अत्यंत दरिद्री अवस्थेत लंडन सोडले, आणि एका संगीत कंपनीबरोबर अमेरिकेत गेला.

अशाप्रकारे लहानपणी दारिद्र्याशी भीषण टक्कर दिलेल्या चार्लीला दारिद्र्याने अंतर्मुख केले आणि जगाला हा फार मोठा कलावंत मिळाला. दारिद्र्याचा शाप अखेरीस रसिकांना वरदान ठरला. परिस्थितीला टक्कर देताना त्याला जे अनुभव आले, समाजाच्या खालच्या थराच्या जीवनाचे निरीक्षण करता आले त्यामुळेच चार्लीच्या सर्जनशील मनाला अनेक पैलू पडले. त्याची दृष्टी विशाल आणि सर्वगामी झाली.

अशी ही चार्लीची बावळट मूर्ती हॉलिवूडला येऊन पोचली. चित्रपट तंत्राचा जनक डेव्हीड ग्रिफिथ याने प्रख्यात कलावंताबरोबर ‘ हीरो ’ म्हणून चार्लीला बरोबर घेऊन १९१४ मध्ये युनायटेड आर्टिस्ट चित्रपट संस्था काढली. आणि चार्ली चॅपलीन ‘ टिलीज पंक्चर्ड ’ ह्या चित्रपटात प्रथम रुपेरी पडद्यावर आला. ह्या चित्रानंतर त्याचे अनेक चित्रपट पडद्यावर आले. त्यातील ‘ मेकिंग ए लिव्हिंग क्रुएल क्रुअेल लव्ह ’ ‘ ए बिझी डे ’ ‘ हिज म्युझिकल करिअर ’ ह्या चित्रपटांनी हास्याची धमाल उडवून दिली. चार्लीने हॉलीवूडमध्ये चांगले बस्तान बसवले होते- १९१८ साली आपल्या नव्या स्टुडिओत ‘ए डॉग्ज लाईफ ’ हा मूकपट काढला. त्यानंतर एका बावळट सैनिकाच्या भूमिकेत चार्ली ‘ शोल्डर आर्म ’ ह्या चित्रपटात चमकला. चार्लीच्या ‘ द किड ’ मधील जॅकी कूगनच्या अभिनयाने धमाल उडवून दिली. ह्या

चित्रपटाने चार्लीला कीर्ती, पैसा नि प्रतिष्ठेच्या शिखरावर पोहचवले.

'दि किड 'च्या यशानंतर चार्ली आपल्या जन्मभूमीला म्हणजे लंडनला परतला. त्यावेळी त्याचे विजेत्या योद्धया-सारखे प्रचंड स्वागत झाले. तो केनिंग्टन रोडवरील आपल्या जुन्या घरी गेला. कसलाही बदल झालेला त्याला दिसत नव्हता. त्याची आई अजूनही खिन्नतेने मुलाची वाट पहात होती. अशाच परिस्थितीत पुढे तिला वेडही लागले. चार्लीचे आपल्या आईवर नितांत प्रेम होते. 'वेडी आई' हे शब्द उचारताना त्याला मरणप्राय वेदना होत. १९२८ चे ते वर्ष होते. चार्ली 'दि सर्कस' ह्या चित्रपटात काम करीत होता. त्याचवेळी त्याला आईच्या निधनाचा निरोप आला. चार्लीने काम थांबविले. मेकप पुसला. ज्या दवाखान्यात आईला ठेवले होते तेथे गेला. तिचा क्षीण झालेला हडकुळा देह बिछान्यावर चिरनिद्रा घेत पडलेला होता. आयुष्यात तिच्या मुद्रेवर कधीही न दिसलेली प्रसन्नता चार्ली प्रथमच पाहात होता. चार्लीच्या आयुष्यातील अत्यंत दुःखाचा दिवस तो हाच. वडील गेले तेव्हा त्याची आई, भाऊ सिडने हे दोघे रडले परंतु चॅपलीनच्या डोळ्याला पाणीही आले नाही. त्याच दिवशी नव्हे तर आयुष्यातील कठीण प्रसंगीही त्याने डोळ्यांतून पाणी आणले नाही. परंतु आईच्या निधनाच्या दिवशी मात्र तो ढसढसून रडला. न जाणो परत कधीही रडायला मिळणार नाही म्हणूनही असेल! असा हा चार्ली आयुष्यात दोन गोष्टींना कधीही विसरू शकला नाही त्या म्हणजे आई आणि गरिबी.

चार्ली आईच्या मृत्यूनंतर परत चित्रपटसृष्टीत आला. "दि सर्कस" हा चित्रपट पूर्ण केला. ह्या चित्रपटातील एक दृश्य फारच मजेशीर आहे. चार्ली दोरीवरून कसरत करीत असतो. तेवढ्यात पिंजऱ्यातील चार-पाच माकडे निसटून चार्लीच्या खांद्यावर बसतात. त्यानंतर चार्लीची जी त्रेधा उडते ते पाहून प्रेक्षकांचे पोट हसून-हसून दुखू लागते. हास्यचित्रपटाबरोबरच हृदयस्पर्शी असे चित्रपटही चार्लीने काढले. 'सिटीलाइटस, मॉडर्न टाइम्स, ग्रेट डिक्टेटर, लाईम लाईट हे चार्लीचे चित्रपट धूमधडाक्याने चालले. 'ग्रेट डिक्टेटर' ह्या बोलपटात हिटलरच्या हुकूमशाहीवर आणि नाझीवादावर प्रखर आणि विनोदी टीका चार्लीने केली आहे. 'लाइम लाइट' ह्या बोल-पटात प्रसिद्धीच्या प्रकाशाबाहेर गेलेल्या एका अभिनेत्याच्या जीवनाचे चित्रण पाहावयास मिळते. चार्लीने आपला शेवटचा चित्रपट १९६७ साली 'ए काऊंटेस फ्रॉम हॅांग-कॉंग' काढला. आणि त्यानंतर त्याने चित्रपट संन्यास घेतला.

बोलपटाचे युग आल्यावर त्याने फारसे चित्रपट काढले नाहीत- चित्रपटाला वाचा फुटल्यामुळे अभिनयाचा दर्जा कमी होतो असे त्याचे मत होते. त्याचे मूकचित्रपट त्याच्या ह्या मताची पावतीही देऊन जातात. हा विनोदाचा बादशहा लोकांना हसवायचा तो मूक अभिनयाच्या बळावर. त्याने आपल्या अभिनयाचा असा खास ठसा उमटविला. विनोदाला गौरवाचे स्थान मिळवून दिले. लेखन, दिग्दर्शन संकलन वगैरे सर्व गोष्टी चॅपलीन स्वतः करीत असे. त्याच्या सर्वच कलाकृतींत विनोदाचा भरपूर वापर असे. प्रेक्षकांची अमाप करमणूक त्यामुळे होत असे. परंतु प्रेक्षागारातून बाहेर पडणारा प्रेक्षक तितकाच अंतर्मुख होत असे आणि त्याला खोलवर जखमी झाल्यासारखे वाटत असे. आपले सामाजिक कर्तव्य करताना आपण कमी पडत आहोत ह्याची जाणीव त्यांना होत असे. आणि ह्याला कारण म्हणजे चॅपलीनच्या कलाकृतीत खोलवर लपलेला सामाजिक आशय. चार्लीच्या विनोदी अभिनयाला कारुण्याची एक झालर असे, आणि त्यामुळेच चार्ली लोकांना करमणुकीबरोबरच कर्तव्याचीही जाणीव देऊ शकला. चार्लीने चित्रपटाच्या प्रारंभापासून म्हणजे मूकचित्रपटां-पासून ते बोलपटापर्यंत प्रतिभासंपन्न कलाकृती, दिग्दर्शन, लेखन, संगीत, तरल अभिनय दिला. तब्बल साठ वर्षे तो या सेवेस चुकला नाही. अनेक गंभीर समस्याप्रधान चित्रपटही त्याने हलक्याफुलक्या विनोदातून हालचालीतून दिला. चित्रपटसृष्टीतील विनोद चार्लीने खऱ्या अर्थाने चिरंजीव केला आहे. गेल्या शतकातील अनेक आश्चर्यो-पैकी एक आश्चर्य आणि चित्रपटसृष्टीला मिळालेला एक साक्षात्कार म्हणून चार्लीला मानावेच लागेल.

सर्वसामान्य लोकांपासून ते मोठमोठ्या विचारवंतां-पर्यंत शास्त्रज्ञ, राजकारणीय अशा सर्वच थरांतील लोकांना चार्लीच्या चित्रपटांनी वेड लावले होते. ब्रिटनचे त्यावेळचे पंतप्रधान रॅम्से मॅक्डोनल्ड, विन्स्टन चर्चिल हेही राज-कारणासारख्या रुक्ष जीवनातून बाहेर पडून चार्लीचे मूकपट पाहून विरंगुळा प्राप्त करून घेत मूकपटाच्या जमान्यात महात्मागांधी, आइन्स्टाईनसारख्या वंदनीय व्यक्तींबरोबर चार्ली चॅपलीनचेही नाव घेतले जात असे.

असा हा असामान्य प्रतिभेचा कलावंत खाजगी आयुष्यात खूपच शांत होता. प्रसिद्ध अमेरिकन नाटककार

युजेन ओनीलची कन्या उना ही चार्लीची पत्नी. उना १८ वर्षांची तर चार्ली पन्नाशी ओलांडलेला. या लग्नाने अमेरिकेत खूप खळबळ उडवून दिली. त्यातच चार्लीच्या राजकीय मतांमुळे अमेरिकेत त्याच्या विरोधी लोकमत निर्माण होऊ लागले होते. त्यामुळे त्याने हॉलीवुड सोडून जाण्याचा निर्णय घेतला आणि उनाच्या सहवासात आपल्या आयुष्याचा उत्तरार्ध त्याने स्वित्झर्लंडसारख्या निसर्गरम्य देशात घालवला. त्याच्या खाजगी जीवनातील रंगेल वृत्तीमुळे अनेक वादळे निर्माण झाली आणि शांत झाली. त्याच्या जीवनातील चढउतार त्याच्या अनेक चित्रपटांतून दिसून आले. अनेक संकटांच्या अनुभवातून त्याने निर्माण केलेले चित्रपट अजरामर ठरले असले तरी चार्लीच्या व्यक्तिमत्त्वाचा कोणीही ठाव घेऊ शकला नाही. त्याचे व्यक्तिमत्त्व म्हणजे एक गूढच होते. आयुष्यभर विनोदाचा आधार घेऊन इतरांना हसविणारा त्यांचे मनोरंजन करणारा हा कलाकार आयुष्याच्या शेवटी फारच गंभीर झाला होता.

आणि आता पुन्हा एकदा चित्रपटातील विनोद पोरका झालेला आहे. विनोदाचा जनक चार्ली आपली ८८ वर्षांची जीवनयात्रा संपवून डिसेंबर ७७ ला अनंतात विलीन झाला आहे. विनोदातील एक हास्य लुप्त झाले आहे. आयुष्यात अनेकवेळा जीवनमरणाच्या सीमेवर जाऊन या विनोदवीराने मृत्यूला आव्हान दिले होते. त्याने आपल्या 'ऑटोबायोग्राफी' या आत्मचरित्रात मृत्यूविषयी लिहिलेले विचारही त्याची मृत्यूविषयीची निर्भयता दाखवतात. तो लिहितो—

'मी मरणाला वाकुल्या दाखवितो त्याच्याशी खेळतो, मृत्यू सतत माझ्याभोवती आहे याची मला कल्पना आहे परंतु प्रत्येक जिवंत माणसाला मृत्यू हा अटळ आहे. माझ्या जीवनाला कसलाच आकारही नाही आणि त्यापासून काही शिकण्यासारखेही नाही आणि म्हणूनच मी मृत्यूशी खेळ खेळतो आहे.'

चार्लीच्या या ऑटोबायोग्रफीतील, मृत्यूनंतरही आपल्याला लोकांचे मनोरंजन करण्यास आवडेल ह्या त्याच्या विचाराने आपणास हसूही येते आणि आपण गंभीरही होतो. चार्ली लिहितो—'लहानपणी मी दुसऱ्यांच्या शवांवर फुले वाहिली आहेत. दुसऱ्यांदा आईच्या शवावर फुले वाहिली. परंतु आता माझ्यासाठी कोण आहे? मीच जर शवपेटीतून उठून फुले उधळली तर...तर ती ही एक कॉमेडीच ठरेल...पाहू, शेवटचा तोही अभिनय करीन!'

असा हा उच्च कोटीतील विचारधन लाभलेला विनोदवीर आता नाहीसा झालेला आहे. परंतु त्याचे मूकपटरूपी हास्य कधीही नाहीसे होणार आहे. त्याच्या कर्तव्याची जाणीव करून देत असताना मनोरंजन करणारा विनोद कोणताही रसिक विसरणार नाही. चार्लीच्या ह्या मौलिक कार्याबद्दल सर्वच रसिक प्रेक्षक त्याचा ऋणी राहील.

*

---

## मन

मन फार विचित्र असते
नको तेथे भटकत असते
कधी घेत उंच भरारी
पक्षी होऊ जाते नभावर
घेऊन येते सुंदर भरारी
बघून येते ताजमहाल
हळूच म्हणते फारच छान
होऊन जाते रानफुल
न्याहळत बसते सारे जग
कधी जाते सागराशी
मोती शोधीत बसते तळाशी
भावनेच्या सागराशी गुंतत असते
गुंता मात्र वाढत असतो

**उज्वला पावसकर** ११ वी एफ्

# पु. शि. रेगे - साहित्य संस्काराचे वैभव

श्यामला वनारसे

पु. शि. रेगे यांचे निधन झाल्याने मराठी साहित्यरसिकांचा एक संस्कारमंत्रच हरवल्यासारखे झाले आहे. अशावेळी मृत्यूच्या दुःखातून हे एक वेगळेच दुःख- ज्याला दुःख म्हणता येईल की नाही ते सांगता येणार नाही—अलगले आहे. अशा अनुभवाच्या कळा शब्दांत पकडण्यासाठी रेगेच हवे होते.

रेगे यांचे साहित्य ज्या साहित्यिक मूल्यांचा आणि जीवनमूल्यांचा आविष्कार करते, तो संस्कारग्रहण करून कोणत्याही व्यक्तीचे जीवन 'सुसंस्कृत'च होते. साहित्याचा आनंद घेण्याची, आपल्या रसिकतेची क्षमता, आपण जे आणि जसे वाचतो, त्यामुळेच वाढते किंवा खुंटते. एरवी आपण पाहतोच की आपण जेवढे उंच जातो, तेवढा आपल्या नजरेचा पल्ला वाढतो. रेग्यांचे साहित्य वाचता वाचता आपण उंच होत जातो, आपल्या जाणिवेचा पल्ला वाढत जातो.

रेग्यांच्या साहित्यरचनांचे रूपबंध, शब्दरचना आणि शब्द त्यांच्या जीवनदर्शनाचे समर्थ अविष्कार करतात. त्यांच्या साहित्यकृतींमधील शब्द येतो तोच मुळी विलक्षण खोल अशा शब्दाच्याच जाणिवेतून. शब्द आणि अर्थ यांच्याबद्दलचेही त्यांचे चिंतन त्यांच्या साऱ्याच कृतींतून प्रकर्षाने आढळते.

...'पण आपल्याला शब्द नको असतात. भाषा हवी असते. दोन शब्दांच्या मधे सोडून दिलेला, न गोठवलेला अर्थ; शब्दांच्या वर, खालीं, चोहोंबाजूला घुटमळणारा अधीर आणि तितकाच भिडस्त अर्थ...'

(अवलोकिता/१५)

अशी शब्दाभोवतीच्या अर्थाच्या तरळण्याची जाण, किंवा शब्द एखाद्या नाण्यासारखा अलिप्त असल्याचे भान—'बोलणे झाले ते शब्दांचे.

मी काहीच बोललो नाही (आधार/प्रियाळ ७४)
किंवा शब्दातीत संवादाची प्रचीती

आश्वासनाला
नुसता न घेतलेलाही
श्वास पुरतो (शहनाज/१२/प्रियाळ ११२)

असे अनेक प्रकारचे शोध त्यांच्या साहित्यात: आपल्याला लागत जातात. एकेका शब्दाचा वापरही अशाच खोलात बुडी मारायला प्रवृत्त करतो. अशा प्रकारचा त्यांच्या शब्दकळेचा अभ्यास हा एक स्वतंत्र विषय आहे. पण अगदी उदाहरणादाखल 'जवळ जवळ' या शब्दाचा

'जवळ जवळ तुजपाशी येतां
जवळ जवळ सगळे होते'

('जवळ जवळ'/प्रियाळ ५५)

या ओळींमधला वापर बघण्यासारखा आहे. असा वापर शब्दांना नवेच प्राण देतो. ही अर्थाची चैतन्यमय सळसळ त्यांच्या लेखनातून सतत आपल्यापर्यंत येते. (तसं नसेल'/प्रियाळ ८, पहारे/९/दुसरा पक्षी २६, सावित्री/२१/४२-४४) शब्द आणि शब्द रचनेप्रमाणेच त्यांच्या संपूर्ण साहित्यकृतींचे रूपबंधही अतिशय बोलके, सुसंबद्ध आणि स्पंदनशील आहेत. वेगवेगळया भावलयी आपले आपणच गुंफत जातात समतोल आकार. अनेक वेळा असा अनुभव येतो की प्रथम त्यांच्या शब्दांची वाट बिकट वाटते, बुचकळयात टाकते. काहीशी त्रासही देते. पण ती खुणावत राहते, आणि जितक्या वेळा त्यांच्या कलाकृतींचा आस्वाद घ्यावा, तितक्या वेळा मूळ अनुभव अधिक संपन्न करत जाते.

त्यांच्या साहित्यातील अनुभूतींचे आकार अनेक ठिकाणी कालातीत असल्याचे जाणवते. त्यांच्यामधून प्राचीनातली प्राचीन मानवी अनुभूती अगदी काल आजच्या अनुभूतीची नातलग होते. त्यातही ज्या शब्दांनी

हा आकार घडवला जातो तेच शब्द आपल्याला कालातीत पातळीवर नेतात ही रेग्यांची खास शक्ती आहे. 'लोरेंझो त्या काळात तिच्या खास प्रीतीचा—जबरदस्त जवळिकेतही कोवळीक न सांडणाऱ्या त्याच्या बुलंद शैलीमुळे...' ( रेणू / ५० ) 'रेणू' कादंबरी घडते दिल्लीच्या उच्चपदस्थ जागतिक संदर्भ घेऊन जगणाऱ्या 'हाय सोसायटी' मधे. पण त्यातल्याच लोरेंझो या पात्राचे हे वर्णन आपल्याला एकदम मानवी नात्याचा आधारभूत मूलबंध दाखवून जाते. 'सावित्री' कादंबरी सुरू होते ती ऋग्वेदातील ऋचेने, 'जे जे हवं ते ते आपणच व्हायचं' हे सूत्र सबंध कादंबरीत उलगडत जातं, स्थलविस्तारानं इंग्लंड, जपान, भारत या पटावर, कालदृष्ट्या दुसऱ्या महायुद्धाच्या खळबळत्या काळावर, कादंबरीत तो आकार वेगळ्या लयीनं वेगवेगळ्या संदर्भात अवतरत जातो. तत्त्वज्ञान, लोककथा, नायक-नायिकेचे प्रत्यक्ष जीवन, त्यात असलेल्या कलाकृतींच्या रचना अशा सर्व पातळ्यांवर त्या प्राचीन सूत्राचे संवाद झंकार निर्माण होत राहतात. तीच गोष्ट 'अवलोकिता' या कादंबरीत. 'आपल्याला आपल्यापासून सुरुवात करून पुन्हा आपल्यापर्यंत परत आलं पाहिजे' याचा मागोवा घेत कादंबरी विकसत जाते.

जीवनाच्या स्थितिगतीशी बांधलेले हे मूलबंध कलात्मक आविष्कारात एक चिरंतन मूल्य निर्माण करतात. त्यांच्या जोरावर समकालीन जीवनाकडे पाहण्याचा एक दृष्टिकोणही संक्रमित करता येतो. दोन महायुद्धांची खाई कपाळी घेऊन आलेले हे विसावे शतक. या शतकात माणसाने माणसाला बेभानपणे संहारून टाकायचा प्रयत्न केला आहे. त्यातच उफाळून आलं ते क्रौर्य, दिशाहीनत्व आणि भंगलेपण. एकात्मता हरवून बसलेला, दुसऱ्यावरचा स्वतःवरचा आणि दोन व्यक्तींमधल्या संवादावरचाही विश्वास उपटून काढलेला, उन्मळलेला, एकाकी, अस्वस्थ, भ्रांत उद्ध्वस्त माणूस आधुनिक साहित्यात पुनः पुनः दिसतो. परंतु माणसाची मूळ प्रकृती मनःसंवादावर विसंबण्याची आहे त्याचं चिरंतन स्पंदन रेग्यांच्या साहित्यातील वेगवेगळ्या संदर्भात सतत जाणवतं. 'तुला सांभाळीत, हे तारिणी' ( शहनाज । १५ । प्रियाळ ११९ ) किंवा

'तू बोलणार नाहीस
ते मला समजले असेल;
बोलशील ते मीच बोलेन' ( घड्याळ / प्रियाळ ३२ )

या कवितांमधे, किंवा

...'देवळाच्या आवारात त्याच्याबरोबर फिरताना तिनं सहज एक उत्सवातील नाचाची गिरकी घेतली आणि क्षणभर नसलेली वाद्यं तालावर घुमू लागली' ( सावित्री—२१ / ४३ ) अशा भावमय रचनेमधे, तर कधी अगदी घरगुती बोली भाषेत 'तुम्हाला मी आपलंस करून घेतलं आहे, मला तुमच्चंसं करून घेतलं आहे' ( सावित्री – १८ / ३७ ) सगळीकडेच मनःसंवादाच्या शक्यतेवरचा, शक्तीवरचा विश्वास त्यांच्या साहित्याचा कसदार गाभा बनून राहिलेला आहे.

या विश्वासाचा उजळणारा प्रकाश जेव्हा स्त्री-पुरुषसंबंधावर पडतो, तेव्हा रेग्यांनी टिपलेली अनेक समर्थ, कोमल रूपे आपल्याला दिसतात.

स्त्री पुरुषसंबंध ही अनुभवाची अत्यंत आवेगी, भावोत्कट आणि एकाच वेळी अगदी व्यक्तिगत आणि सामाजिक अशी बाजू असते. त्यातील गुंतागुंत इतक्या प्रकारची आहे, की अनेकांना तिचा विचार करताना गोंधळून जायला होतं. त्यातील सत्त्व सापडत नाही आणि तरीही त्याचं संमोहन सुटत नाही. मानवी जीवनात स्त्री पुरुषसंबंधांचे आणि देहाच्या इंद्रियानुभूतीचे प्रत्यक्ष अविष्कारही असंख्य आहेत असेच म्हणावे लागेल. नैसर्गिक ओढीच्या नैसर्गिक हेतूंना इतर सर्वच जीवनक्षेत्रे आपापले रंग देत असतात आणि त्या साऱ्यांना सांभाळता सांभाळता फक्त स्वतःचे निवेदनापलिकडचे देहप्रत्यय आपले आपल्यालाच अनोखे होतात. येथूनच कितीतरी विकृती, संघर्ष, क्रौर्य उत्पन्न होते, आणि येथूनच देहाच्या मर्यादा ओलांडणारी प्रचीतीही येऊ शकते. अगदी मूर्त संवेदनापासून अगदी अमूर्त तरल अनुभूतीपर्यंत ह्या मानवी अनुभवाच्या संबंधाचे साम्राज्य आहे. गोंधळ, एकांगीपणा, विकृती यांचे चित्रण आपण अनेकदा वाचतो पण रेग्यांचा विशेष असा की या संबंधातून त्यांनी मिळवले ते 'उभयपणा'चे सत्त्व. त्याचेच अनेक शब्दाकार त्यांच्या साहित्यात उभे आहेत. frailty thy name is woman असा क्षुब्धतेचा किंवा 'स्त्रीजात तेवढी निमकहराम असा अडाणीपणाचा किंवा 'हे मेले पुरुष!' असा तिटकाऱ्याचा फटका त्यांच्या साहित्यातून कधीच बसत नाही. कधी खेळकर, मिष्कील.

अलीकडे पुन्हा स्वप्नात
सारखा तूच येतोस
का हा माझा इतका ध्यास ?
( उद्गार । २ । प्रियाळ ७६ )

कधी अगदी नैसर्गिक आणि आवेगी—

‘ हाताच्या पाच बोटांना दुसऱ्या दहा बोटांचा कोश लागतो. त्यात मग ती निमुळती होतात, वितळतात. ओठांजवळ आणली की कमळाच्या पाकळ्यांप्रमाणे न चुकता फुलतात. आपल्या ओठांची ठेवण त्यांना ठाऊक असते. गाल, डोळ्यांच्या पापण्या, कानशिलं हातात न घेतलेला दुसरा हातही मग हवा होतो. एक एकाला, दुसरा दुसऱ्याला. ’

( अवलोकिता । १७ )

कधी उद्रेकी—म्हणून काय ? म्हणून हाय
मोजणारा तो मोजून जाय
( मोजतांना / प्रियाळ ६४ )

कधी आत्मक्लेशी—

तुला वंचून एक सदोदित गुह्य
मी आतल्या आत साठू देतो.
त्यांच्या कुसांवर माझ्या जाणिवेची
एक खूणसुद्धा उठू देत नाही.
एक एक तसेच सलू देतो.
( तुला वंचून । प्रियाळ ३९ )

कधी निसर्गाशी मिसळलेली

सावळ्याची संगत
डोहाची लज्जत
राधेला । राधेला
( प्रियाळ । प्रियाळ ८९ )

कधी असह्य अंगारलेली—

‘ तापलेल्या ओठांचे चटके
डोळ्यांतले अबोल तांबडे
हातातल्या छिप्प ओटांची धगधग
उरात पोखलेला निखारा
जाळणारी अशी एक रात्र
भर हिवाळ्यातली, गात्र न् गात्र
( वाट । प्रियाळ ५३ )

कधी अगदी अटळपणे दोन—

‘ फसवायचे स्वतःलाच जर
पुरेपुरे चल दोघे फसवू
( आणि अपेक्षित । दोला ९५ )

तर कधी दोन मिळून एक

हे तो अलोकींचे आळोचणे
वेल्हाळेचे बोळविणे
आपुले आपुलेनि अंगविणे
प्रियाळ
( प्रियाळ / प्रियाळ ९२ )

अशी अनेक रूपे. एखाद्या लोलकाचा कोन थोडासा जरी बदलला, तरी त्यातून निघणारे किरण बदलतात. रेग्यांचे साहित्य एकेका अंशाने – नव्हे कलेने, विकलेने फरक करून स्त्रीपुरुष संबंधात गुंतलेले धागे विलग करून पुन्हा गुंफूनही दाखवते. जे गांभीर्य, परस्परांची जाण विसंबलेपण आणि मुक्तसंवादी भाषा या नात्यात त्यांनी आणली त्यातून मिळणारा संस्कारच असा आहे की स्त्रीपुरुषांना स्वतःच्या ‘ असतेपणा ’चा आणि एकमेकांचा अभिमान वाटावा, साफल्याची दिशा सापडावी. प्रत्यक्ष व्यवहारी जीवनात मिळणाऱ्या संस्काराइतकेच पण वेगळ्या प्रकारचे मोल या साहित्य संस्काराला आहे.

भूतभविष्याशी वर्तमानाची जुळणी करून मराठी भाषा कशी लवेल याचा एक आविष्कार या साहित्यात आपल्याला दिसतो. अशी भाषाच समर्थ, आविष्कारशील आणि चैतन्यमय राहते. या भाषेशी जवळीक करताना रेग्यांनी कधी कोवळीक सोडली नाही, उलट तिला नवी करून उभी केली. तेजस्वी आत्मबळावर. तिच्याकडे असे पाहताना जो मंगलस्पर्श घडतो, त्यात अभिमानी फुशारकी किंवा अपरिपक्व न्यूनत्वाची टोचणी गळून पडते. रेग्यांच्या जाण्याने एक ऋण डोक्यावर घेऊन आपण उणावलो आहोत असे सारखे वाटत राहते.

# आमचे ध्येय परिवर्तनाचे

**भारती पोतनीस**
तृतीय वर्ष, वाणिज्य

जीवनात प्रत्येक माणसापुढे काही ना काही ध्येये असतात–असावीच लागतात कारण त्याशिवाय जीवनाला अर्थच उरत नाही. मात्र ही ध्येये चांगली, सुयोग्य असतात किंवा नाही हे ज्या त्या व्यक्तीच्या संस्कारावर वर्तणुकीवर अवलंबून असते. आपले जीवन मार्गी लागावे व ते सुयोग्य दिशेलाच वळावे अशी भावना त्यात असावी लागते. समोर योग्य आदर्श असावा लागतो. माणूस हा अनुकरणशील असतो व सुयोग्य आदर्श मिळाला तर त्याचे आयुष्यही प्रयत्नांती सुकर बनण्यास मदत होते.

आज जीवनाचा ओघ हा विलक्षण अनुचित मार्गाने वेगळे स्वरूप लेवून भरकटत चालला आहे. त्याला कारणमीमांसा सांगावयाच्या झाल्या तर अनेक सांगता येतील पण विशेषत्वाने नाव घ्यायचे झाले तर याचे कारण आहे 'आम्ही' आजचे युवक. अनेक बाजूंनी आत्तापर्यंत उलटसुलट विचार करून पाहिला व या पिढीवरचा हा आरोप झटकायचा प्रयत्न केला अथवा या भयंकर परिस्थितीचे खापर पालकांवर व समाजावर फोडण्याचा प्रयत्न केला तरी ही सत्यपरिस्थिती नाकबूल करता येणार नाही.

वास्तविक आम्हाला अतिशय महान संस्कृतीचा वारसा मिळालेला आहे. अनेक त्यागी व्यक्तींनी प्राण पणास लावून आपली संस्कृती राखली आहे; टिकवली आहे. आपल्या देशाचा ताल बिघडवू न देता अनेक सुधारणा समाजात घडवून आणल्या आहेत. त्या त्यागाची, कर्तव्याची, निष्ठेची किंमत त्यांनी त्यांच्या तरुणपणात सन्मानाने नाही तर जबर शिक्षा घेऊन दिली आहे. त्यासाठी आपले जीवन समर्पित केले आहे. दुसऱ्यासाठी जीवन कुरवंडून टाकणाऱ्या वीरांची ही भूमी आहे, प्रेमापेक्षा कर्तव्याला महत्त्व देणाऱ्या अनेक थोर माता येथे होऊन गेल्या, समाजातल्या अन्यायांची क्षुद्र रूढींची वर्षानुवर्षांची वेगवान चक्रे थोपवून धरणाऱ्या महान ध्येयनिष्ठ सत्पुरुषांची ही भूमी आहे.

असे सर्व असताना मधला एखादा ओघ जर वाईट मार्गांनी मलिन झाला, दूषित झाला म्हणून आम्ही पण आमचा प्रवाह न बदलता त्याच मार्गाने जायचे ? प्रवाहाविरुद्ध न जाता प्रवाहपतित व्हायचे ?

वाममार्गाने जाणाऱ्या निष्क्रिय लोकांच्यामागे आम्ही लागलो व कर्तव्यनिष्ठ, ध्येयनिष्ठ महापुरुषांना विसरलो. क्षणिक सुखाच्या आभासात्मक जाळात आम्ही अडकलो व चिरकालीन सुखाला मुकलो.

संस्कृती, प्रकृती आणि विकृती या जीवनाच्या तीन प्रवृत्ती आहेत. स्वतःची भाकरी समोरच्या भुकेल्याला देऊन आपण उपाशी राहाण्याच्या या भावनेला संस्कृती म्हणतात. सभोवतालचा विचार न करता कुणासही उपयोगी न पडता स्वतःची भाकरी शांतपणे खात रहाणे ही प्रकृती समजतात. म्हणजेच इतरांच्या दुःखाचा विचार न करता स्वतःच्याच सुखाचा विचार करण्याच्या प्रवृत्तीला प्रकृती म्हणतात. आणि आपली भाकरी तर आपण खायचीच पण त्यावर समाधानी न रहाता दुसऱ्याचीही हिसकावून घ्यायची अशा या घाणेरड्या प्रवृत्तीला विकृती म्हणतात.

या दृष्टीने विचार करता आम्ही काहीसे विकृतीवादीच झालो आहोत. आम्हाला आमच्यातच निश्चित बदल करावयास पाहिजे. खोट्या आशा, निष्फळ प्रयत्न व दिशाभूल करणारे अनुकरण सोडून दिले पाहिजे. हे सर्व बदलायचे म्हणजे आम्हांस आमच्या पूर्वजांच्या अपार मेहनतीचा, निःस्वार्थ वृत्तीचा नि त्यागी कृतिशीलतेचा आदर्श डोळ्यांपुढे ठेवला पाहिजे. आदर्शाशिवाय मनुष्यात ध्येयनिष्ठा येत नाही म्हणून एकलव्याचा श्रद्धेचे व अर्जुनाच्या ध्येयनिष्ठेचे सुंदर एकत्रीकरण आम्ही जीवनात घडविले पाहिजे. ध्येयप्राप्तीसाठी मग आमच्यात निश्चितच जिद्द निर्माण होईल व आमची पिढी निश्चितच एक

संस्कारक्षम आदर्श पिढी ठरेल व एका विशिष्ट ध्येयवेडाने आमचे जीवन सुफल आणि समृद्ध होईल.

अर्थात हे सगळे जमण्यास आत्ता कठीण वाटत असले तरी प्रयत्नांनी ते आम्ही सुलभ करू. आजचा पालक कसा आहे? किंवा समाजच असा आहे! अशा तऱ्हेचे आरोप दुसऱ्यावर लादण्यापेक्षा आम्ही आमच्यातील दोष सुधारावयास पाहिजेत. समाज परिवर्तनास पण आमच्यापासूनच सुरुवात केली पाहिजे. जेव्हा समाजात एखादी व्यक्ती परिवर्तन घडवून आणते तेव्हा ती देशाच्या प्रगतीस कारणीभूत ठरते. मग एक पिढी परिवर्तन घडवू लागली तर राष्ट्राच्या दृष्टीने ते मोठेच यश समजले पाहिजे म्हणूनच आम्ही सर्वांग परिवर्तनाचे मोठे ध्येय उराशी ठेवून आमच्यात बदल घडवला पाहिजे. आमच्या पुढचे हे ध्येय आम्ही कितपत गाठू हे आमच्यातील संयमावर, चिकाटीवर, जिद्दीवर व विशेषकरून आमच्यातील एकजुटीवर अवलंबून आहे यात शंका नाही.

असे म्हटले जाते की, 'माणूस आयुष्याच्या शेवटी शहाणा होतो पण तो दुसऱ्याच्या ठेचांनी नाही तर स्वतःच्या जखमांनी.' परंतु आम्ही मात्र आमच्या पालकांच्या जखमांनी, त्यांच्या दुःखांनी शहाणे होणार आहोत. प्रसंगी आम्हांस ध्येयप्राप्ती नाही झाली तरी चालेल मात्र आमच्यातील सत्त्व यापुढे तरी आम्ही गमावणार नाही. पुढच्या पिढीच्या आदर्शासाठी व कल्याणासाठी ते आम्हास जपलेच पाहिजे.

*

---

## प्रतीक्षा

मिटलेल्या ओठांत
गोठलेले गीत आहे
परतणाऱ्या पावलांत
सावलीचा मोह आहे
तिष्ठणाऱ्या चक्षूंतून
कष्टतेरे ही प्रतीक्षा
सुकलेल्या गॉलांवर
ओघळती सदिच्छा
जीवनाच्या वाटेवर
काटे न तुला बोचावे
यासाठी पाऊल वाटेवर
प्रेम माझे सांडावे
वखवखलेल्या अशा दुपारी
येते कानी तुझीच चाहूल
अन काजळलेल्या खिन्न मनावर
एक फराटे उमटते पाऊल!

**सीमा जोशी** ११ वी वाणिज्य

## थडगे

सूर्याचे हजारो किरण डोळे
मला पाहू शकणार नाहीत
गर्द सावलीच्या शांततेत
विझुन गेलेल्या एका अनामिक स्वप्नात
कसलेच प्रकाशतारे उजळणारे नाहीत
माणुसकीचे अत्यसंस्कार गाडले जातात
कुरकुरलेली तिरडी गाठींचा काथ्या
गुलाल आणि फुले बाजूला फेकली जातात.
चौऱ्याऐंशीलक्ष योनीच्या गाभाऱ्यातून
हा मानवदेह येथेच विसावतो
स्वतःच्याच अकलेचे तारे तोडून
सभोवती माती पसरून
एका थडग्यात विश्रांती घेत म्हणतो
सूर्याचे हजारो किरणडोळे
मला पाहू शकणार नाहीत

**अशोक सोनावणे** प्रथम वर्ष, कला

# मानवाकडून मानवाकडे

**अमला मेहता**
प्रथम वर्ष, वाणिज्य

पहाटे पावणेसहा वाजता नेहमीप्रमाणे गजर झाला आणि माझी विचार शृंखला तुटली. आता तुम्ही म्हणाल की भल्या पहाटे गजर व्हायच्या आधी जाग आलीच कशी आणि एवढा विचार तरी कसला चालला होता? मी नुकत्याच पाहिलेल्या त्या विचित्र स्वप्नाविषयी विचार करीत होते.

मी नेहमीप्रमाणे मैत्रिणींबरोबर कॉलेजच्या ग्राऊंडवर बसले होते. आजूबाजूला वर्दळ तशी कमीच होती. मी बोलता बोलता समोर पाहिलं तर दोन व्यक्ती चालल्या होत्या. आपण नेहमीपेक्षा काहीतरी वेगळं पाहतोय असं जाणवलं पण गप्पांच्या नादात ते निश्चित काय होतं ते जाणवलं नाही. थोड्या वेळाने ट्यूब पेटली की त्या दोन व्यक्तींपैकी एक गप्प होती आणि दुसरी जी बोलत होती तिच्या मानेच्या वरचा भाग दिसतच नव्हता! मला दर-दरून घाम फुटला. मी हा प्रकार मैत्रिणींना सांगितला तेव्हा त्या म्हणाल्या की त्यांनीही त्या व्यक्ती पाहिल्या होत्या पण त्यांना ती दुसरी व्यक्तीही पूर्ण दिसली होती.

बस्स! एवढंच. नंतर मला जाग आली. असं विचित्र स्वप्न आणि तेमुद्धा चारपाच दिवसांच्या अंतराने पुन्हा पहाटेच्या वेळी पाहिलं, म्हणजे त्यात नक्कीच काहीतरी तथ्य असलं पाहिजे असं वाटलं. हे घरात कुणाला सांगितलं तर नक्कीच वेड्यात काढतील म्हणून ते मानात तसंच ठेवलं आणि नेहमीप्रमाणे कॉलेजमधे गेले. बाह्य-वातावरणात मिसळल्यामुळे स्वप्नाचा विचार मनाच्या एका कोपऱ्यात ढकलला गेला.

मागच्या महिन्यात गीतेच्या १६ व्या आध्यायावर काही प्रवचने ऐकली. "देह हा शरीर, मन, बुद्धी आणि आत्मा या चार तत्त्वांचा समूह आहे पण आत्मा नावाची काही चीज आहे अशी जाणीव बाह्यजगात समरसून गेलेल्या सामान्य माणसाला कधीच नसते, असं ऐकलं आणि वाटलं की, 'शरीर आणि त्या माध्यमामुळे होणाऱ्या मन आणि बुद्धी या जाणिवा, एवढंच मानवाचं अस्तित्व आहे असं समजणाऱ्या सामान्य माणसाचं प्रतीक म्हणून मैत्रिणीला ती व्यक्ती पूर्ण दिसली. जर मानवी अस्तित्वाचा शंभर टक्के भाग म्हणजे त्या व्यक्तीचं शरीर मानलं तर या अस्तित्वाचा मुख्य भाग आत्मा, तो सामान्य माणसांना जाणवत नाही. त्याचं प्रतीक म्हणून मला त्या व्यक्तीच्या शरीरातील मुख्य अवयव असणारे डोके दिसले नाही. अशी तर्कसंगती मनात आली आणि वाटलं की हाच त्या स्वप्नाचा अर्थ नसेल कशावरून?

खरंच, असा अर्थ लावायला काहीच हरकत नाही. सामान्य माणूस शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक पातळीवर वावरत असतो. कुडीत जोपर्यंत प्राण आहे तोपर्यंत वासनेच्या प्रवाहातून वाहणाऱ्या विचारौघांचे प्रबल इच्छांमध्ये रूपांतर झाल्यावर त्या शारीरिक पातळी-वर पूर्ण करायच्या आणि हे वागणे कसे योग्य आहे, याचे बौद्धिक पातळीवर समर्थन करायचे. अशा प्रकारचे आयुष्य तो जगत असतो. लहानपणापासून त्याच्यावर होणारे संस्कार आणि त्यांचे अनेकविध अनुभवभांडार यांच्या सहाय्याने तो जीवनाची दिशा ठरवितो आणि स्वतःच्या तत्त्वप्रणालीनुसार आयुष्य जगतो. सामान्यपणे आयुष्याच्या शेवटी त्याच्या लक्षात येते, "अरे, आपण जीवनाचा मार्ग आखण्यात काहीतरी चूक केली. आपण ज्याला सुख समजलो ते तर केवळ मृगजळ होतं." पण तोपर्यंत वेळ निघून गेलेली असते.

असं का होतं? या प्रश्नाचं उत्तर शोधायला गेलं तर असं कळतं की आयुष्यात आपण जे ध्येय मानलं तेच मुळी अयोग्य होतं तर ते साध्य करण्याचे मार्ग बरोबर कसे असतील? याचं कारण असं की जोपर्यंत आत्मा शरीरात आहे तोपर्यंत आपण जगणार, एवढीच या

आत्म्याबद्दलची जाणीव आपण सामान्य माणसांना असते. आपण जितके बहिर्मुख असू तितके आत्मज्ञानाच्या विरुद्ध दिशेने वाटचाल करू आणि जितकी ही वाटचाल जास्त तितकं आयुष्य दुःखमय ! साहजिकच आहे. प्रत्येकजण स्वतःला सोयीस्कर वाटेल त्या दृष्टीनं त्याच्या भोवतालचे जग बदलण्याचा प्रयत्न करीत असतो. आपलं मन आणि भोवतालचं जग सारखं बदलत असतं. आणि सर्व जग चालविणारी अतिमानवी शक्ती, तिची आपल्याकडून वागणुकीबद्दलची अपेक्षा आणखी तिसरीच असते. अशा परिस्थितीत आपल्या वागण्यात समतोल आणण्यासाठी आपणच भोवतालच्या परिस्थितीप्रमाणे बदलणं सोयीस्कर असतं.

आपल्या स्वतःच्या जीवनाबद्दलसुद्धा फार थोड्या गोष्टी आपल्या हातात असतात. आपले आईवडील कोण असावेत ? आपण कुठल्या देशात जन्माला यावे ? आपण ज्या कुटुंबात जन्माला येणार त्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती काय असावी ? हे आपण ठरवू शकत नाही. एवढंच काय तर आपलं नाव काय असावं ? आणि आपण किती वर्षे जगावं ? हे सुद्धा आपल्या हातात नसतं. आपण ठरवू शकतो ती फक्त एकच गोष्ट आणि ती म्हणजे जन्म आणि मृत्यू यांच्यामधला काळ कसा घालवायचा. यातसुद्धा आपल्या भोवतालची परिस्थिती आपल्याला हवी तशी असेलच असं नाही.

असं हे अनिश्चित आयुष्य जास्तीतजास्त सुखासमाधानाने जगायचं असं सर्वसाधारण माणूस ठरवितो. तो अशा आयुष्याचा वारसाच पुढे चालवितो असं म्हणणं अधिक बरोबर होईल. कारण या गतिमान जीवनात त्याला विचार करायला वेळ असतोच कुठे ? तो आपल्या मूलभूत गरजा कशा भागतील याच विवंचनेत असतो. भौतिक सुखे आणि पैसा म्हणजेच जीवनसार असं मानतो. या भौतिक सुखसोयींमुळे राहणीमान (standard of living) वाढते पण जीवनाच्या दर्जाच्या (standard of life) काहीच फरक पडत नाही हे बिचाऱ्याच्या लक्षातच येत नाही.

शरीर, मन, बुद्धी आणि आत्मा असा या चार तत्त्वांचा चढता क्रम आहे. उच्च पातळीवरील तत्त्व कनिष्ठ तत्त्वाच्या कार्याचे नियमन करते (subtler governs the grosser) एखाद्या घटनेबद्दल दोन तत्त्वांच्या निर्णयात फरक असेल आणि कनिष्ठ तत्त्वाचा निर्णय मानला गेला असेल तर आपण अस्वस्थ होतो आणि चूक दुरुस्त होईपर्यंत ही अस्वस्थता राहते. हा आपला हिंदू संस्कृतीचा वारसा आहे. म्हणजे आपण केलेली चूक आपल्याला कळते फक्त बरोबर मार्ग शोधायचा आणि आक्रमायचा हे पुढचे काम असते. जुने धर्मग्रंथ हीच गोष्ट आपल्याला सांगतात. लोणी हे जसं ताकाचं सारं त्याप्रमाणे ‘गीता’ हे सर्व धर्मग्रंथांचे सार आहे, त्यामुळे गीतेचा अभ्यासही आपल्याला बरोबर मार्ग दाखवील. अर्थात प्रत्येकाची आवडनिवड वेगळी असते. पण लहानपणी आई सांगते म्हणून आपण प्रत्येक पदार्थाची चव घेऊन बघतो तसं या बाबतीत करायला काय हरकत आहे ? आवडलेली गोष्ट आपण उचलतो आणि नावडती टाकतो. यासाठी कुणी तिसऱ्या माणसाने निर्णय घ्यायची गरज नसते.

आज अवतीभोवती कमालीची अस्वस्थता दिसते. यामागचे कारण म्हणजे एक भली मोठी पोकळी आहे. पाश्चात्त्य देशांमधे हे प्रमाण फार आहे. परंपरागत गोष्टी जुन्या वाटल्या म्हणून टाकल्या आणि सांस्कृतिक पार्श्वभूमी काही न उरल्यामुळे अस्वस्थता निर्माण झाली. भौतिक सुखे दुःखाच्या आगमनाने विरून जातात. पण आत्मिक आनंद ही चिरकाल टिकणारी चीज आहे. एकदा तुम्ही अंतर्मुख झालात की बाह्यजग किती फोल आहे याची जाणीव तुम्हाला होईल.

आपण ज्याला मानव समजतो तो पूर्ण मानव नसून मानवी व्यक्तिमत्त्वाचा हिमनगाप्रमाणे दृश्य असणारा काही अंश आहे. आपण आपल्यातील अज्ञाताचा शोध न घेता ज्ञात अंशाच संतुष्ट ठेवण्याचा प्रयत्न करतो. या नादात आपण आपल्या ज्ञानाचा पूर्ण उपयोग करीत नाही. मनावरचे ताण वाढतात आणि आपण प्राण्यांसारखे जीवन जगू लागतो. हे टाळण्यासाठी अंतर्मुख होणं आवश्यक आहे आणि ध्यान हे अंतर्मुख होण्यासाठी उपयोगी पडणारं एक महत्त्वाचं साधन आहे. लहानपणीच जर आपण ध्यानाकडे वळलो तर कितीतरी सुखाचे कण वेचता येतील ! प्राणिमात्रांपेक्षा आपल्यात जे काही जास्त आहे त्याचा उपयोग करून मानवत्वाकडे जास्तीत जास्त वळता येईल. वेळीच योग्य मार्ग निवडून खरंखुरं सुखी आयुष्य जगता येईल. तर मग आजच सुरुवात करू या. प्रत्येक गोष्ट पाश्चात्त्य देशात जाऊन त्याचे महत्त्व त्यांनी सांगायची वाट कशाला पाहायची ?

★

# आजची शिक्षणपद्धती

**दशरथ सातपुते**
तृतीय वर्ष, कला

उंबरठ्याचे माप ओलांडताना सहज मागे नजर जाते, नकळत. कदाचित मानवी स्वभावाचा तो गुणधर्म असेल. पदविकेचे शेवटचे वर्ष ओलांडताना माझ्या मनात असेच विचार येताहेत.

मी मिळवलंय काय ?...मी येथे का आलो ?...काय शिकलो ? काय होणार ? माझ्यात घडणाऱ्या ह्या स्थित्यंतराचा विचार करताना मन केव्हा शैक्षणिक पद्धतीवर येऊन ठेपते याचा पत्ताच लागत नाही. मग मात्र मीच मला विचारतो हे शिक्षण आहे तरी काय ? म्हणतात विद्या स्वतःच्या विकासासाठी व जिज्ञासापूर्तीसाठी पण माझी जिज्ञासा खरोखरच का तृप्त झाली आहे ? माझा विकास खरोखरच का घडून आला आहे ?

इंग्रजांनी दिलेली बहुमोल शिक्षण पद्धती [ जिचे वर्णन लोकमान्य करतात " युनिर्व्हसिट्या उर्फ सरकारी हमालखाने ! " ] समाजाच्या व सरकारच्या कृपेने चालू आहे. इंग्रजीच्या आग्रहामुळे महाविद्यालयाचे जीवन कुंद करून टाकले आहे. स्वाभिमानशून्य शिक्षणामुळे भरजरी भडक कपड्यांत मन गुंतले आहे. शिक्षणाने मन विकसित न होता, नाजूक पावलांच्या, धुंद करून टाकणाऱ्या तारुण्यातील मादक सौंदर्याने बेफाम होत आहे. याला कारणीभूत आजचे शिक्षणच नाही काय ?

आजचे पुस्तकी ज्ञान कसले तर भौतिक जीवनाची चटक वाढविणारे पाश्चिमात्य धर्तीचे, पाश्चिमात्य संस्कृतीचे. पाश्चिमात्य नियमन आधारभूत मानून ठरविलेले. माझ्यासारखे विद्यार्थी खेड्यांपाड्यांतून जेव्हा येतात तेव्हा मातृभाषा सापडलीच तर ठीक, अन्यथा परकीय भाषा माध्यमामुळे चवहीन वाटणारा अभ्यास आणि तरुण वयातील आकर्षणे यामुळे यांच्या शिक्षणाचा बोऱ्या वाजतो आहे.

नवीन अभ्यासक्रमाचा विचार महाराष्ट्रात सुरू झाला. राजकारणातून मंडळ नेमण्यात आले. उभ्या जगाची पायपीट झाली व सर्व जगाचा अर्क ओतून नवीन शिक्षण पद्धती जन्माला आली चांगली की वाईट भविष्यकाळ ठरवेलच पण ह्या महामंडळाने एकदा भूतकाळातदेखील प्रवास करावयाला हवा होता. केवळ सरळ हात पसरून तळ गवसणार नाही त्यासाठी खाली वाकून भूतकाळात चाचपडायला हवे होते. नाही तरी काय दिसते आहे ?

इंग्रजीचा सराव होण्यासाठी परकीय भाषेवर भर. त्यामुळे स्वभाषेच्या अध्ययनाचा आनंद ( ! ) आहे. देवनागरी लिपीतील अंक व अक्षरे लुप्त होत चालली आहेत. अभ्यासाचा भार वाढत आहे. पुस्तकाचा खर्च वाढतो आहे. बुद्धिमान होण्यासाठी पुस्तकांची संख्या वाढते आहे. पण हे सर्व वरवर आहे. चौथी पाचवीतला विद्यार्थी ऑस्ट्रेलियाच्या सीमा रेषा सांगू लागला आहे. छोट्या छायाला विचारा " सीमा म्हणजे काय ? " ती म्हणेल " माझ्या ताईचे नाव. " खेळण्याच्या वयात धडपडत बाहेर पडलेले पोरगे शाळेच्या वाटेवर दिसेल, न सावरणारे दप्तर सावरत अशा प्रकारे लहान होत होत जेव्हा मी पाच वर्षांवर उतरलो तेव्हा खाडकन् जागा होतो लक्षात येते मी पदवीधर होणार. माझे मित्र, मैत्रिणी माहीत असलेल्या, माहीत नसलेल्या ह्या एका विश्वातून बाहेर पडणार. मग मी भविष्यकाळात वावरू लागतो.

एक किडकिडीत देहयष्टीचा तरुण सिगार शिलगावत चाललाय. गालावर केसांची झुलपे. तोंडात सिनेमांची गाणी. स्वाभिमान ? तो तर नोकरी शोधता-शोधता केव्हाच मेला आहे सॉरी. तो नव्हताच भ्रष्टाचाराचे धडे शिकतो आहे. कामवासना मोकळ्या वेळात बोलायचा विषय झाला आहे. भूक लागली आहे, आपल्या फटकुऱ्यात काय बांधलंय म्हणून गाठ सोडावी तर " स्वतःचेच छद्मी हास्य दिसते आहे. " स्वार्थाचा धंदा करावासा

वाटतो. कलेचा बाजार मांडावासा वाटतो. सौंदर्याचा लिलाव मांडावासा वाटतो. बस. येवढीच ज्ञानाची शिदोरी आहे, आणि किलकिल्या नजरेने समाजात स्वतःचे स्थान शोधत असताना मी केव्हा पुढारी होऊन जातो पत्ता नाही.

नोकरीसाठी सैरावैरा भटकणारा, स्वतःची शेती असताना, शेती सोडून, कोळी असून मच्छिमारीची लाज वाटते. म्हणूनच केव्हा एखादी युनियन जन्माला येते पत्ता लागत नाही. बेकारांची संख्या वाढलेली असते. उद्या भाषण असते. समोरच्याच मैदानावर, कोणातरी पोरां-समोर सिगारेटच्या धुरात धुरकट होत चाललेला मी विषय पहात असतो तटस्थपणे "आजची शिक्षणपद्धती." ज्याचे फलित माझी आजची स्थिती तीच ना ? स्वतःवर स्वतःच चिडतो. इतक्यात सिगारेट संपत आल्याचे लक्षात न आल्याने चटका बसून बोटातून सिगारेट गळून पडते. जसा माझा स्वाभिमान ह्या शैक्षणिक जीवनात गळून पडला तशी...

★

---

## जीवन

जीवन म्हणजे एक स्वप्न म्हणतात
पण हे खरे का ?
मुळीच नाही.
स्वप्नात दिसणारे सारेच कधी जीवनात
चालत असते का ? तो तर खेळ कल्पनांचा
सत्यात कधी उतरेल का ?
जीवन म्हणजे एक बाग म्हणतात
पण हे खरे का ?
मुळीच नाही
बागेत फुलणारी सारी फुले जीवनात उमलतात का ?
तो तर सारा मृदुभाव
काटे बोचायचे राहतील का ?
जीवन म्हणजे एक तळे म्हणतात
पण ते खरे का ?
मुळीच नाही
तळ्यामधील सुखाचे तरंग जीवनात उमटतील का ?
पाण्यात साचलेल्या शेवाळ्यावर पाय घसरायचा
चुकेल का ?

**रेखा कुलकर्णी** ११ वी, वाणिज्य

# सजगणी

**गंगाधर वा. गायकवाड**
द्वितीय वर्ष कला

कवळी उन्हं जून होत चालली होती. खेळकर झालेलं वातावरण उदंड उघडलं होतं नी त्याच्याकडं बघत बसलेली बुकाबाई कष्टानं हात गुंतवून बसली होती. तिच्या भोवती फुललेली सजगणी तिला भूल पाडत होती नी बुकाला एकटं एकटं वाटत होतं. दाम्या तिथं नव्हता; कुठं गेला हुता ? बुका उठली. घारीसारखी इकडं तिकडं नजर टाकली; कायबी दिसेना. " कुठं गेला ह्यो ? साळंची येळ झाली ! " सजगणीच्या शेजनं चाललेली वाट जिती झाली. तिच्यात बुकाचं मन गुतलं; वाटनं येत असलेली बैलगाडी तिच्या बगलनं आली तसी तिच्या पोटात आग उठली. मनाचा भडका झाला नी काळीज हाललं, गाडीनं एक बाई आपल्या नवऱ्याला कुठंतरी घेवून चालली होती. असाच परसंग तिच्यावर आला होता. बुकानं कपाळाला हात लावला. पांढरफट कपाळ डोळ्यात उतरलं नी पुढ्यातल्या मातीचा टवका मनात उतरला. जिकडं तिकडं अंधार दाटला; नी बुकाच्या डोळ्यांत तळं साठलं. डोळ्यांच्या कपारीतून येणाऱ्या पाण्याच्या लोटाबरोबर एक एक आठवण मनाच्या कप्प्यातून झिरपू लागली. त्यातच बुका गुंतून पडली.

लग्न झालं होतं. नांदाय आल्यावर सासर लागलं हेवा करायला. देहीचा कोपरा नी कोपरा नवतीनं भरलेला, तवा भावकी, गावकी भिर्र, भिर्र बघून बोलायची " ही बया का सौसार करनार व्हय त्येचा; जाईल कुनाचा तरी हात धरून, आगीचं कांड हाय नव्हं नुस्तं ! " पर गावाचं नी भावकीचं बोलणं खोटं केलं. सौसार उभा केला. गावानं तोंडात बोट घातलं नी दैवानं पाठ फिरवली. त्याच्या देहीला अपाय लागला. डागदार केलं, दवा, दारू देव, देवरशी ह्यातच सारी कमाई घातली. तरी गुण पडला न्हाय. दैवानं पुरती सरती पाठण धरली नी त्येचा आजार वाढत गेला. पदरचा पैका खर्ची पडला. तवा वतनावर त्येस्नी घेवून आली नी वतनाच्या मातीआड घातलं.

कुठं गेलेला दाम्या आला. त्येनं हाळी मारली नी बुका भानावर आली. तिनं पदरानं डोळं पुसलं " दाम्या ! कुठं हुतास; आरं साळंचा वकुत झालाय नव्हं ? "

" व्हय, झालाय पर आज मास्तर वाडीला गेलाय सत्यीनारानाची पोथी वाचाय, तवा म्हणलं आपून तरी का गप बसा ! "

" आरं करणीच्या हिऱ्या काय करून आलास "

" हे बघ ! " दाम्यानं टोप माईच्या पुढं धरला; हिवाळ वास तिच्या नाकात शिरला नी टोपातलं मासं पवाय लागलं.

" दाम्या हे खरं न्हाय, त्वा साळा शिकावी लई, लई शिकावं, मोठं व्हावं. नी ह्या सजगणीची शाल पांघरून फिरावं, जगानं तुझ्याकडं कौतुकानं बघावं. "

" आऽये मलाबी तसंच वाटतंय ग, पर करू काय ? त्यो कुलकर्णी मास्तर लई वंगाळ हाय, मारकुट्या बैलागत अंगावर धावतुया त्येचं मला लय भ्या वाटतंय. कुत्रं मागं लागल्यागत लागतू नी म्हणतू कसा " घंटा हुयाच्या आत हजर रायला पायजी, न्हायतर मायंदाळं हाणतुया ! "

" हाणू दे. टाकीचं घाव घेटल्याबगार देवपण न्हाय बाबा ! "

" बरं मग मी टाकीचं घाव घेतू, नी देव व्हतू, मंग बस माझी सेवा करत ! " म्हणत दाम्यानं पाटी उचलली, आतडी गोळा झाली. त्यानं पोटावर हात फिरवला " आये वाइच तुकडा हाय का ? भुका लागल्यात ! "

" बघ रातची आमल वाईच भाकरी, साळंतनं ये, तवर ताजी करून ठेवती. "

" रोज आसंच म्हणतीया; नी शिळंच देतीया ! " दाम्यानं भाकरी नी दोन कच्चं बोंबील घेतलं नी वाटेनंच खात निघाला. शाळेजवळ आला तवर त्याचं खानं सरलं

नी साळा भरली होती. साळंतली सारीच्या सारी पोरं दाम्याकडं बघून नाक चुरगाळीत होती. नी कुलकर्णी मास्तर दाम्याच्या औताराकडं बघून डोळ्यांत इंगाळ फुलवत होता. त्यानं तोंड मोडलं नी पिसाळल्या कुत्र्यागत धावला.

" नालायक. दाम्या, पळ आधी अंघोळ करून ये. कसली घाण खाऊन आलास वास येतूय ! "

" मंग, मास्तर माशाचा का सुवास येतू ! " कुलकर्णी मास्तरला सवाल टाकून दाम्यानं धूम ठोकली. वाटेवरचं दगड, धोंडं नी काटं तुडवत ओढा गाठला. तर भूल पडलेलं मासं पाण्यावर तोंड काढून पाणी पिवून पाणी वकाय लागलं होतं. दाम्याला भूल पडली, नी त्यानं कापडासकट पाण्यात सूर मारला. हाताला लागलेलं मासं गाजरागत खिशात भरलं, खिसा भरल्यावर सदऱ्याच्या पुढच्या पाख्यात धरलं नी वर बघितलं, तर कुलकर्णी मास्तर हातात निरगुडीचा हिरवागार फोक घेऊन उभा. बगळा हागल्यागत सदऱ्याच्या पाख्यातलं मासं पाण्यात तरंगू लागलं. नी दाम्यानं घराची वाट धरली. ओल्या अंगातनं पाणी ठिबकत होतं नी उन्हानं अंगातलं पाणी आटून घाम फुटत होता. दाम्या वाघ मागं लागल्यागत पळत होता. त्याला आपल्या आईच्या आधाराशिवाय दुसरं काहीच दिसत नव्हतं. दाम्या गाव विहिरीच्या बगलंला लागला त्याला पाटलाच्या शेवंतीनं हाक मारली.

" दाम्या आसं कुत्रं मागं लागल्यागत का पळतूयास ? वाईच हिकडं ये, मी संकटात हाय. माझ्या हाताला ही पाण्यानं भरलेली बारडी येईना झाली. हाताला लय रग लागली बघ. ये. ह्यो दोर वाइच वढून धर म्हंजी मी बारडी काढते. " शेवंतीच्या बोलानं दाम्या गुदमरला त्याला नाही म्हणता येईना. पाटलाची लेक ती. तिची मरजी राखाय पाहिजे. मास्तर मागे लागलेला, मराण मागं लागल्यागत. तरी दाम्या बोलला, " शेवंते मी तर मोठ्या संकटात पडलुय, कुलकर्णी मास्तर फोक घेऊन मागं लागलाय, त्यात तुला शिवलो नी त्येनं बघितलं तर माझ्या मुडद्याचीच गावात धिंड निघल. "

नाही होय म्हणता दाम्या विहिरीवर गेला. त्यानं शेवंतीला बारडी काढाय मदत केली नी मास्तर तिथं आला. मास्तर आला नी खाली बघुन हाय म्हणून लागला दाम्याला चोळायला मासं चोळल्यागत. तवा शेवंतीनं बोंब ठोकली नी सारीच साळा बाहेर आली. दाम्याला मास्तर मारीत होता नी दाम्या धायमोकलून हंबरत होता. दाम्यानं एकदा शेवंतीकडं नी विहिरीकडं बघितलं नी पुढं त्याला काय कळलंच नाय. मास्तरानं टकुरं खाजवलं नी कसला तरी विचार करून इकडं तिकडं बघितलं. दाम्यालाच विहिरीत टाकायचा विचार होता. पण माणसांचा जथाच अवती-भोवती जमा झाला.

उन्हं चढत होती नी धरणीचा माथा कढत होता. बुकाला दाम्याचं एकाएकी ध्यान झालं. तिनं सकाळीच आणलेल्या माशाचं कोरड्यास कढवून उतरलं नी चुलीवर तवा ठेवला. पैलीच भाकरी भाजली नी गणप्यानं तिला हाक मारली, " अगं ये बुके ! काय करतीयास ? "

" कोन गणपा, या की. आता पोरगं साळंतनं ईल. भूक...भूक करल, तवा भाकरी टाकली, सकाळपासनं पोरगं गेलंया भूक...भूक करीत, आत्ता इल बघा. तवा दोन भाकरी टाकून घेते. "

" बुका ! दाम्या आता का भाकरीला शिवणार व्हय ! त्येला शुद्ध हाय कुठं ? "

" काय म्हणताय गणपा ? "

" खरं म्हणतुया. मायंदाळं हाणलंय त्येला मास्तरानं. म्हणं त्येनं शेवंतीची आगळीक केली. "

बुकानं एकदा चुलीकडं बघितलं नी वारं झाली. भनाट निघाली. गेली तशी दाम्याच्या अंगावर पडली. दाम्या निपचित पडला होता. त्येच्याभोवती पोरांचं कडं पडलं होतं; नी बेभान झालेली बुका बोलत होती.

विहिरीच्या पल्याड मोकळ्या वावरात साळुंक्यांनी गलका करून रान उठवलं होतं. फणा उभारून उभी नागीण फुत्कारत होती. तिच्या फुत्कारानं साळुंक्या हालल्या होत्या नी मुंगसानं मात केली होती. त्येच्या माराला तोंड द्यायचं बळ तिच्यात नव्हतं. फणा पाडून ती पळत होती.

बुकानं दाम्याळा कवळ घालून उठवला. त्येला घरी आणला. दोन चमचं पाणी त्येच्या पोटात घातलं.

निर्भान झालेला दाम्या भानावर आला होता. बुकाबाईचा नूर उतरला होता. तिच्या डोळ्यांचं तळं फुटलं होतं. अन् धायमोकलून ती रडत होती. फुललेली सजगणी तिच्या अंगणात बहरली होती. नी पाखरांचा थवा फुललेल्या सजगणीचा उपभोग घेत होता. बुका एकटीच घरात होती. दाम्या वेदना साहून आईला आधार देत होता.

" आई आपला जन्म ह्यासाठीच देवानं घडवलाय का ?

" किरड्या कशाला ग्याला होतास तकडं ! आपून आपली पायरी सोडून वागायचं नाही हे कितीदा सांगितलं तुला, आपलं ह्या जगात कुनी–कुनी न्हाय. "

" आये असं कसं व्हईल ! सारं जग बोंबलतय आपून देवाची लेकरं हाय, पर ह्यो देवच्च कोपलाय. "

" मंग त्यो 'मास्तर का येडा हाय ? म्हणं म्हणतुया त्या शेवंतीची आगळीक केली. "

बुका दाम्याला बोलत होती, नी दाम्या निर्वाणीवर येवून निवरानिवर करून सांगत होता. खरं काय कुनाला कळत नव्हतं. बुकाचं डोळं सजगणीवर पडलेलं. भर्रारा पाखरं उडाली. घरात दाम्या त्यापाटात पडलेला. त्येच्या पाठीचं धिरडं झालेलं.

बुका उठली नी बाहेर आली, इकडं तिकडं बघून दोन मातीचं ढेकाळं सजगणीवर टाकलं. तिची नजर आंब्याच्या खोडात गेली. नी बुकाच्या डोळ्यांत इंगाळ फुललं.

" शेवंते तू मोठ्याची पोर ! आम्हाला ह्या गावात राहू देताय का ? पळवून लावायचा इचार हाय ? "

बुका बोलली. आभाळ भरल्यासारखं झालं. जड झालेलं अंतःकरण पायानं दाबत शेवंती बोलली,

" न्हाय ! म्या कायबी केलं न्हाय, मी उगाच्च कुणावर आकरीत घेवू. दाम्यानं मला परसंगाअंती हात दिला तो कुलकर्णी मास्तरला बघावलं नाय. मी खरं सांगते दहा नव्हं हजार माणसांत उभी राहून सांगीन की, दाम्याची काय बी आगळी नाय. "

मंग मगाशी का तोंडाला फोड उठला व्हय ? "

बुका बोलत होती नी शेवंती खाली मान घालून दाम्याच्या घराकडं चालली व्हती. लेपाट हाललं. दाम्या उठून बसला. " शेवंते आलीस व्हय तू ? " दाम्याच्या बोलानं शेवंतीला कसनुसं वाटलं. नी ती दाम्याजवळ बसली तिनं त्याच्या पाठीवरून हात फिरवला. फुलं पडल्यागत वाटलं दाम्याला.

" आये शेवंती तशी न्हाय ! आमचं कुणाला कळायचं न्हाय, कशी जिवात जीव गुतवून बसली बघ ! "

---

## खिशातली मजा

ओळखा पाहू खिशात काय आहे माझ्या ?
नाही येत ? हरलात ? आहे खूप मज्जा
वाळूतला शंख, पानातला किडा
पाकोळीचा पंख, रंगीत खडा
मोराचं पीस, पिंपळाचं पान
फुटक्या कपाचा तुटका कान
बांगडीची काच, वाकलेली पिन
शर्टाचं बटन, केसाची रिबन
मेणाच्या टिकल्या, पतंगाचा मांजा
बघा नीट वाकून, आहे ना मजा
काहीच नाही दिसत ? असं कसं झालं ?
खिशाच्या भोकातून सारच गळलं !

**रेखा म. कुलकर्णी**, ११ वी वाणिज्य

---

# ह्या शेवटचा प्रयत्न तरी

**श्रीनिवास नारळीकर**
तृतीय वर्ष, शास्त्र

माझी ही गोष्ट जेव्हा तुमच्या हातात पडेल तेव्हा मी कुठे आणि कोणत्या अवस्थेत असेन याची मी काही-देखील कल्पना करू शकत नाही आणि त्याला कारण-देखील तसेच सबळ आहे. माझे आणि त्याबरोबर तुमच्या सर्वांचं देखील भवितव्य एका पिसाट, अविचारी माणसाच्या हातात सापडलं आहे. ज्याला हे वाचायला मिळेल त्यानं प्रयत्नांची पराकाष्ठा करून मानवजातीच्या भवितव्यावर दाटून आलेला संकटाचा काळाभोर ढग दूर करण्याचे प्रयत्न करणं आवश्यक आहे नाहीतर एका माणसाची सत्ता संपूर्ण जगावर चालू लागेल.

ह्या सर्व गोष्टींचं मूळ माझ्या त्या मित्रापर्यंत जातं. त्यानं आणि मी कॉलेजची काही वर्षे एकत्र घालवली होती. त्याच्या खऱ्या नावापेक्षा आम्ही कोणत्या तरी टोपण-नावानंच त्याला ओळखत होतो आणि आता तर तेही माझ्या लक्षात नाही. ( ह्या त्याचाच एखादा उद्योग तर नाही ना ! ) विशेष आकर्षक नसलेलं व्यक्तिमत्त्व, अगदीच कुशाग्र नसला तरी निष्क्रिय नसणारी बुद्धी, कोणत्याही विषयावर क्षणार्धात एकाग्र होणारं मन याबरोबरच त्याचा मला स्पष्टपणे आठवणारा विशेष म्हणजे कोणावरही प्रभाव पडू शकणारे त्याचे डोळे. ह्या डोळ्यांमुळेच कदाचित् तो कोणाला सापडवता येईल.

पदवी घेतल्यानंतर बरीच वर्षे आमची गाठभेट नव्हती त्यानं गणिताचा बराच अभ्यास केल्याचं मी ऐकलं होतं. त्याच्या भेटीचा योग बऱ्याच वर्षांनी आला. परंतु हीच भेट काही दिवसांनंतर माझ्या मनाच्या शांततेच्या ठिकऱ्या उडवणार आहे असे मला कोणी सांगितलं असतं तरी मी त्याला वेड्यात जमा केलं असतं.

एकदा मी रस्त्यावरच्या पुस्तकांच्या ढिगाऱ्यात काही पुस्तकं शोधत असताना माझ्या पाठीवर थाप पडली आणि नवीनच लागलेल्या चष्म्याआडूनही चमकणाऱ्या त्याच्या ' त्या ' डोळ्यांवरून मी त्याला लगेच ओळखलं. त्याच्या चेहऱ्यावर कोणतातरी नवीनच एखादा अगम्य भाव वसतीला आल्याचं जाणवत होतं.

तो मला जवळच असणाऱ्या त्याच्या घरी घेऊन गेला. त्याच्या घरात त्यानं राहण्याची जागा आणि प्रयोगशाळा असे दोन भाग केले होते. ह्या गणिताच्या विद्वानाला प्रयोग-शाळेची काय आवश्यकता असाही एक विचार माझ्या मनात चमकून गेला. परंतु त्यानं तो विषय तिथंच सोडल्यानं मीही फारशी उत्सुकता दाखवली नाही. त्या दिवशी गप्पा मारता मारता आमचा बराच वेळ गेला. कॉलेजमधील मैत्रिणी, मित्र, प्राध्यापक असे अनेक विषय संपले.

त्यानंतर मात्र मी त्याच्याकडे वरचेवर जाऊ लागलो; माझ्या येण्याबद्दल त्यानं नापसंती न दाखविल्यामुळे माझ्या त्याच्याकडं जाण्याला उत्तेजनच मिळालं. परंतु ह्या सर्व भेटीत त्याच्या अभ्यासाबद्दल अथवा संशोधनाच्या विषया-बद्दल मात्र त्यानं पूर्णपणे मौन बाळगलं होतं आणि मी-देखील त्याच्या त्या प्रयोगशाळेत प्रवेश करण्याची उत्सुकता दाखवली नाही. आणि मी त्या प्रयोगशाळेत कधीच शिरलो नसतो तर आज ही पाळी आली नसती असे मला अजूनही वाटते.

परंतु एके दिवशी आपण होऊनच तो मला त्याच्या त्या प्रयोगशाळेत घेऊन गेला. प्रयोगशाळा कसली, एक लांबलचक हॉलच होता तो ! आणि त्या हॉलमध्येदेखील उपकरणे अशी फारच थोडी होती. इतर कशापेक्षाही माझे लक्ष अधिक वेधून घेतलं ते त्या हॉलच्या भिंतीवर अडकवलेल्या काळ्या रंगाच्या छोट्या छोट्या पेट्यांनी. त्यातल्या प्रत्येक पेटीला एक क्रमांक दिलेला होता. त्यांची संख्या शंभराहूनदेखील जास्त असावी. प्रयोगशाळेत एक प्रकारची गंभीर शांतता पसरली होती पण त्या शांतते-आड कोणततरी संकट दडून बसलं असेल आणि

कोणत्याही क्षणी ते हल्ला करेल असे मला राहून राहून वाटत होतं.

आत गेल्यावर काहीतरी महत्त्वाचं नजरेस पडेल अशी अपेक्षा बाळगणाऱ्या माझी पूर्ण निराशाच झाली. परंतु तरीही त्या पेट्यांमध्ये काय असेल ही उत्सुकता मनाला जाळीत होतीच. त्यानं एक पेटी काढली आणि मला उघडायला सांगितली. मी ती पेटी उघडली मात्र आणि माझ्या तोंडून शब्दच फुटेना. आत जे काही होतं त्याला आकार होताही आणि नव्हताही. अनेक रंग त्या वस्तूवरून परावर्तित होत होते आणि त्यातल्या कित्येकांची तर मला नावेदेखील माहीत नव्हती. खोलीतला प्रकाश त्या वस्तूवरून पेटीच्या आतील बाजूवर ओघळत होता आणि त्या प्रकाशात त्या वस्तूचे आकार क्षणाक्षणाला बदलत होते. एखादे पारदर्शक रेशमी वस्त्र म्हणावे तर त्याला एखाद्या हिऱ्याप्रमाणं पैलू दिसत होते आणि तरीही त्याचा आकार क्षणाक्षणाला बदलत होता.

मी ती पेटी बंद केली आणि प्रश्नार्थक मुद्रेनं त्याच्याकडं पाहिले. माझ्या नजरेतला आशय ओळखून त्यानं माझ्या आयुष्यात ऐकलेल्या एका अविस्मरणीय व्याख्यानाला प्रारंभ केला. बोलता बोलताच तो हॉलमधील एका फळ्याकडे जाऊन त्यावर काही समीकरणं मांडत होता. त्या फळ्यावर निरनिराळ्या चिन्हांची आणि समीकरणांची एवढी गर्दी झाली होती तरी त्यातही ठळक अक्षरात लिहिलेले एक उत्तर उठून दिसत होते आणि तेच त्याच्या संशोधनाचं फळ होतं हे मला नंतर कळलं. त्यानं सांगितल्यापैकी फारच थोडा भाग मला कळला परंतु जे काही मला कळलं ते इतरांना देखील कळावं म्हणून मी तो भाग त्याच्याच शब्दात देण्याचा प्रयत्न केला आहे.

" ह्या सर्व गोष्टींची सुरुवात आलेखासारख्या एका अतिशय सोप्या गोष्टीपासून होते. " तो म्हणाला होता. " समजा आपण एक आलेखाचा कागद घेतला तर त्यावर X आणि Y असे दोन अक्ष (axes) असतात. हीच अक्षांची संख्या अवकाशात (space) तीन होते आणि X, Yआणि Z असे तीन अक्ष मिळतात. हल्ली काळ (Time) हा चौथा अक्ष मानला जातो. म्हणजेच तीन अथवा चारहून अधिक अक्षांची कल्पना आपण स्वप्नातदेखील करू शकत नाही. "

" परंतु हाच विषय आपण मनाच्या पातळीवर पाहू या. शरीराच्या जडपणामुळे येणाऱ्या मर्यादा मनाच्या तरल पातळीवर जवळजवळ नाहीशा होतात. मनाची शक्ती अमर्याद असल्याचे आपण म्हणतो तो याचकरता. आता समज तू एक हिंदू आहेस. तूच असं नाही तर प्रत्येक व्यक्तीच्या बाबतीत हेच लागू पडतं. अर्थातच तुला भेटणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या मनात तुझी एक प्रतिमा असते. आता तुला भेटणाऱ्या व्यक्ती किंवा त्यांची मनं म्हणजे आपल्याला अनेक (अनंत?) अक्ष मिळतात. त्या प्रत्येक अक्षावर तुझी एखादी खूण म्हणजेच, तुझ्या मनाचे projection असते. आणि अशा अनेक निर्देशांकांमुळेच (co-ordinates) एखादा बिंदू म्हणजेच तू निश्चित होतोस. आता हे बघ तू तुझ्या आई-वडिलांचा मुलगा, आजीचा नातू, बहिणीचा भाऊ, धाकट्या भावाचा दादा, मित्रमैत्रिणींचा मित्र ही सगळी निरनिराळ्या अक्षांची projections आहेत आणि ह्या सर्वांची मनं म्हणजेच निरनिराळे अक्ष! "

" आता ह्या पेटीत जे काही आहे ते म्हणजे त्या व्यक्तीचे किंवा त्याच्या मनाचे प्रतीक आहे. एखादी प्रतिकृतीच म्हणाना! अर्थात माझ्या इच्छेनुसार मी त्यावर नियंत्रण बसवू शकतो. पण मी अजून तरी तसे काहीच केले नाही. आपल्या मेंदूला अशा अनेक अक्ष असणाऱ्या वस्तूंची सवयच नसते म्हणून ही वस्तू अशी दिसते. "

" ही वस्तू मी कशी केली किंवा ह्याची कल्पना मला सुचली हे तुला कळेल असे मला वाटत नाही. परंतु एकच सांगतो की मी शंभराबर असे नमुने आतापर्यंत तयार केले आहेत आणि त्याच्या त्या व्यक्तीवरील नियंत्रणाची


## तुमची पुस्तके एक ऋणानुबंध

सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या परीक्षेत आम्ही हार्दिक सुयश चिंतितो. परीक्षा झाल्यावर आपली पुस्तके महाविद्यालयाच्या ग्रंथालयास भेट द्या. अनेक होतकरू विद्यार्थ्यांची ज्ञानपिपासा ही पुस्तके भागवतील व हे विद्यार्थी तुम्हाला दुवा देतील.

महाविद्यालयाच्या ग्रंथपालांजवळ ही पुस्तके द्या. तुम्हाला हवीत त्या वेळी तुमची पुस्तके तुम्हाला ते परत देतील.

प्राचार्य, मॉडर्न महाविद्यालय

परीक्षाही घेतली आहे. तू आता प्रत्यक्षच बघ ना!"

"आता गावात निवडणुकीची सभा चालली आहे. त्यातला व्यासपीठावर बसलेला एक नेता मधूनच उठून शेजारच्या झाडावर चढायचा प्रयत्न करेल. आता हे खरे की खोटे तुला उद्याच्या वर्तमानपत्रातून कळेलच. आणि अशा अनेक प्रयोगांचा त्रयस्थ निरीक्षक म्हणून मी तुझी निवड केली आहे."

एखादी शंका काढण्याचे धाडस माझ्याने होणे शक्यच नव्हते आणि तो म्हणतो तसे होईल यात मला शंकाही नव्हती आणि झालेही तसेच.

एक दिवस मी त्याच्याकडे गेलो असताना (हल्ली माझं त्याच्याकडे जाणं बरंच वाढलं होतं) त्याने एक नवीनच प्रयोग दाखविला. त्याच्या सांगण्याप्रमाणं त्यानं तशा दोन वस्तूंचं 'super-imposition' केलं होतं. त्या व्यक्तींची नावंही त्याने मला सांगितली. आणि दुसऱ्याच दिवशी त्या दोन्ही प्रतिष्ठित व्यक्तींना वेड्याच्या इस्पितळात दाखल करावं लागल्याचं मला कळलं. मानवी मन आणि मेंदू अशा पाशवी प्रयोगांसाठी नव्हतेच मुळी!

त्या दिवसापासून त्याच्या प्रयोगांमधील निर्दयता आणि स्वार्थांधता वाढतच गेली. त्याने एका निरपराध माणसाचा खून स्वतःच्या शत्रूकडून घडवून आणला. दिवसेंदिवस त्या पेट्या तयार करण्याचा त्याचा वेगही वाढता होता. त्या पेट्यांना जे क्रमांक दिले त्या व्यक्तींची नावेही त्यानं मला सांगितली होती आणि ती नावे ऐकून माझी पाचावर धारण बसली होती. कोण नव्हतं त्यात? डॉक्टर, उद्योगपती, कारखानदार, शिक्षणशास्त्रज्ञ असे बरेच कोणी!

काही दिवसांनी त्याच्या एका पुस्तकाला बक्षीस मिळाल्याचं ऐकून मी चकित झालो कारण ते पुस्तक त्या स्पर्धेच्या नियमात बसू शकेल किंवा नाही याबद्दलदेखील प्रवादहोते. परंतु त्या स्पर्धेच्या परीक्षकांची नावं ऐकताच माझी शंका खरी ठरली. त्यातला प्रत्येक माणूस त्याच्या पेटीत (?) होता.

दिवसेंदिवस असल्या ह्या भीषण स्वार्थांध प्रयोगांचा साक्षीदार झाल्याची खंत माझ्या मनाला पोखरत होती. त्यामुळेच की काय पण हल्ली माझ्या बोलण्यात त्याच्याविरोधी सूर मधूनच चमकत होता. आणि तो तसे दर्शवत नसला तरी माझ्या त्या बोलण्याने त्याला चांगलाच धक्का बसल्याचे मला जाणवलं होतं; न दिसणारा देव (किंवा नियती) साऱ्या विश्वाची सूत्रं वागवत असताना देखील सामान्य माणसाच्या वाट्याला इतकी दुःखे येतात. मग हा तर काय हाडामांसाचा माणूस सत्तांध आणि स्वार्थांध! पुढे काय होणार त्या कल्पनेनं माझं मन हादरून गेलं.

एक दिवस बोलता बोलता मी गमतीनं त्याला "काय रे, माझं मन तयार केलं आहेस की नाही तू अजून?" "सध्या त्याच उद्योगात आहे मी! होईल चार-आठ दिवसांत तयार." त्यानं नेहमीच्याच शांत आणि गंभीर मुद्रेने उत्तर दिले.

मला जोरदार धक्का बसला. मला देखील गुलाम करून टाकायचा विचार होता तर त्याचा! चार-आठ दिवसांनंतर मी स्वतंत्रपणे विचारदेखील करू शकलो नसतो. जे काही करायचे ते ह्या चार-आठ दिवसांतच करायला हवं होतं. अप्रत्यक्षपणे हे सांगून त्याने माझ्यावर उपकारच करून ठेवले होते.

दुसऱ्या दिवशी मी हे सर्व संपवायचा दृढ निश्चय करून त्याच्या प्रयोगशाळेत आलो तर काय? सगळीकडं कुलपं लागली होती. शेजारीपाजारी चौकशी करता सर्वसामान घेऊन तो कोणत्या तरी अज्ञात ठिकाणी निघून गेल्याचं कळताच माझ्या सर्व गात्रांतील बळच नाहीसं झालं. एवढ्या प्रचंड जगात त्याला शोधून काढणं अशक्य होतं. मी आता काहीच करू शकत नव्हतो. नाही म्हणायला माझ्यावर ताबा मिळवण्यापूर्वी ही सर्व हकीकत लिहून काढून ती सर्वांना कळवणं हाच एक मार्ग होता आणि तोच मी स्वीकारला आहे. ह्या हकीकताच्या चार-पाच प्रती काढून मी निरनिराळ्या ठिकाणी टाकल्या आहेत. ज्याला ह्या प्रती मिळतील त्यानं आपापल्या परीनं ह्या संकटाचे पारिपत्य करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्याला ओळखण्याची खूण मी तुम्हाला सांगितली आहेच!

# किनारा

व्हिक्टोरिया महांकाळे
द्वितीय वर्ष, कला

स्कर्टब्लाऊजमधून ती साडीत कशी व कधी आली ते तिचं तिलाच कळलं नव्हतं. तिला आश्चर्यच वाटलं या गोष्टीचं. किती नकळत झालं होतं हे सर्व ? यंत्र चालू होते. यंत्राच्या चक्राबरोबरच तिचे विचारचक्रही चालू झाले. बाबांचे शब्द तिच्या कानांत घुमत होते " मुलगा हुशार आहे. स्मार्ट आहे. पदवीधर आहे. प्रतिष्ठित घराण्यातला आहे. आपल्या गजरासाठी हे स्थळ एकदम योग्य आहे." विचार करकरून तिचा गोंधळच उडत होता. काय उत्तर द्यावं बरं माईबाबांना ? तितक्यात माईच्या प्रेमळ हाकेने ती भानावर आली. " गजरा उठ...जेऊन घे " हातातला कपडा मशीनवर तसाच ठेवून ती उठली माईनी ठेवलेल्या पाटावर बसली. पण...घशाखाली घासच उतरेना. कसेबसे दोन घास गिळून ती उठली. माईना वाटलं खुषीत असेल म्हणून जेवायचं भानच उरलं नसेल गजराला !

गजरा उठली. तिचे डोळे पाणावले होते. तिला वाटलं सांगावं का माईला कशाला इतकं प्रेम करतेस माझ्यावर? आज पाठीवरून प्रेमाने फिरणारे तुझेच हात मला उद्या दुसऱ्याच्या स्वाधीन करतील. सर्व प्रेम झिडकारून मी लोकांच्या घरी जाऊ ? आणि तेही त्यांचं माणूस म्हणून? नकळत तिचे पाय अंगणात एका ठिकाणी थबकले. मोगरा बहरून आला होता. कळी खुलली होती. काही कळ्या उमलू पहात होत्या. काही अर्धोन्मीलित झालेल्या होत्या. तिने मोगऱ्याला गोंजारलं. कळ्या हुंगल्या. पण दुसऱ्याच क्षणी तिला वाटलं या कळ्यांना ओरडून सांगावं का कशाला उमलता ? परत कोमेजूनच जावं लागेल ना ? तिच्या पाणावलेल्या डोळ्यांतून टपटप आसवं ओघळली—त्या मोगऱ्यावर ! त्या आसवांनी मोगरा अधिकच बहरल्यासारखा वाटला तिला. बागेत गेल्यावर लगेच प्रसन्न होणारी ती. पण तिला आज चैनच पडेना. कशात का होईना मन गुंतवावं म्हणून ती स्वेटर विणायला बसली. तरीही ती अस्वस्थच होती.

घड्याळात दीडचा टोला पडला. तिचा धाकटा भाऊ प्रवीण येण्याची वेळ झाली होती. तितक्यात तो आलाच. एरव्ही येताजाता तिला सतावणारा, चिडविणारा प्रवीण आता शांत वाटत होता. हल्ली त्या दोघांचं भांडणही होत नव्हतं. त्याच्याकडे पहाताच तिला भडभडून आलं. ती उठली. अश्रू दाबून धरीत तिने पाट मांडला. त्याला जेवायला वाढलं. प्रयत्न करूनही अश्रू आवरेनात म्हणून ती लगबगीने तेथून बाजूला गेली. तोही जेवला मुकाट्याने. माई, बाबा, प्रवीण यांना सोडून जावं लागणार या कल्पनेने ती व्यथित झाली होती. मायेचे रेशमी पाश तोडवत नव्हते म्हणूनच तिच्या मनात द्वंद्व चालू होते. होकार सांगावा की नकार द्यावा ? भले मोठे प्रश्नचिन्ह आज तिच्यापुढे होते.

माई खुषीत होत्या. मुलगी सुस्थळी पडेल या विचारांचे समाधान त्यांच्या सुरकुतलेल्या चेहऱ्यावरून ओसंडत होते. पण एक विवंचना त्यांना लागून राहिली होती. आपल्या प्रवीणला अशीच गुणी मुलगी मिळेल का ? चांगल्या संस्कारांची, खानदानी, सगळ्यांना प्रेमाने आपलेसं करणारी ?

या कल्पनेनं त्यांचं त्यांनाच हसू आलं. दार वाजलं म्हणून त्यांनी वर पाहिलं. आबासाहेब आले होते. ते येताच " बाबा ... बाबा... " म्हणणारी, धावून हातातलं सामान घेणारी गजरा आज त्यांना सामोरी आलीच नव्हती. नकळत त्यांच्या अंतर्यामी कळ उठली. त्यांना वाटलं घरकाम करीत असेल म्हणून आली नसेल. पण आज मोत्या कुत्रा व मनीमाऊ पण दिसले नाहीत म्हणून त्यांना जरा आश्चर्यच वाटले. अंगणात येऊन त्यांनी बाहेर नजर फेकली. उंच माडाच्या खाली बसलेली गजर

त्यांना दिसली. तिला चिकटून बसलेले मोत्या व मनी पण दिसले. मोत्या व मनी जणू काय तिच्या एकांतात तिला सोबत करीत होते. आबासाहेबांच्या मनात विचार आला कालपर्यंत "बाबा" "बाबा', म्हणत त्यांच्याभोवती रुंजी घालणारी गजरा आज कुठच्या कुठे लोप पावली होती व एक गंभीर गजरा आज त्यांच्यासमोर होती. फ्रॉक घालून अंगणभर दुडदुडणारी गजरा आज नाहीशी झाली होती व अंगभरून साडी घालणारी गजरा आज त्यांना दिसत होती. चिमुकल्या हातांनी मन लावून फुलं माळणारी गजरा आज दूर दूर गेली होती व शहाण्या मुलीसारखा पदर सावरणारी गजरा जवळ आली होती. ते स्वतःशीच हसले. निसर्गाच्या लीलांचे कौतुक वाटले त्यांना. ते परत घरात जाऊन आरामखुर्चीत बसले.

गजराला वाटलं, मळ्याला एक चक्कर घालावी मग विचार तरी पांगतील. ती उठली. मनी व मोत्या सोबतीला होतेच. एरव्ही कुत्र्या-मांजराला हात न लावणारी ती–तिने आज दोघांनाही गोंजारलं. माडाजवळ येताच तिला आठवलं. लहानपणी प्रवीणबरोबर शहाळ्यातलं पाणी पिताना किती मजा वाटायची. ती चालतच राहिली. तिला काळ्याशार थंड पाण्याची तिची आवडती विहीर दिसली. तिला आठवलं किती वेळा आपण याच विहिरीत आंघोळ केली. आजही तिला खूप मोह झाला येथे मनसोक्त डुंबण्याचा. पण महत्प्रयासाने तिने तो मोह आवरला. आंब्यांचा घनदाट वृक्ष पाहून तिला लपाछपीचा लपंडाव आठवला. प्रवीणबरोबर ती येथेच खेळायची. खेळून दोघंही खूप थकायची, विहिरीत मनसोक्त डुंबून घ्यायची नंतर पपया, चिंचा, आवळे, कैऱ्या खाऊन, शहाळ्यातलं पाणी पिऊन संतुष्ट मनाने घरी जायची. परत एकदा तिचे डोळे डबडबले. बहरून आलेला शेवगा पाहून तिला वाटेल त्यालाच दीर्घ आलिंगन द्यावे.

सायंकाळ झाली होती. ती हळू हळू घराकडे निघाली. तोच समोरून हातात कंदील घेऊन बाबा तिलाच सामोरे येत होते. "गजरा, चल बाळ, अंधार झालाय." प्रेमाने ओथंबलेले ते शब्द ऐकून तिच्या काळजात कालवाकालव झाली.

रात्री जेवताना माई-बाबा खुषीत होते. प्रवीण शांत होता. गजरा गंभीर होती. जेवण आटोपल्यावर ती बिछान्यावर पडली. माईच्या कुशीत शिरून झोपावं असं तिला वाटलं पण ती जागची हलली नाही. समोरच्या कोपऱ्यात तिची लहानपणींची भांडी तिला दिसली. ती उठून तिच्या भांड्यांजवळ गेली. लहानपणी हौसेने चूल-बोळक्यांचा संसार मांडणारी ती आज खऱ्या संसाराला का भीत होती ? खेळात नेहमीच राजाची राणी होणारी ती आज राणी व्हायला का घाबरत होती ? तिचं तिलाच नवल वाटलं. चालत चालत की सताड उघड्या खिडकीपर्यंत आली. कॉटवर प्रवीण शांतपणे झोपला होता. तिला वाटलं आपण झोपल्याबरोबर अंगावर मांजर आणून टाकणारा, उगीचच भेडसावणारा प्रवीण हाच का ? बाहेर स्वच्छ चांदणं पडलं होतं पण तिला ते आज बोचत होतं. हे सारं वैभव, प्रेम, स्नेह, माया सोडून तिला दुसऱ्यांच्या घरी जावं लागणार या कल्पनेने ती हिरमुसत होती. तिला वाटलं सांगावं का बाबांना. मी ग्रॅज्युएट आहे, मी स्वतः पैसा मिळविते. मला काय गरज आहे लग्नाची ? मी अशीच राहीन तुमच्याजवळ, विचार करता करताच ती झोपली.

दुसऱ्या दिवशी सकाळीच प्राजक्ताचा सडा तसाच पडलेला दिसला. अंगण सारवलेलं नव्हतं. रांगोळी काढलेली नव्हती. प्रवीणला नवल वाटलं. रोज अंगण सारवून रांगोळी काढलेली असते. आज गजराने का बरं अंगण सारवलं नसेल ? आज का रांगोळी काढली नसेल ? आज प्राजक्ताचा सडा तसाच पडलाय. आज गजराने का बरं फुलं गोळा केली नसतील ? फुलं माळतांना गजर दिसली नाही म्हणून त्याला चुकचुकल्यासारखं वाटलं. आजचा संपूर्ण दिवस मरगळल्यासारखाच गेला.

गजरा चालता चालता नकळत नदीकाठी पोचली. लहानपणी आईवर रुसली म्हणजे ती इथं येऊन बसत असे. आज परत तिला बालपण आठवलं. बालपणातून तारुण्यावस्थेला आपण इतक्या लवकर पोचलो यावर तिचा विश्वासच बसत नव्हता. एकांत जागा शोधून ती बसली आणि तिने मनसोक्त अश्रूंना वाट मोकळी करून दिली. तिच्या आसवांची नदी समोरच्या नदीत मिसळत होती. तिला वाटलं प्रत्येकीचं आयुष्य असंच असतं का ? लग्न हे आहे तरी काय की जे प्रत्येकाला करावंच लागतं ! तेही सक्तीने. समाजात आपल्याला असंच का बरं राहता येत नाही ?

विचारांच्या भोवऱ्यात सापडली असताना सूर्य कधी बुडाला याचं तिला भानच राहिलं नाही. हळूहळू अंधार पडू लागला. दिशा झाकाळून गेल्या. नदीचं पाणी संथ वाहात होतं. त्याचा किंचितसा आवाज होता. आजूबाजूला चिटपाखरूसुद्धा नव्हते. अंधार गडद होऊ लागला. ती

दचकली...लगबगीने उठली व घराच्या दिशेने तिची पावलं झपाझप पडू लागली. रात्रीबेरात्री बागेत फिरणारी ती कधी नव्हे ते अंधाराला घाबरली होती—चांगलीच घाबरली होती. घरापर्यंत जाण्यासाठी आता तिला सोबत हवी होती. कुणाचा तरी आधार हवा होता. आणि... आणि...त्याच क्षणी तिने निर्णय घेतला की आजच जेवताना बाबांना सांगून टाकायचे मुलगा हुशार आहे, स्मार्ट आहे, प्रतिष्ठित घराण्यातला आहे. पदवीधर आहे तर तुमच्या म्हणण्याप्रमाणे मी लग्नाला तयार आहे. आजच मुलाच्या घरी होकार सांगून या! कारण...आता-पर्यंत नदीप्रमाणे सुरळीत चाललेल्या तिच्या जीवनाला आज किनारा हवा होता...!

*

---

## नाटक आणि आपण

काम नाही मिळत करायला
नाटकात, म्हणून कधी हिरमुसतो
पण रोजच रहाटगाडगं
नाटकापासून नाही वेगळं.
    नसणं ते असणं
    केलं जातं साकार
    कृत्रिम भडक रंगांनी
    रंग भरले जातात.
जीवनाचा खेळ
सहजपणे खेळला जातो
मुक्त हस्ताने उधळले जातात
स्वर्गीय सुंदर रंग.
    नाटकातल्या रंगरंगोटीची
    नाही येथे जरुरी
    त्यातील सुखदु:खाच्या अलिप्तपणाची
    नाही येथे भीती
तीन तासांचे तर नाटक
पण जिवंत ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न
सोन्यासारख्या जीवनाचे
नाटक झाले नाही म्हणजे मिळवलं !...

**सुषमा वि. नाटेकर** द्वितीय वर्ष, वाणिज्य

## आता काय करावे समजत नाही

आता काय करावे समजत नाही
प्रेम म्हणे जा प्रियेपाशी
बुद्धी म्हणते लागेल फाशी
प्रेम म्हणते का जगास भ्यावे
बुद्धी म्हणते जपुन चालावे
प्रेम म्हणते सुख आहे प्रीतीत
बुद्धी म्हणते जाशील मातीत
प्रेम बुद्धी विना आयुष्य नाही
हे जर नाही तर मनुष्य नाही
म्हणून काय करावे समजत नाही—
धन मिळवावे तर स्वार्थी म्हणतात
धन त्यागावे तर मूर्ख म्हणतात
ज्ञानी रहावे तर बुद्धीचा किडा
अज्ञानी व्हावे तर म्हणती वेडा
मी हा एक असाच प्राणी
चालतो मना साक्षी ठेऊनी
जग हे बोलतच राही
काय करावे समजत नाही....

**नेमिचंद कसवा** प्रथम वर्ष, शास्त्र

# भारत-अमेरिका संबंध

**भगत अनिल दत्तात्रय**
तृतीय वर्ष, कला

भारत व अमेरिका यांच्या संबंधाचा वस्तुनिष्ठ आढावा घेता असे दिसते की भारत व अमेरिका या दोन देशांमध्ये निखळ मैत्रीचे संबंध तसे कधीच अस्तित्वात नव्हते. भारताच्या विकासात अमेरिकेने वेळोवेळी मदत केलीही असेल तथापि दोन देशांमध्ये परस्पर समजुतीचे वातावरण हे निर्माण होऊ शकले नाही. त्यामुळे भारत व अमेरिका संबंधाचा इतिहास हा एक चढउतारांचा (ups and downs) इतिहास आहे. भौगोलिक दृष्ट्या बघता अमेरिका व भारत हे एकमेकापासून लांब आहेत. तरीही दोन्ही देश एकमेकाविषयी उदासीन राहू शकत नाहीत. याचे कारण एक जागतिक महासत्ता म्हणून अमेरिकेचा प्रत्येक देशाशी संबंध येणे अटळ आहे. तसेच आशियातील आणि प्रामुख्याने हिंदी महासागरातील भारताचे स्थान, आशिया खंडातील भारताचे महत्त्व अमेरिकेला नाकारता येत नाही. त्यामुळे आशिया खंडामध्ये आपला प्रभाव टाकण्यासाठी अमेरिका व भारत यांच्यामध्ये पहिल्या पासूनच एक अप्रत्यक्ष स्पर्धा चालू आहे. भारत व अमेरिका यांच्या संबंधावर अलीकडच्या काळात या स्पर्धेचा परिणाम खूप झाला आहे. आणि पुढच्या काळातही हा घटक महत्त्वपूर्ण ठरणार आहे. तत्पूर्वी भारत व अमेरिका यांच्या संबंधाचा एक आढावा घेणे आवश्यक आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात भारत व अमेरिका यांचे प्रत्यक्ष संबंध नव्हते. इंग्रजांचे राज्य असल्यामुळे या दोन देशांमध्ये प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित होऊ शकले नाहीत. तथापि दोन्ही देशांमध्ये एकमेकांविषयी सदिच्छा होती. त्यांचे प्रमुख कारण म्हणजे अमेरिकन विचारवंत इमर्सन, थोरो, वॉशिंग्टन इत्यादींनी तत्कालीन भारतीय नेतृत्वावर वैचारिक प्रभाव टाकला होता. त्यामुळे भारताला अमेरिकेबद्दल आदराची भावना होती. त्याचप्रमाणे अमेरिकन जनतेला सुद्धा विवेकानंद व महात्मा गांधी यांच्या विचारांचा खूपच आदर होता. त्यामुळे दोन देशांमध्ये सदिच्छा (good will) निश्चित होते. तथापि स्वातंत्र्यपूर्व काळात अमेरिकेने भारतास अगदी भरघोस मदत केली नव्हती. १९४५–४६ च्या दुष्काळात भारताला धान्य पाठविण्याबाबत अमेरिकेने बरेच आडमुठे धोरण स्वीकारले होते. व त्यावेळेस अमेरिकेची उदासीनता ही खूपच जाणवली.

**स्वातंत्र्यानंतरचा काळ :** अशा पार्श्वभूमीवर १९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पंडितजींनी भारताचे स्वतंत्र अलिप्ततावादी धोरण जाहीर केले. अलिप्तता या शब्दाचा अर्थ जागतिक सत्ता संघर्षापासून अलिप्तता इतकाच आहे. जागतिक सत्ता संघर्षात भारत कुणाचीही बाजू घेणार नाही. प्रत्येक गोष्ट त्या गोष्टीच्या गुण-दोषांवर भारत तपासून घेईल व आपले धोरण ठरवील. पंडितजींचा अलिप्ततावाद हा अमेरिकन लोकांना कुंपणावर बसून राहण्याचे धोरण वाटले. त्यामुळे प्रथमपासूनच भारताच्या विदेश नीतीबद्दल अमेरिकेच्या मनात गैरसमज होते. या पार्श्वभूमीवर दोन देशांतील संबंधाचा विकास हा चालू झाला. याविकासाचे प्रामुख्याने ४ टप्पे पडतात. पहिला टप्पा १९४७ ते १९५३ पर्यंत, दुसरा टप्पा १९५३ ते १९६० पर्यंत, तिसरा टप्पा १९६० ते १९७० व चवथा टप्पा हा १९७१ ते १९७७ पर्यंत. या टप्प्यातील संबंध पुढीलप्रमाणे.

**पहिला टप्पा १९४७ ते १९५३ :** या काळामध्ये भारताच्या अलिप्ततावादाबद्दल राजनीतीज्ञांमध्ये अनेक गैरसमज होते. १९४९ साली पंडितजींनी अमेरिकेला भेट दिली. त्यावेळेस अमेरिकन कॉंग्रेसपुढे पंडितजींनी पुन्हा आपली भूमिका स्पष्ट केली. तथापि शीतयुद्धामध्ये गुरफटलेल्या अमेरिकेची भारतीय भूमिका समजून घेण्याची मनःस्थिती नव्हती. भारतदेश हा निश्चित साम्यवादी गटा-

तला आहे अशी अमेरिकेची भावना झाली. त्याला कारणेही तशीच होती. १९४९ मध्ये चीनमध्ये साम्यवादी क्रांती झाली. व साम्यवादी चीनला भारताने प्रथमपासूनच पाठिंबा दिला. एवढेच नव्हे तर साम्यवादी चीनला यूनो-मध्ये सदस्यत्व मिळावे यासाठीही भारताने प्रयत्न केले. रशियाबद्दलची भारताची भावना ही सहानुभूतीचीच होती व त्यामुळे अमेरिकेचा असा समज झाला की साम्यवादी गटाबद्दल भारताला विशेष आस्था आहे व त्यामुळे १९४७ ते १९५३ या काळात अमेरिकेबद्दल सतत संशय होता. याच काळात कोरियन युद्धामध्ये भारताची भूमिका ही सुद्धा अमेरिकेच्या संशयास खतपाणी घालणारी होती. म्हणून या दोन देशांमध्ये सुरूवातीपासूनच संशयाचे वातावरण निर्माण झाले.

**दुसरा टप्पा १९५३ ते १९६० :** या काळात अमेरिका व भारत यांच्यातील मतभेद आणि वैमनस्य तीव्र होत चालले. अमेरिकेचे साम्यवादास विरोध करण्याचे धोरण भारताला पसंत नव्हते. साम्यवादास विरोध करण्यासाठी मध्य व आग्नेय आशियामध्ये अमेरिकेने सेंटो, सिॲटो यासारख्या ज्या संघटना उभारल्या होत्या त्याचा भारताने निषेध केला. याच काळात पाकिस्तान हा सेंटोचा सदस्य झाला. अमेरिकेच्या गटात जाऊन बसला. अमेरिकेने पाकिस्तानला याच काळात लष्करी मदत देण्यास सुरुवात केली. व अनेक वेळा या मदतीचा पाकिस्तानने भारता-विरुद्ध उपयोग करून सुद्धा अमेरिकेने त्याविषयी ब्र काढला नाही. अमेरिकेचे हे धोरण भारताच्या दृष्टीने खेदजनक होते. १९५८ मध्ये लेबॅननमध्ये ज्यावेळेस अमेरिकेने सैन्य पाठविले त्यावेळेस भारताने त्याचा जाहीर निषेध केला. त्याचबरोबर १९५८ मध्ये हंगेरीमध्ये रशियन लोकांनी जी दडपशाही चालविली त्याविषयी भारताने मौन पाळले. भारताची ही भूमिका पक्षपाती होती. व त्यामुळे भारत व अमेरिका यांच्यातील वैमनस्य वाढत चालले. १९६१ साली भारताने जेव्हा लष्करी कारवाई करून गोवा ताब्यात घेतला त्यावेळेस भारताचा अमेरिकेने निषेध केला. थोडक्यात म्हणजे या काळात अमेरिका व भारत यांच्यातील वैमनस्य वाढत चालले.

**तिसरा टप्पा १९६० ते १९७०**—तथापि १९५९–६० पासून भारत व अमेरिका यांचे वैमनस्य निवळण्यास सुरुवात झाली. १९५९ साली अमेरिकेचे अध्यक्ष 'आयसेनहॉवर' हे प्रथमच भारतात आले. त्या वेळेस भारतास आर्थिक, सांस्कृतिक सहकार्य करण्याचे अमेरिकेने मान्य केले. जवळजवळ ४ अब्ज डॉलर्सचे कर्ज अमेरिकेने भारतास दिले. भारताने सुद्धा अमेरिकेवर टीका करताना काहींशी सावधानता पाळण्यास सुरुवात केली. १९६२ मध्ये चीनने भारतावर आक्रमण केले. या सुमारास अमेरिकेने भारतास चीन विरुद्ध खूपच मदत केली. साहजिकच या काळात दोन देशांचे संबंध जवळजवळ घनिष्ठ झाले. तथापि ही घनिष्ठता फार काळ टिकू शकली नाही. १९६४ मध्ये पंडितजींचा अंत झाला. त्यामुळे पुन्हा एक पोकळी निर्माण झाली. १९६५ मध्ये पाकिस्तानने भारतावर हल्ला केला त्यावेळेस अमेरिकेने पाकला लष्करी मदत केली. ही मदत पाकिस्तान भारताच्या विरुद्ध वापरणार नाही अशी अमेरिकेने ग्वाही दिली होती तथापि प्रत्यक्षात तिचा वापर भारताच्या विरूद्ध झाला. त्यामुळे दोन देशात पुन्हा वैमनस्य येण्यास सुरुवात झाली. याच-वेळेस अमेरिकेचे अध्यक्ष जॉन्सन यांनी भारताचे पंत-प्रधान लाल बहादूर शास्त्री यांची भेट पुढे ढकलली. अमेरिकेच्या या काळातील व्हिएतनाममधील वाढत्या हस्तक्षेपाबद्दल शास्त्रीजींनी अमेरिकेचा निषेध केला. या सर्व कारणांमुळे पुन्हा दोन देशांमधील संबंध बिनसले.

**चवथा टप्पा १९७१ ते १९७७**—शास्त्रीजींच्या मृत्यू-नंतर भारतामध्ये अंतर्गत सत्ता-संघर्ष उद्‌भवला. त्यामुळे १९६७ ते १९७० या काळात भारताला बाहेरच्या राज-कारणात लक्ष देता आले नाही. त्यामुळे असे म्हटले जाते की या तीन वर्षात भारताला परराष्ट्र धोरणच नव्हते. १९७० नंतर आशियामध्ये सत्ता समतोल बदलण्यास सुरुवात झाली. १९७१ मध्ये बांगला देशाचा उदय झाला याच काळात भारताने आपले लष्करी सामर्थ्य जगास दाखविले होते. आशिया खंडातील भारताशी स्पर्धा करणारी दुसरी महत्त्वाची सत्ता म्हणजे चीन. तथापि चीन-मध्ये अंतर्गत सत्ता-संघर्षास या काळात सुरवात झाली. व त्यामुळे बाहेरच्या गोष्टीत चीनला लक्ष देता आले नाही. या पार्श्वभूमीवर भारताने आशिया खंडामध्ये स्वतःचे वर्चस्व स्थापन केले. ऑगस्ट १९७१ मध्ये भारत व रशिया या दोन देशांचा मैत्री, शांतता व सहकार्य यांसाठी २० वर्षांचा करार झाला. भारत अमेरिकेच्या संबंधावर त्याचा खूपच परिणाम झाला. भारत हा अलिप्तता-वादी नसून पूर्णपणे रशियाचा अंकित आहे अशी अमेरिकेची समजूत झाली. त्यामुळे भारताबाबतचे धोरण अमेरिकेने ताठर बनविले. याच सुमारास चीनशी संबंध प्रस्थापित करण्यास अमेरिकेस यश आले. त्यामुळे

आशियाखंडामध्ये आपला प्रभाव टाकण्यास अमेरिकेला एक नवीन दुवा निर्माण झाला. या पार्श्वभूमीवर अमेरिकेने भारताकडे दुर्लक्ष केले. त्यानंतर या काळामध्ये हिंदी महासागरामध्ये अमेरिकेने ' दिएगो गार्शिया ' येथे लष्करी तळ उभारला. भारताने याचा उघडपणे निषेध केला. या तळामुळे हिंदी महासागरातील शांततेस धोका निर्माण झाला. भारत व अमेरिकेचे संबंध बिनसण्यास हे कारण होते. १९७५ साली भारतात अंतर्गत आणीबाणी आली. अमेरिकेने त्याचा निषेध केला. त्याच वेळेस अमेरिका भारताच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करीत आहे असा आरोप भारताने अमेरिकेवर केला. यामुळे दोन देशांचे संबंध पूर्णपणे बिनसले.

**१९७७ नंतर**–तथापि १९७७ मध्ये भारत व अमेरिका या दोन्ही देशांत सत्तांतर झाले. भारतामध्ये उदारमतवादी लोकशाही पुरस्कर्ता जनता पक्ष सत्तेवर आला व अमेरिकेत मानवतावादी म्हणून प्रसिद्ध असलेले जिमी कार्टर हे सत्तेवर आले. या निमित्ताने दोन्ही देशांनी सत्तांतरांचे स्वागत केले. निक्सन यांच्या धोरणापेक्षा कार्टर यांचे धोरण अधिक मानवतावादी असल्याने भारताबाबतचा अमेरिकेचा दृष्टिकोण नक्कीच बदलणार अशी आशा निर्माण झाली. पंतप्रधान देसाईंनी सुद्धा आम्ही खरीखुरी अलिप्तता पाळू असे आश्वासन दिले. या पार्श्वभूमीवर १ जानेवारी १९७८ रोजी जिमी कार्टर यांचे भारतात आगमन झाले. या वेळेस दोन्ही देशांनी जे संयुक्त पत्रक काढले त्यामध्ये एकमेकांबद्दलचा आदरभाव व्यक्त केलेला आहे. अमेरिकेच्या उपग्रहांनी नैसर्गिक साधनसंपत्ती व हवामान या विषयाची महत्त्वाची माहिती जमा केली आहे ती भारताला उपलब्ध करून देण्याची तयारी कार्टर यांनी दाखविली तसेच सूर्यशक्तीची निर्मिती व त्याचे तंत्रविज्ञान, कृषि संशोधन, अन्नधान्य निर्मिती इत्यादी बाबतीत अमेरिकेने सर्वतोपरी सहकार्य करण्याचे मान्य केले आहे.

सध्या अमेरिका व भारत यांच्यात वादाचा मुद्दा म्हणजे तारापूर येथील अणुकेंद्रास अमेरिकेने मदत करावयाची की नाही हा होय. अमेरिकेचे म्हणणे असे की भारताने 'nuclear non-proliferation treaty वर सही करावी तरच अमेरिका भारतास मदत करेल. तथापि भारताचे म्हणणे असे की ज्या देशांच्या सर्रास अणुचाचण्या चालू आहेत व ज्यांच्या जवळ अण्वस्त्रे आहेत अशा चीन किंवा फ्रान्ससारख्या देशांना अमेरिका काहीच सांगत नाही व सक्ती भारतातच का ? सगळेजण अण्वस्त्रांचा साठा नष्ट करीत असतील तर भारत सुद्धा तसे करेल. पण त्या शिवाय भारताला तसे करावयास सांगणे हे अन्यायाचे आहे. कार्टर यांच्या भेटीतून वादाचा हा मूलभूत मुद्दा सुटू शकला नाही. दोघांच्याही भूमिका या बाबतीत ताठर आहेत. त्यामुळे जिमी कार्टर यांची भेट फार मोठी ऐतिहासिक होती असे म्हणता येणार नाही. एक मात्र नक्की की वातावरण निवळण्यास सुरवात झाली आहे. दोन देशांमध्ये सतत राजकीय संवाद होत राहिले तर दोघांनाही एकमेकांची बाजू समजून घेता येईल. त्यातून गैरसमज दूर होतील. अर्थात या संवादाची गती अधिकाधिक वाढविली पाहिजे. तरच या वातावरणाचा योग्य तो लाभ घेता येईल. वस्तुतः अमेरिका व भारत हे दोनही लोकशाही देश आहेत. जागतिक शांतता व मानवतावाद याबद्दल दोहोंनाही आस्था आहे. तथापि या दोन देशांतील गैरसमज दूर होणे आवश्यक आहे. तसे ते झाल्यास जागतिक राजकारणास एक वेगळे वळण लागण्याची शक्यता आहे.


## तुमचे भांडार एक सहकारी संघटना

तुम्हाला लागणाऱ्या वस्तू महाविद्यालयाच्या तुमच्या भांडारातूनच घ्या. महाविद्यालयाचा प्र[illegible] विद्यार्थी या भांडाराचा भागधारक आहे.

विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थी भांडारात सर्व प्रकारची स्टेशनरी, शास्त्र शाखेच्या विद्यार्थ्यांना लागणारी जर्नल्स, डिसेक्शन बॉक्सेस, वेट बॉक्सेस व कला आणि वाणिज्यच्या विद्यार्थ्यांना लागणारे मॅप-सेट्स अकौंटन्सी वह्या, भूगोलाची जर्नल्स, ट्युटोरिअल शीटस् व शारीरिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी लागणारे बनियन्स, पी. टी. शूज, सॉक्स, हाफ पँट्स वगैरे वस्तू योग्य किंमतीत मिळतील.

**प्राचार्य, मॉडर्न महाविद्यालय**

# युवक नेतृत्व शिबिर—एक अनुभव

ज. ना. जोगळेकर
द्वितीय वर्ष, वाणिज्य

दिनांक ६ जून १९७७ ला आम्ही सर्व शिबिरार्थी मनाशी काही अपेक्षा, उदात्त हेतू बाळगून आलो होतो. ते स्थळ म्हणजे विद्यार्थी सहाय्यक समितीचे लाला लजपतराय भवन होय. पुणे विद्यापीठाच्या कक्षेतील अनेक शहरे, जिल्हे, तालुक्यातील विद्यार्थ्यांचे शिबिर भरणार होते. अनेक विद्यार्थी होते. मानवी स्वभावातील सर्व कंगोरे एकत्र आले होते. प्रत्येकाचे काही तरी वैशिष्ट्य होते. मी नव्यानेच या प्रकारच्या विद्यापीठीय शिबिरासाठी उपस्थित होतो. त्यामुळे मी भांबावूनच गेलो होतो. पण सहा दिवसांच्या या सहजीवनामुळे आम्ही सर्व विद्यार्थी एकमेकांच्या जवळ मनाने एकत्रित गुंफलो गेलो. सर्वजण एक मेकांचे विचार ऐकून घेऊ लागलो. तसेच दोषही दाखवू लागलो. विद्यार्थ्यांशी गप्पा मारताना त्यांच्या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम समजावून घेतले. ह्यातूनच एकमेकांचे मार्गदर्शन घडले. माझ्या मनातील पहिली अपेक्षा येथेच सफल झाली. शिबिरास एकूण २२ विद्यार्थी व ३ विद्यार्थिनी आल्या होत्या.

दुसऱ्या दिवशी दि. ७ जूनला सकाळी ५ वाजता उठून दिनचर्येला सुरूवात झाली. नंतर योगासनाचा कार्यक्रम असे. त्यामुळे विद्यार्थ्यांना योगासनांबद्दल आवड निर्माण झाली. व काही सोपी सुटसुटीत आसनेसुद्धा शिकविली गेली. नंतर नास्ता असे. तो झाल्यावर सामुदायिक सफाई-शिबिरार्थी कोणतेही काम हलके, वाईट, कमी प्रतीचे समजत नसत. रोज सकाळी ९ ते १२ मोठ्यामोठ्या व्याख्यात्यांची भाषणे होत. उद्घाटनाचे भाषण कुलगुरू देवदत्त दाभोळकरांनी फारच सुंदर केले. त्यांनी युवक व नेतृत्व यांची गरज सांगितली. तसेच विद्यार्थ्यांशी चर्चा केली. त्यानंतर मा. श्री. प्र. दि. देशपांडे यांचे अनौपचारिक शिक्षणपद्धती या विषयावर चर्चात्मक भाषण झाले. अनौपचारिक शिक्षणपद्धती जीवनात किती महत्त्वपूर्ण आहे. ते त्यांनी सोप्या शब्दांत समजावून सांगितले. नंतर दुपारी श्री. अप्पासाहेब पेंडसे यांचे भाषण झाले. त्यात त्यांनी विद्यार्थ्यांना काय काय करता येणे शक्य आहे व त्यासाठी काय करावे हे सांगितले.

दि. ८ जून ७७ रोजी सकाळचे दोन्ही वक्ते माझ्या विशेष औत्सुक्याचे होते. ते म्हणजे श्री. बाबा आढाव व श्री. बिंदुमाधव जोशी—त्यांनी उपदेशाचे डोस न पाजता विद्यार्थ्यांशी मनमोकळेपणाने चर्चात्मक गप्पा मारल्या. दुपारचा कार्यक्रमही रंगला. त्याचे वक्ते होते श्री. देवदत्त दाभोळकर व श्री. अच्युतराव आपटे ह्यांनी सुशिक्षित युवकांवरील विशेष जबाबदारी ह्या विषयावर चर्चा केली. मला सर्व अहवाल लिखाण करावयाचे काम होते त्यामुळे देवदत्त दाभोळकरांशी खूप गप्पा मारल्या. ही आतापर्यंत तीन दिवसांतील भाषणे एकून व त्यात सहभाग घेतल्याने मला त्यांचे महत्त्व पटले.

दि. ९ जून रोजी सकाळी प्रा. व. दि. देशपांडे ह्यांचे ग्रामायनचे कार्य ह्या विषयावर भाषण झाले व दुपारी मा. यदुनाथ थत्ते व राम ताकवले यांचे चर्चात्मक भाषण झाले. नंतर त्याच दिवशी रात्री डॉ. अरुण लिमये व डॉ. बाबा आढाव ह्यांच्याशी विद्यार्थ्यांनी मनमोकळेपणे चर्चा केली. नंतर चौथ्या दिवशी डॉ. गोपाळराव मोडक ह्यांनी भाषण न करता थोड्या वेळात जास्त अनुभव सांगून विद्यार्थ्यांचे लक्ष ग्रामीण प्रश्नावर केंद्रित केले. दुपारी मा. प्रमोद जेजुरीकर ह्यांची ग्रामीण भागातील शाळांची स्थिती व उपाय ह्यावर मनमोकळेपणे चर्चा झाली.

शिबिराच्या पाचव्या दिवशी सकाळी श्री. माधवराव देशपांडे ह्यांनी महाराष्ट्र आरोग्य मंडळाची माहिती व कार्य सांगितले. दुपारी ग. प्र. प्रधान व शि. श्री. काळे ह्यांनी बदलत्या समाजातील युवकांचे स्थान ह्या विषयावर त्यांची मते मांडली. गेल्या ५ च दिवसांत पुण्यातील माहिती

नसलेल्या अनेक संस्थांची माहिती मिळाली.

सहाव्या दिवशी सकाळी गोबर गॅस ह्या विषयावर श्री. राम डिंबळे ह्यांनी मार्गदर्शनपर स्पष्ट भाषण केले. व नंतर डॉ. सी.आर.जगताप ह्यांनी ग्रामीण विकासाच्या संदर्भाच्या माहिती प्रसारासाठी लागणाऱ्या साहित्याची निर्मिती कशी करावी ह्याबद्दल माहिती दिली व मार्गदर्शन केले. आणखी एक मनातील हेतू साध्य झाला. तो म्हणजे भाषणे ऐकण्याचा व प्रत्येक शिबिरार्थीस बोलण्यास खूपच संधी मिळाली. व नंतर मी देवदत्त दाभोळकर ह्यांचे समारोपाचे भाषण झाले.

वर्षभरात ह्या शिबिरामुळे प्रेरित होऊन काम करू अशी घेतलेली प्रतिज्ञा सफल केली. असे अनेक हेतू साध्य होतानाच मला काही उणिवा भासल्या ह्या उणिवा हेतू जेवढे साध्य झाले त्यातून वजा टाकल्यास जे हेतू साध्य झाले त्यांचे प्रमाण किंवा त्याचे मोल जास्तच होईल. विद्यापीठाने ह्या शिबिरास प्रत्येक महाविद्यालयातील तीन तरी विद्यार्थी निवडणे आवश्यक होते व त्यामुळे हे ज्ञान संकुचित न राहता अनेकांना मिळाले असते. हे शिबिर खेडेगावात घेतले असते तर गावातील लोकांना पण ह्याच लाभ झाला असता. शिबिराचे स्थान शहरापासून लांब असल्याने शिबिरार्थींना पुण्यातील सामाजिक संस्थांचे दर्शन झाले नाही. अशा थोड्या फार उणीवा वजा करता शिबिर शिबिरार्थींना फायदेशीरच ठरले.

*

---

## वाट बघतोय

वाट बघतोय त्या दिवसाची
जेव्हा भ्रष्टाचाराने भरलेल्या या जगात
अश्रू आणि मोती एकाच तराजूने मोजणाऱ्या
काळ्या बाजारातील काळ्या सैतानांपैकी
कुणी तरी म्हणेल
सहदेवा थोडा अग्नी आण
जाळून टाकू दे, द्यूत खेळणाऱ्या धर्माचे हात
वाट बघतोय त्या दिवसाची
जेव्हा स्वार्थासाठी अंध झालेल्या या जगात
कनक आणि कामिनीसाठी एकमेकांच्या
रक्ताचे घोट घेणाऱ्या नरपशूंसाठी
कोणी तरी म्हणेल
देवा मला जे ठार मारीत आहेत,
त्यांना तू क्षमा कर ! !
वाट बघतोय त्या दिवसाची
जेव्हा जातिभेदांनी शतखंडित झालेल्या या जगात
माणुसकीला खोल गाडून त्यावर
दंभाची कबर बांधणाऱ्या पुजाऱ्यांपैकी
कोणी तरी उचलून घेईल
वाळवंटात रडणारे अनवाणी अस्पृश्य पोर
आणि म्हणेल
" माणूस आहे जात माझी
धर्म माझा माणुसकी "
वाट बघतोय त्या दिवसाची
जेव्हा सिनेमाच्या कॅन्सरने झपाटलेल्या या जगात
तरुणीसमोर माकडांप्रमाणे नाचणाऱ्या हिरोंना
आराध्य दैवत मानलेल्या तरुणांपैकी
कुणी तरी म्हणेल
" आमच्या मा साहेब इतक्या सुंदर असत्या तर "

**प्रभाकर वडणे** प्रथम वर्ष, शास्त्र

# अपेक्षित लोकशाही व भारतीय लोक-शाहीपुढील ‘ समस्या ’

**अतुल रा देशपांडे**
इ. १२ वी, कला

भारतीय जनतेने १९४७ साली स्वातंत्र्य मिळविले. भारतीय स्वातंत्र्यानंतर भारतीय घटनेने १९४९ साली सार्वभौम लोकशाही प्रजासत्ताक गणराज्य निर्माण केले. भारतात घटनात्मक लोकशाही प्रस्थापित झाली. परंतु दुर्दैवाने काँग्रेसच्या राजवटीत व श्रीमती इंदिरा गांधींच्या राजवटीच्या नजीकच्या १९ महिन्यांच्या कालावधीत घटनात्मक लोकशाही हे स्वरूप कायम ठेऊन प्रत्यक्ष व्यवहारात हुकुमशाही निर्माण झाली. तरी देखील भारतीय जनतेने १९७७ च्या निवडणुकीत हुकुमशाहीचा सनदशीर पराभव करून लोकशाहीवरील आपली श्रद्धा अधिकच दृढ केली व ह्या घटनेस ऐतिहासिक घटनेचे महत्त्व प्राप्त झाले.

लोकशाहीच्या लिंकनप्रणीत व्याख्येकडे जर आपण दृष्टिक्षेप टाकला, किंवा डॉ. आंबेडकरांचे लोकशाही-बाबतचे विचार अभ्यासले तर एक गोष्ट आपल्याला त्वरित जाणवते व ती अशी की या दोहोंनी लोकशाही ही एक जीवनपद्धती मानलेली आहे. तिचे वास्तव स्वरूप त्यांनी ‘ सामाजिक लोकशाही ’ म्हणून संबोधिले आहे. लोकशाही ही जीवनपद्धती आहे म्हणजे काय ? या प्रश्नांचे उत्तर आपणांस तिच्या जीवनविषयक मूल्यांत सापडते. ह्या मूल्यांत स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, व न्याय ही चार जीवनविषयक तत्त्वे आढळतात.

या लोकशाहीला समतेचा अभिप्रेत अर्थ सामाजिक, राजकीय, नागरिकी, नैसर्गिक व आर्थिक समता असा आहे. अशा वेळी काहींची अशी शंका असते की आर्थिक दृष्टिकोणातून पूर्णपणे समता प्रस्थापित करणे शक्य आहे का ? गवंडी व एखादा सरकारी वैद्यकीय अधिकारी या दोहोंच्या वेतनात समानता प्रस्थापित करणे म्हणजे आर्थिक समता का ? तर आपणास आर्थिक समतेचा अर्थ करताना असे म्हणावे लागते की कमीत कमी व्यक्तीला आपले जीवन जगण्यास आर्थिक साधन प्राप्त झाले पाहिजे व त्याचप्रमाणे प्रत्येक व्यक्तीला आर्थिक समतेची संधी धर्म, जात, वंश, भाषा इत्यादी गौण घटकांवरून भेदभाव न करता मिळाली पाहिजे. आर्थिक समतेप्रमाणेच तिला सामाजिक समतेचा अधिकार देखील हवा. काळा–गोरा, स्त्री–पुरुष, स्पृश्य–अस्पृश्य असा भेदभाव न करता सामाजिक समता निर्माण केली पाहिजे. ह्याचप्रमाणे नागरिकी व नैसर्गिक समतेची गरज आहे. या सर्वांबरोबरच व्यक्तीला राजकीय समतेची देखील आवश्यकता आहे. व्यक्तीला मतदानाचा, सरकारवर रास्त टीका करण्याचा, निवडणुकीला उभे राहण्याचा इत्यादी विविध प्रकारचे राजकीय अधिकार प्राप्त झाले पाहिजेत.

समतेप्रमाणेच व्यक्तीला स्वातंत्र्याची गरज आहे. स्वातंत्र्य याचा अर्थ ‘ व्यक्ति-विकासाला दिलेली संधी. ’ या ठिकाणी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे व ती म्हणजे ‘ स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे. ’ व्यक्तीस भाषणाचे, संचार करण्याचे, कोणताही धर्म स्वीकारण्याचे, मुद्रणाचे, मालमत्ता ग्रहण करण्याचे, कोणतेही शिक्षण घेण्याचे अशा विविध पद्धतींचे स्वातंत्र्य आवश्यक असते. त्याच-प्रमाणे तिला आर्थिक स्वातंत्र्याची देखील गरज आहे. जीवन जगण्यास तिला आर्थिक साधन प्राप्त होणे अपरि-हार्य ठरते. तेव्हा व्यक्तीच्या जीवनात ‘ स्वातंत्र्याची ’ गळचेपी होऊ देता कामा नये. कारण ‘ व्यक्तिस्वातंत्र्य ’ हा ‘ लोकशाहीचा आत्मा ’ आहे.

स्वातंत्र्य व समतेप्रमाणेच विश्वात व ख़ऱ्या लोक-शाहीत ‘ बंधुतेची ’ गरज आहे. सहयोग्य जीवनाची आवश्यकता आहे. व्यक्तीचे स्वातंत्र्य व समताभाव यांचे रक्षण व्हावयाचे असेल तर व्यक्ती–व्यक्तीत आपुलकी, प्रेम, माया अशा विविध भावनांची गरज आहे. या सर्व गोष्टींचा जर अभाव असेल तर त्यातून संघर्ष उद्भवतो.

व्यक्ती-व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर घाला घालते. विषमता निर्माण होते. परिणामी अराजक माजते. त्यामुळे सामाजिक लोकशाहीच्या रक्षणार्थ 'बंधुतेची', एकमेकांत 'भाई-चारा' निर्माण करण्याची गरज आहे.

लोकशाहीचे शेवटचे व महत्त्वाचे तत्त्व म्हणजे 'समान न्याय.' सर्व व्यक्तींना समान, व निःपक्षपातीपणे न्याय ही आजच्या सामाजिक लोकशाहीची गरज आहे. तो पुढारी आहे, तो सत्ताधीश आहे, किंवा त्याचा धर्म श्रेष्ठ आहे म्हणूनच त्याला न्याय वेगळा व हा नीच, निकृष्ट कुळातील आहे, त्याची जात हीन आहे म्हणून त्यास निराळा न्याय ही भूमिका न्यायालयाची असून चालणार नाही. सर्वांना सारखा योग्य न्याय हीच न्यायालयाची भूमिका असली पाहिजे.

आजच्या अपेक्षित असलेल्या सामाजिक लोकशाहीला समाजवादाची' देखील जोड हवी. भारतीय लोकशाहीने समाजवादी समाजरचना हे धोरण स्वीकारलेले आहे. समाजवादाला अपेक्षित असलेली 'आर्थिक समता' ही लोकशाहीला देखील अपेक्षित आहे. समाजातील मालमत्ता नसलेल्या वर्गाची आर्थिक पिळवणूक, आर्थिक शोषण थांबविले पाहिजे हे समाजवादाचे तत्त्व आहे. लोकशाहीचा देखील आर्थिक समता प्रस्थापित करण्याचा आग्रह आहे. समाजवाद प्रत्येक व्यक्तीला 'व्यक्ति-विकासाची समान संधी' प्राप्त झाली. पाहिजे असे म्हणतो समाजवादाचे एक तत्त्व आहे. लोकशाहीचा देखील 'व्यक्ति-विकासाला समान संधी' हा एक गुण आहे. व्यक्ती-व्यक्तींत कोणत्याही गौण घटकांना महत्त्व देऊन विकासाच्या समान संधीत विषमता निर्माण करणे केव्हाही गैरच. या दोन मुद्दयांना धरून सामाजिक लोकशाही व समाजवाद ह्या दोन्ही गोष्टी 'मानवी कल्याणास' उपयुक्त ठरणार आहेत.

भारतात सद्यःस्थितीत लोकशाहीमध्ये काही उणिवा आणि काही समस्या निर्माण झालेल्या आहेत. त्यात पहिली समस्या अशी की भारतात अजूनही लोकशाहीचे केवळ राजकीय स्वरूप आढळते. सामाजिक लोकशाहीचा भारतात अभाव आढळतो. जीवनमूल्यांपैकी भारतात समतेचा अभाव आहे. मालमत्ता असलेला वर्ग सतत पुढे आढळतो. परंतु गुण-कौशल्य असूनदेखील सामान्य माणूस उपेक्षिला जातो. अजूनही खेडोपाडी हरिजनांवर अत्याचार केले जातात. व विशेष गोष्ट म्हणजे त्याची नुसती आकडेवारी संसदेत मोजली जाते. भारतीय समाजात अजूनही जातीयवादावर भर दिलेला आढळतो. भ्रष्टाचार, लाचलुचपत, वशिलेबाजी, काळा पैसा या गोष्टींचा तर भारतात कहर आहे. आर्थिक विषमता दिवसेदिवस वृद्धिंगत होत असल्याचे आढळून येत आहे. एका बाजूला उंच उंच इमारतीत राहणारा श्रीमंत वर्ग, तर दुसऱ्या बाजूला दूषित पाण्याने भरलेल्या गटाराशेजारी राहणारा वर्ग. ही अजूनही अत्यंत भीषण परिस्थिती आढळून येते. या सर्व गोष्टींमुळे लोकशाही जीवनमूल्ये ही फक्त कागदोपत्री राहिलेली आहेत.

'स्वातंत्र्याचा' विचार करता आजही व्यक्तिस्वातंत्र्य हिरावून घेण्यासारखे धाडसी प्रयत्न केले जातात. उदाहरणार्थ १९ महिन्यांचा आणीबाणीचा काळ. त्याचप्रमाणे समाजातील सत्ता प्राप्त झालेला एक वर्ग. सामान्य वर्गाच्या, सत्ताहीनांच्या जीवनात सर्वच दृष्टिकोणातून पिळवणूक घडवून आणताना दिसतो. त्यांच्या स्वातंत्र्यावर 'मालमत्ता व शारीरिक बल' या दोन घटकांच्या प्राबल्याने घाला घालताना हा वर्ग आढळतो. त्यामुळे प्रथमतः भारतात स्वातंत्र्य, समता, बंधुता ह्या सारख्या तत्त्वांची व्यवहारात निर्मिती होणे आवश्यक आहे.

भारतीय लोकशाहीपुढची दुसरी समस्या अशी की, येथील समाज परिवर्तित झाला पाहिजे. आपणास असे दिसते की आज आपली आर्थिक साध्ये साध्य करून घेण्यासाठी सनदशीर मार्गाचा अवलंब केला जात नाही. प्रत्येक वेळी वैचारिक अभावाने संप, मोर्चे, हरताळ, दगडफेक, नासधूस, जाळपोळ यांसारख्या विविध विघातक मार्गांचा अवलंब करताना जनता आढळते. परवा परवाच पिंपरी, चिंचवड या भागांत घडून आलेले संप, किंवा बिहारमधील परिस्थिती इत्यादी गोष्टींमुळे एकूण अंतर्गत सुरक्षितता धोक्यात येते. त्याचबरोबर या संप-प्रकरणामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम होतो अशा वेळी व्यक्तिविकास दूर राहतो व सरकारची भूमिका देखील ताठर बनते. व त्यामुळे लोकशाही विकसित होऊ शकत नाही.

लोकशाहीपुढील व भारतात जास्त प्रमाणात आढळणारी आणखी एक समस्या किंवा अडचण म्हणजे 'व्यक्तिमाहात्म्य पूजन'. अजूनही एखाद्या व्यक्तीला श्रेष्ठ ठरवून तिची पूजा करणे ह्या गोष्टी नष्ट झालेल्या नाहीत. अशा वेळी तत्त्व बाजूला राहून व्यक्तीच्या पूजनाला महत्त्व येते. यातून हुकूमशाही निर्माण होते. भारतात इंदिरा गांधींना महत्त्व दिले गेले व त्यामुळे हुकूमशाही निर्माण झाली. अशा वेळी या व्यक्तिपूजनाने

'सामाजिक सुख' ही कल्पना बाजूला पडते. एका व्यक्तीच्या हाती संपूर्ण सत्ता जाते. तेव्हा व्यक्तिपूजनाला महत्त्व न देता तत्त्व व राष्ट्रहित या गोष्टींची जपणूक करून लोकशाहीचे यश वाढविले पाहिजे.

भारतीय लोकशाहीत आढळणारी आणखी एक समस्या अशी की येथील नागरिक हा अजूनही अज्ञानी व निरक्षर आहे. तो अजूनही राजकीय दृष्ट्या परिपक्व नाही. अशा वेळी राज्यकर्ता निवडण्यास त्याच्या हातून चूक घडू शकते. त्यामुळे प्रथम त्याचे अज्ञान दूर करणे, त्याला शिक्षित करणे हे लोकशाहीचे कार्य आहे व त्यातूनच लोकशाही यश साधणार आहे.

नागरिकाच्या या अशिक्षित, अपरिपक्वतेप्रमाणेच त्याचे 'दारिद्र्य' दूर करावयास हवे, कारण भेसूर स्वरूपाचे दारिद्र्य हा लोकशाही यशात निर्माण होणारा अडथळा आहे. आज भारतात जवळजवळ ५०% दारिद्र्य आढळते. जी व्यक्ती आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र असू शकत नाही, ती राजकीयदृष्ट्या देखील कधीच स्वतंत्र असत नाही. अशा वेळी मतदान प्रक्रिया सदोष होते. अनेक वेळा अयोग्य व अकार्यक्षम लोकांच्या हातात राज्यकारभार जातो. परिणामी लोकशाही धोक्यात येते.

लोकशाहीची आणखी एक अडचण म्हणजे भारतात असलेल्या विविध पक्षांची बांधणी ही तात्त्विक भूमिकेच्या पातळीवर झालेली नाही. आणि त्यात दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे अजूनही भारतात प्रबळ असा विरोधी पक्ष निर्माण झालेला नाही. तेव्हा प्रबळ अशा विरोधी पक्षाचा अभाव ही एक लोकशाहीपुढील अडचण आहे,

लोकशाहीपुढील या सर्व समस्यांची सोडवणूक भारतीय जनतेने करणे आवश्यक आहे. कारण भारतात लोकशाहीसारखीच राज्यपद्धती नांदू शकणार आहे. या 'सामाजिक लोकशाही' सारख्या जीवनपद्धतीतून 'सामाजिक कल्याणाचे' उद्दिष्ट साध्य होणार आहे तेव्हा 'पुन्हा' एकदा समाजसुधारणा हाती घेऊन 'जयप्रकाशजींचे' 'संपूर्ण क्रांती'चे शस्त्र हाती घेऊन लोकशाही यशस्वी करण्यास पुढे जाणार आहोत. पाहूया कितपत साध्य होते.

---

## बालपण

आठवती दिन सोनियाचे बालपणाचे
रम्य मनोहर किलबिलत्या पाखरांचे
लपंडाव, लगोरी अन खेळ बाहुल्यांचे
चिंचा, बोरे माधुर्य परि त्यांत अमृताचे !
राजकुमारी, राक्षस आणि राजा राणी
गोष्ट ऐकता डोळ्यांत दाटतसे पाणी
पुन्हा पुन्हा ऐकावी वाटे तीच कहाणी
रुंजी घालते कानी आजीची ती गोड वाणी !
श्रावणातली रिमझिम ते ऊन रुपेरी
ओलेल्या अंगातून कोसळत मग पावसाच्या सरी !
भेटतील का बालसवंगडी कधी तरी ?
बाल्य अवतरेल का पुन्हा माझिया दारी ?
गतस्मृतीला देता उजाळा हुरहुर उरी
आठवणींचा फुलोरा फुलला अंतरी !

**कु. पुष्पा सुर्वे** द्वितीय वर्ष, कला

## ही धार आसवांची

ही धार आसवांची ठेव थांबवून
घेता निरोप माझा पाहू नको वळून
बघणार मीही नाही जरि ओढतील डोळे
विसरून जाऊ सगळे जे जे घडोनी गेले
होणार भेट नाही आपुली कधीच आता
भेटीत अर्थ नाही निर्माल्य प्रेम होता
जलराशी संपल्याने होतात मेघ रिक्त
हरवून प्रेम जाता होते जिणेच व्यर्थ
जो हा वियोग झाला ठेवीन मी मनात
जाशील ज्या घरी तू-तेथे रहा सुखात

**एन्. बी. कसावा** प्रथमवर्ष, वाणिज्य

# आपण अणू पाहू शकतो ?

**शितोळे प्र. ब.**
तृतीय वर्ष शास्त्र

विश्वातील प्रत्येक वस्तू अनेक अणूंच्या समूहाने तयार झालेली असते. अशा अणूंचा आकार इतका लहान असतो की अणू पाहणारे एकही उपकरण विसाव्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत अस्तित्वात आले नाही. अणूंचे अस्तित्व क्लाऊड चेंबर, स्पार्क किंवा बबल चेंबर किंवा स्टॅक्स ऑफ न्यूक्लिअर एमल्शन या उपकरणांच्या साहाय्याने ठरविता येई. अलीकडच्या काही वर्षात आपण इलेक्ट्रॉनिक्स आणि इलेक्ट्रॉन दृक्शास्त्र यांच्या मदतीने अतिक्षमताशील उपकरणांच्या साहाय्याने अणू पाहू शकतो.

सतराव्या शतकात ल्यूएन हॉक या शास्त्रज्ञाने सूक्ष्मदर्शकातून डोळ्यांना न दिसणारे लहानात लहान बॅक्टेरिया, प्रोटोझुआ, फंगस यांसारखे जिवाणू पाहिले. उघड्या डोळ्यांनी दिसणारी वस्तू प्रकाश-सूक्ष्मदर्शक यंत्राच्या साहाय्याने पंधराशे ते दोन हजार पट मोठी दिसते. जे लहान कण प्रकाश सूक्ष्मदर्शकातून दिसत नाहीत ते अल्ट्रा मायक्रोस्कोपमधून दिसत. अणू शक्तिमान प्रकाश सूक्ष्मदर्शकातूनही दिसत नाही. कारण, अणूंचा व्यास हा अणूवर पडणाऱ्या प्रकाशाच्या तरंगलांबीपेक्षा लहान असतो. त्यामुळे प्रकाशतरंग अणूपासून परावर्तित होत नाहीत. अणूचा व्यास दोन ते पाच ॲंगस्ट्रॉम असतो. ( १ ॲंगस्ट्रॉम = १०-८ सें. मी. ) आणि प्रकाश लहरींची तरंगलांबी चार हजार ते आठ हजार ॲंगस्ट्रॉम इतकी असते. म्हणून अणू प्रकाशलहरी परावर्तित करू शकत नाही व त्याची प्रतिमा तयार होत नाही. अतिनील किरणांचा उपयोग करून आपण प्रकाश-सूक्ष्मदर्शकातून अतिसूक्ष्म कणही पाहू शकतो. परंतु अशा सूक्ष्मदर्शकातूनही अणू दिसत नाहीत.

एखादा असेही विधान करील की, अणूंच्या व्यासपेक्षा कमी तरंगलांबी असणाऱ्या 'क्ष' किरणे आणि 'गॅमा' किरणे यांचा वापर करून आपण प्रकाश-सूक्ष्मदर्शकातून अणू का पाहू नये ? परंतु 'क्ष' आणि 'गॅमा' किरणांची तरंगलांबी इतकी लहान असते की, ही किरणे अणूंची प्रतिमा तयार करू शकत नाहीत.

विद्युत्परमाणु-सूक्ष्मदर्शकाचा शोध लागल्यानंतर प्रकाश-सूक्ष्मदर्शकाच्या उणिवा नष्ट झाल्या. विद्युत्परमाणु सूक्ष्मदर्शकाची भव्यता प्रकाश-सूक्ष्मदर्शकाच्या चार ते पाच लक्ष पट असते. विद्युत्परमाणु-सूक्ष्मदर्शकामध्ये प्रकाशलहरीं ऐवजी विद्युत्परमाणू किरण समूहांचा वापर करतात. त्यामुळे व्हायरसचा आकार, प्लॅस्टिकचे आणि रबराचे रेणू समूह ही दिसू शकतात. तरी सुद्धा विद्युत परमाणू-सूक्ष्मदर्शकातून अणू दिसत नाही.

काही शास्त्रज्ञांच्या मते विद्युत्परमाणू ऐवजी प्रोटॉन्स, ड्यूटेरॉन्स किंवा अल्फा कण यांसारखे विद्युत्परमाणूपेक्षा हजारो पट जड असणारे कण वापरावेत. जर या कणांना अती गती दिली तर ते लहरीप्रमाणे वाटतात. या कणांची तरंग लांबी विद्युत्परमाणूंच्या तरंगलांबीपेक्षा फारच कमी असते. असे उपकरण अती सूक्ष्म कणांचे फोटोग्राफ्स घेतात. 'आयन फिल्ड एमिशन मायक्रोस्कोप' हे अणूंचा आकार आणि धातूंचा पृष्ठभाग यांचा फोटो घेणारे पहिलेच उपकरण होय. हे सूक्ष्मदर्शक यंत्र १९५६ मध्ये अमेरिकेतील, पेनसिल्व्हानिया या विद्यापीठातील डॉ. एर्विन डब्ल्यू. मूलर यांनी तयार केले. हा सूक्ष्मदर्शक विद्युत्परमाणु सूक्ष्मदर्शकाच्या पाच दशलक्ष किंवा त्यापेक्षा जास्त पट भव्यता देतो. या उपकरणाच्या मदतीने तुंगस्त ( tungsten ) सुईतील अणूंची रचना स्पष्ट दिसू शकते.

फिल्ड एमिशन हा भौतिक परिणाम आहे. या क्रियेमध्ये तीव्र विद्युत क्षेत्राच्या प्रेरणेने विद्युतभारित कण वाहकातून बाहेर टाकले जातात. ही घटना १८९७ साली

निदर्शनात आली होती. परंतु याचे श्रेय डॉ. मुल्लर यांच्याकडे जाते.



आकृती नं १

आयन फिल्ड एमिशन मायक्रोस्कोप दोन किंवा तीन आवरणांचा तयार झालेला असतो. दोन आवरणांमधील पोकळी द्रव हैड्रोजन किंवा नायट्रोजनने भरलेली असते. पात्राच्या तळावर आतून प्रकाशमान अशा संयुगाचे आवरण दिलेले असते. दूरचित्रवाणीच्या चित्रनळीप्रमाणे हे आवरण सूक्ष्मदर्शकाच्या पडद्याचे काम करते. पात्राच्या मध्यभागी टंगस्टन इलेक्ट्रोडचे टोक ठेवलेले असते. या टंगस्टन इलेक्ट्रोडच्या सूचीच्या टोकाची त्रिज्या १०.५ सें. मी. इतकी असते. टंगस्टन सूची द्रव हैड्रोजन किंवा नायट्रोजनमध्ये अर्धवट बुडविली असता ती या द्रवाच्या तपमानाला थंड होते.

प्रथम विद्युतजनित्रापासून ३०,००० व्होल्ट्स इतकी वीज टंग्स्टन आणि प्रकाशित पडदा यांमध्ये निर्माण केली जाते. परंतु टंगस्टन सूचीची त्रिज्या अती लहान असल्यामुळे वस्तुतः विभवांतर एक चौ. सें. मी. ला पाचशे दशलक्ष इतका वाढतो. नंतर एक मायक्रॉन या हवेच्या दाबाने थोडा हेलिअम वायू पात्राच्या तोंडातून आत सोडला जातो.

या दाबामुळे हेलियमचे अणू टंगस्टन सूचीच्या संपर्कामध्ये येतात. व सूचीच्या धन विद्युत्भारामुळे हेलियम अणूनील ऋण विद्युतभारित विद्युतपरमाणू दूर गेल्यामुळे या अणूचे हेलियम आयनमध्ये रूपांतर होते. या हेलियम आयनला अल्फा कण म्हणतात. ऋणविद्युत्-भारित पडद्याकडे हे हेलियम आयन आकर्षिले जातात. त्यामुळे हेलियम गती वाढते.हे गतिमान हेलियम आयन पडद्यावर आदळतात आणि त्यामुळे पडदा प्रकाशमान होतो. टंगस्टन सूचीची पायरी पायरीने स्फटिकांची रचना असते. म्हणून पडद्यावर तयार झालेली प्रतिमाही तशीच उमटते. ही प्रतिमा मूळ वस्तूच्या दोन दशलक्ष पट मोठी असते. पडद्यावर तयार झालेला प्रत्येक प्रकाशबिंदू हा टंगस्टन सूचीच्या ज्या अणूपासून तयार होतो त्या अणूशी संबंधित असतो.

तयार झालेली प्रतिमा भटकत्या हेलियम आयनमुळे विकृत होऊ नये म्हणून टंगस्टन सूचीचे टोक द्रव हैड्रोजन किंवा नायट्रोजनमध्ये थंड करतात. भटकत्या हेलियमचे आयन टंगस्टन सूचीमुळे तयार होत नाहीत तर त्यांच्या गतिज ऊर्जेमुळे तयार होतात. हे भटकते हेलियम आयन पडद्यावर आदळतात आणि निरिच्छित प्रकाश तयार होतो. या निरिच्छित प्रकाशामुळे अणूंची प्रतिमा विकृत होते. परंतु टंगस्टन सूची द्रव हैड्रोजनच्या (–२५२° सें. ग्रे.) तपमानाला थंड केली असता, हेलियम अणूंची गतीत उर्जा शून्य होते. त्यामुळे आयनचे निरिच्छित भटकणे बंद होते. आणि अणूचे चांगले चित्र तयार होते.

# भावनांचा विकास

अलका भालेराव, सुनीता बर्वे,
सुमन चव्हाण, दीपक जोशी,
मेघा भालेराव, नंदिनी मराठे.
तृतीय वर्ष, कला

आपले भावनिक जीवन हा एकूण वर्तनाचा महत्त्वाचा भाग आहे. भावनाविरहित जीवन असू शकत नाही. भावनिक विकास विशिष्ट प्रकारेच होतो असे आखीव-रेखीव नियम दाखवता येत नाहीत. परंतु भावनांचे आल्हाददायक व तापदायक हे दोन ढोबळ प्रकार प्रथम पासून आढळतात, सुखदायक भावनांच्या प्रचीती, आनंद गंमत, आस्था, जिज्ञासा, प्रेम, आकर्षण इत्यादी विविध रूपांमध्ये, तर तापदायक भावनांच्या प्रचिती मत्सर, द्वेष, खेद, दुःख, चीड, संताप इत्यादि रूपांमध्ये विकसित होतात. या विविधतेचे प्रत्यय हा भावनिक विकासाचा एक भाग. या विविधतेतूनच अनेक प्रकारच्या गुंतागुंती निर्माण होतात. भावनांच्या अनुभवातून खोल व गंभीर अशा जीवनदृष्टीची प्राप्ती करून घेणे ही या विकासाची दिशा असते. उद्रेकी किंवा बोथटलेल्या भावनांचा अतिरेक टाळून स्वतःचा तोल राखणे व त्यातूनच भावनिक संवेदनशीलता प्रगल्भ करणे हे या विकासाचे ध्येय असते.

जन्मापासून एक वर्षपर्यंत अनेक बालकांचे निरीक्षण केले असता भावनिक विकासाच्या खालील अवस्था आढळून येतात.

(१) अगदी नवजात बालकात संपूर्ण शरीरातच हालचाल निर्माण होते.

(२) तीन महिन्यांच्या काळापर्यंत या हालचालींना दोन दिशा मिळतात : (अ) सुखद अनुभवदर्शक (ब) तापदायक अनुभवदर्शक.

(३) पाचव्या महिन्यापासून तापदायक भावनांमधील भेद ओळखता येण्याइतके वेगळे आविष्कार दिसतात.

(४) आठव्या महिन्यापर्यंत सुखद भावनांचा अनुभव हवा असल्याचेही दिसून येऊ लागते.

(५) एक वर्षपर्यंत सामाजिकतेतील आनंद परक्या व्यक्तींना मिश्र प्रतिक्रिया, नाखुषी इ. भावना दिसून येतात.

दोन वर्षापर्यंत भावनांचा अनुभव आणि आविष्कार यांच्यावर नियंत्रण नसते. विविधतेत मात्र सतत वाढ होत असते. आईवरचे प्रेम आणि अवलंबून असण्याची गरज व ओढ या गोष्टींना महत्व असते. तीन ते पाच हा कालखंड भावनांच्या अनुभवात व आविष्कारात शिकवणुकीचा परिणाम सुरू होण्याचा कालखंड आहे. प्रथम वाटत नसलेल्या भीती वाटू लागणे, आवडीनिवडी उत्पन्न होणे त्यात फरक होणे या गोष्टी दिसू लागतात. भाषेची कार्यक्षमता वाढल्याने आविष्काराचे एक साधन म्हणून भाषेचा वापर होऊ लागतो.

सहा ते बारा हा कालखंड बरोबरीच्या मुलांमध्ये रमण्याचा असतो, त्यामुळे भावनिक आविष्काराचे व विषयांचे स्वरूप त्या समूहाच्या आधारानेही ठरू लागते. मैत्री, अभिमान इत्यादी गोष्टींचा परिणाम दिसून येऊ लागतो.

बारा ते अठरा हा कालखंड भावनिकदृष्ट्या वादळी कालखंड असतो. कल्पनाशक्ती, बुद्धिमत्ता व शारीरिक परिपक्वता यांच्या विकासाची जवळजवळ पूर्ण उंची गाठली गेल्याने आपले वेगळेपण प्रस्थापित करणे निर्णय शक्ती वापरणे, स्त्रीत्वाची किंवा पुरुषत्वाची जाणीव झाल्यामुळे आकर्षण वाटणे, त्याचप्रमाणे आकर्षून घेण्याची धडपड करणे या सर्व गोष्टी या काळातील भावनिक जीवनात बरीच खळबळ माजवतात. व्यावहारिक जीवनाची जाणीव व झळ यामधून भावी आयुष्याची चिंता त्याचबरोबर काही स्वप्नाळू कल्पनाही या वयात एकदमच अनुभवास येतात.

सर्वसामान्यपणे बालवयातील भावनाविष्कार प्रौढां-पेक्षा वेगळा असतो. बालवयात भावना साध्या व सहज-पणे उद्भवलेल्या असतात. त्या अल्पकाळ टिकतात

आणि अनिर्बंधपणे व्यक्त केल्या जातात. त्यांच्यात सहज बदल होतो.

बालवयातील दोन महत्त्वाच्या तापदायक भावना म्हणजे भीती व राग. या दोन्ही भावना वर्तनावर नियंत्रण चालवतात आणि प्रक्षोभक प्रसंगात पळ काढण्यासाठी किंवा लढण्यासाठी, तोंड देण्यासाठी आवश्यक ती शक्तीही पुरवतात.

अगदी लहानपणापासून बालकाला अनेक प्रकारच्या भीती त्रास देत असतात. तीव्र आवाज, नवी जागा, नव्या व्यक्ती यांची भीती अगदी पाच महिन्यांच्या मुलांमधेही दिसते. पुढेपुढे भीतीचे विषय बदलतात. मुळामध्ये भीती ही भावना प्रत्ययास येते ती अचानक, अनपेक्षित किंवा अगदी नवीन असे उद्दीपन झाल्याने भीतीचा विषय त्याबाबत जो पूर्वानुभव असेल, त्यावरून ठरतो. सहा ते बारा या वयात कल्पित गोष्टींचीही भीती वाटू शकते. काही गोष्टींचीही भीती वाटू शकते. काही गोष्टींची लहानपणी भीती वाटते ती मोठेपणी आकलन वाढल्यानंतर वाटेनाशी होते. काही गोष्टी परिचित झाल्यामुळे भीती कमी होते. मात्र वाढत्या वयाबरोबर व अनुभवाबरोबर भीती संपादन करण्याची प्रक्रियाही घडते. बालकाला जोपर्यंत भविष्यकाळात काय होईल याची जाणीव नसते तोपर्यंत भीती वाटत नाही, परंतु ती समजूत वाढल्यावर मात्र भीती वाढते.

राग ही भावना कोणत्याही वर्तनात अडथळा निर्माण झाल्यास प्रत्ययाला येते. आक्रस्ताळेपणा हे रागाचे उद्रेकी स्वरूप बालवयात आढळून येते. रागाचे आविष्कार आक्रमक वर्तनातून होतात. सात वर्षे वयापर्यंत मुले रागाच्या उद्रेकावर नियंत्रण करावयास शिकतात. नंतर या आविष्काराचे स्वरूप काही वेळा आत्मक्लेश करून घेण्यात परिणत होते. मुलगे अधिक आक्रमक व मुली अधिक आत्मक्लेशी असतात असे दिसते. मत्सर व राग यांचे बालवयात जवळचे नाते असते.

मुलांच्या जीवनात आनंददायक अनुभूतींना मानसिक आरोग्याच्या दृष्टीने फार महत्त्वाचे स्थान आहे. पालकांचे प्रेम, खेळीमेळीचे वातावरण, कौतुक आणि मर्यादित शिस्त व मार्गदर्शन यांनी भावनिक सुदृढतेचा पाया घातला जात असतो. बालवयातील आनंद म्हणजे भावी व्यक्तिमत्त्वाची एकप्रकारे हमीच असते. बालकाला जर आईवडिलांचे प्रेम मिळाले नाही तर ते देखील इतरांवर प्रेम करायला असमर्थ ठरते. अनाथाश्रमातील बालकांच्या अभ्यासातून भावनिक उपासमार किती अनिष्ट असते हे दिसून येते.

मुलांच्या भावनिक आरोग्याची काळजी घेणे हे पालकांचे महत्त्वाचे कर्तव्य आहे. मोकळे वातावरण, सुसंगत वागण्याची पद्धत आणि स्वतःच्या वर्तनात प्रगल्भतेचा आविष्कार याच गोष्टी मुलांच्या दृष्टीने महत्त्वाच्या असतात. याबद्दल काही सर्वसामान्य तत्त्वे आढळतात ती अशी :

(१) मुलांच्या भावनांची दखल घेण्याची व त्यांना आविष्कारासाठी मोकळीक देण्याची गरज आहे.

(२) मुलांसमोर प्रौढांचे वर्तन हे उदाहरण म्हणून असते. उपदेश व उदाहरण यात तफावत असेल, तर उपदेशाचा परिणाम कमी होतो.

(३) मुलांच्या भावनांकडे पालकांनी वस्तुनिष्ठपणे पाहिल्यास मुलांनाही हळूहळू स्वतःवर नियंत्रण ठेवता येते. तेवढा अवसर त्यांना द्यावा लागतो.

(४) मुलांनी भावना दडपण्यात मिळवलेले यश धोकादायक असते. आविष्काराचा मार्ग चुकीचा असला तर त्यावर संस्कार करता येतो.

# ' गेले द्यायचे राहून—'

**मुकुंद संगोराम**
तृतीय वर्ष, वाणिज्य

२६ एप्रिलचा दिवस. ' चिं. त्र्यं. ' ना जाऊन दोन वर्षे कधी संपली हे लक्षात देखील आलं नाही. एखाद्या उत्कट भावगीताप्रमाणे ते आपल्याला चटका लावून गेले आणि भावगीत जसं हां हां म्हणता संपतं पण मनात कायमचं रेंगाळत राहातं तशी आरती प्रभूंची ज्योत सर्व साहित्य रसिकांच्या मनात सारखी तेवत राहिली. आता आपल्या हाती उरलेत फक्त शब्द...की त्यांनीच आरती प्रभूंना श्रद्धांजली वाहायची...' गेले द्यायचे राहून तुझे नक्षत्रांचे देणे। माझ्या पास आता कळ्या आणि थोडी ओली पाने ! '...

पुण्यतिथीचा कार्यक्रम आखणे. रसास्वाद टीका वगैरे कार्यक्रम हे नित्याचेच. त्यांचेही महत्त्व आहेच. परंतु आरती प्रभूंना त्यांच्याच शब्दांनी श्रद्धांजली वाहण्याचा जो कार्यक्रम ' संगीत भास्कर ' चंदावरकर आणि मंडळी यांनी सादर केला तो सर्वार्थाने आगळा, वेगळा आणि अविस्मरणीय झाला.

गोष्ट अशी आहे की भावकविता ही ' भिन्न रुचेर्जनस्य बहुधाप्येकं समाराधनम् ' असू शकत नाही. भावकवितेतील भाव इतके तरल, अमूर्त आणि सूक्ष्म असतात की, त्याचे आकलन खऱ्याखुऱ्या काव्यरसिकालाच होते. आरती प्रभूंना ' ग्रेट कवी ' म्हणणारे सर्वच जण आहेत पण...!

ते जाऊ द्या, तर सांगायचंय हे की, ' नक्षत्रांचे देणे ' या कार्यक्रमाने खानोलकरांचे शब्द, त्यांची प्रतिमासृष्टी, अनुभूती म्हणजे एकूण त्यांची कविता बऱ्याच प्रमाणात ( पूर्णांशाने अर्थातच नव्हे ! ) श्रोते व प्रेक्षक यांच्या अंतःकरणापर्यंत पोचविली हे मात्र निर्विवाद. तेथे श्रोतेही होते आणि प्रेक्षकही होते. कारण हे ' काव्यवाचन ' नव्हते, काव्यदर्शन होते, इंद्रधनुपी रंगातले, कारण त्यात अत्यंत माफक व कलात्मक संयमाने सजलेले नेपथ्य होते, हवी तेवढीच अतिसूचक प्रकाशयोजना होती आणि गायकांमध्ये युवक व युवती यांचा एक डोळ्यात भरण्यासारखा वृंदही होता. प्रत्येक कवितेला सूर, ताल, चाल, लय व अत्यंत संयमाने केलेल्या हालचाली होत्या यामुळे कविता ही श्राव्य असली तरी या इथे ती दृश्य स्वरूपात अवतरली आणि महत्त्वाचं असं की प्रेक्षक–श्रोते या दृश्याच्या मोहात अडकून पडले नाहीत, ते कवितेलाही तितकेच सामोरे गेले.

नक्षत्रांचे देणे हा कार्यक्रमच मुळी श्रद्धांजलीचा भाव घेऊन उभा राहतो. पण तो उभा राहात असतानादेखील त्याची कलात्मक पातळीही प्रयोगदृष्ट्या जेवढ्यास तेवढी ठेवण्याचा अत्यंत संयमित प्रयत्न श्री. चंदावरकरांनी केला, त्यात ते यशस्वीही झाले. आणि म्हणूनच हा जरी श्रद्धांजलीपर कार्यक्रम असला तरी प्रायोगिकदृष्ट्या एक आगळा वेगळा कलात्मक प्रयोग म्हणून त्याचं महत्त्व निश्चितपणे वेगळं आहे.

संगीत व शब्द यांचा सुंदर समन्वय हे या कार्यक्रमाचे लक्षणीय वैशिष्ट्य. मोहन गोखले यानं आपल्या सहज पण परिणामकारक निवेदनात सांगितल्या प्रमाणे संबंध कार्यक्रमात ऐलतीरी आणि पैलतीरी केवळ आरती प्रभूंचेच शब्द होते. साराच वृन्द समूहगानाने सुरूवात करतो... ' गेले द्यायचे राहून तुझे नक्षत्रांचे देणे। माझ्यापास आता कळ्या आणि थोडी ओली पाने ' आरती प्रभूंना ही श्रद्धांजली. पुढे कार्यक्रमात या ओळींचा ' सूत्र ' म्हणून वापर होतो ती ' theme tune ' होते. या ओळी गायल्या जातात...शंकराच्या देवळाच्या गाभाऱ्यात घुमणाऱ्या आवाजात एक तरल, गंभीर वातावरण तयार होते आणि मग कधी एक गायक तर कधी कोरस अशा थाटात एकामागून एक कविता पेश केल्या जातात. संगीतातही धावपळ नाही, प्रदर्शन नाही, स्वरांची व्यर्थ उधळण नाही.

शब्द, त्यामागील भावना आणि कवितेचा आत्मा यांच्याशी इमान राखण्याचा सारखा प्रयत्न करणारं संगीत. जशी बोलपटाबरोबर बरोबर असलेल्या संवादांची रेषा असावी. पण...म्हणावं की म्हणू नये संगीत आणि कविता यांची जुगलबंदी चालली होती.

नेपथ्याबद्दल थोडसं. यातलं वैशिष्ट्य म्हणजे प्रतीकात्मक संयोजना. सौ. मीना चंदावरकर व माधुरी पुरंदरे यांच्या कल्पनेतून अवतरलेली. मोकळा रंगमंच. एका बाजूला तीन हिरवीगार पानं असलेलं झाड. दुसऱ्या बाजूला एक कवटी. मधल्या जागी घड्याळ की ज्यावर वेगवेगळी प्रतीकात्मक चित्रे दाखविण्याची योजना होती. जीवनातील प्रफुल्ल क्षणांचे प्रतीक–झाड. कवटी हे जीवनाला व्यापून राहिलेल्या आणि दशांगुले उरलेल्या मृत्यूचं प्रतीक. काळाच्या तावडीत सापडलेल्या जीवनचक्राचं, जीवनातल्या गतीचं प्रतीक म्हणून मध्यभागी असलेलं घड्याळ. अशी साधारण कल्पना यातच भर म्हणून बाळ मोघे यांची 'अमोघ' प्रकाश योजना, जी योग्य वेळी योग्य तो परिणाम साधून जात होती आणि कवितांना नक्षत्रांचे लेणे देत होती.

या अडीच तासांच्या कार्यक्रमात तीस-पस्तीस कलाकारांची हजेरी होती, आणि सर्वजण कार्यक्रमाच्या विशिष्ट पातळीपर्यंत पोहोचणारेच कलाकार होते. कुणाचीही कुठलीही बाजू कमी पडली असे वाटलेच नाही. यात रवींद्र साठे, श्रीकांत पारगावकर, विजय जोगदंड, चंद्रकांत काळे, माधुरी पुरंदरे, भगवंत कुलकर्णी, सुजाता जोशी, माधवी पळसुळे हे व असेच गायक होते. तर अमोल, अनुया पालेकर, मोहन गोखले, श्रीराम पेंडसे यासारखे गद्य कवितेतून कवितेचे, संगीताचे नेमके प्रेषण करणारे बिनीचे कलाकार पण होते. नावाची यादी देण्यात अर्थ नाही. कारण सगळेच आगळे होते. संगीताच्या दृष्टीने विविध प्रकारच्या चाली, विविध तालांचा वापर, पार्श्वसंगीताचे खरोखरीचे अभिनव प्रयोग.

कोठेही कसलाही गोंधळ होऊ न देता अडीच तासांच्या या मैफलीने 'समाधी' लावली होती. अगदी तांत्रिक वाटणारा पाठांतराचा भाग देखील असाच परिपूर्ण. खरंच आहे, सहभागी कलाकारही खानोलकरांच्यावर जीव टाकणारेच असल्यानंतर हे का होणार नाही? या कार्यक्रमामागे धंदेवाईक प्रेरणा नव्हती. एका कलाकाराने दुसऱ्या कलाकाराला दिलेली ही दाद होती, आत्म्याला आत्म्याने दिलेली ही भेट होती.

**'या माझ्या अजाण कवितेच्या वाटेला जाऊ नका**
**कारण**
**ती ज्या वाटा चालते आहे**
**त्या आहेत तिच्या स्वतःच्या नागमोडी स्वभावातून**
**स्फुरलेल्या**
**मोडून पडला!'**

असे जरी आरती प्रभू म्हणाले असले तरी, रसिक त्यांचं थोडंच ऐकणार? त्यांच्या कविता वाचतच राहाणार,

**'जाहला सूर्यास्त राणी खोल पाणी जातसे**
**दूरचा तो रानपक्षी ऐन आता येतसे**
**कल्पसा काळोख भोती त्यातुनि गावातल्या**
**थेंब जैशा दीपपंक्ती हालती काळ्यानिळ्या**
**पारवा होता तुझा हा स्पंदने का त्यावरी?**
**दूरदृष्टी लागती का का तनू ही बावरी!"**

या ओळी त्यांना वेड लावल्याशिवाय राहतील?

**'तो कुणी माझ्यातला तो घनतमी ठेचाळतो**
**तरीहि मी का चालतो! तो बोलतो ना थांबतो!**

ही शब्दकळा ज्यांना आकळेल ते खानोलकरांच्या त्या धमकीला थोडेच दाद देतील?

**पाना रे पाना तू राहतोस कुठे**
**तू कसे शोधतोस तुझे नेमके झाड!**

असा निरागस प्रश्न विचारणारा कवी,

**संसारात राहून काय झालो,**
**पोराबाळांचा फक्त बाप झालो**
**समाजात राहून काय झालो**
**वृत्तपत्रांचा एक वाचक झालो**

असा जीवनातील तोचतोचपणाचा मर्मभेदी उपहास करणारा कवी. अशी आरती प्रभूंची वेगवेगळी रूपं. नक्षत्रांचे देणे, जोगवा व दिवेलागण या कविता-संग्रहातील कवितांची जी वेगवेगळी रूपं या कार्यक्रमात उपभोगायला मिळाली, तो मनात कायम रेंगाळणारा एक स्मृति-मधुर अनुभव ठरला आहे.

आरती प्रभूंच्या काव्यसृष्टीबद्दल रसग्रहण करण्याचे हे स्थान नव्हे, पण एक मात्र जाणवल्याशिवाय राहात नाही की त्यांची सर्वच कविता नक्षत्रांचे स्वरूप घेऊन अवतरली आहे. नक्षत्रे आकाशात मधून मधून दिसतात, सबंध आकाश व्यापून राहात असतात. खानोलकरांच्या साहित्यात, मग ते नाटक असो, कादंबरी असो की कविता असो–सूक्ष्म तरल उत्कट आणि पारदर्शी भावनक्षत्रांचा फ्लॅश सारखा सारखा जाणवत असतो. तसा तो जाणवतो

–पुन्हा निमाल्यासारखा वाटतो–पुन्हा जाणवतो. पण माझ्यासारख्याने आरती प्रभूंच्या काव्याबद्दल बोलणे म्हणजे पृथ्वीवर उभे राहून नक्षत्रांबद्दल बोलण्यासारखे आहे. असो.

इथं कार्यक्रमाबद्दल. अर्थात ज्यांनी आरती प्रभूंचे थोडे साहित्य तरी वाचले आहे, ज्यांना जाणवले आहे, त्यांनाच हा सर्व कार्यक्रम खऱ्या अर्थाने आकळला–हे उघडच आहे. 'नक्षत्रांचे देणे' ने रंगमंचाच्या क्षेत्रात एका नवीन प्रयोगालाच जन्म दिला आहे. भावकविता दृश्य स्वरूपात रंगमंचावर सादर होते, अडीच तास ती प्रेक्षकांचे कलात्मक रंजन करते, तिला पुरेपूर दाद मिळते ही काही साधी गोष्ट नव्हे. या दृष्टीने हा कार्यक्रम 'माईल-स्टोन' ठरणार. भास्करजींना आम्हा सर्व रसिकांचे शतशः धन्यवाद !

■

---

## नाशिक युवक महोत्सव, १९७८

### सुवर्णपदक विजेती कविता

### पायतळीचे दगड

आम्ही नाही येऊ शकत उंचच उंच
आणि कोण म्हणतं न्या म्हणून
पायतळीचे दगड आम्ही, तिथंच रहाणं पसंत करू.
असे ना का देह फाटका
का म्हणून तुमची उसनी शरीरे ?
आहे ना आग आत्म्याची, जळू त्यासह वर्षोन वर्ष
नाही पसरणार लाचार पायघड्या
तुमच्या रक्तरंजित पावलांसाठी, खुशाल जा मनावरून
तेवढे आम्ही खंबीर आहोत.
उभारू पाहणारे कोवळे कोंब
जळून द्यात उन्हानं
सुकलेले पर्ण तर असतील ना वाऱ्याशी डोलायला ?
अहो जाल तरी कोठपर्यंत
तुम्ही, तुमच्या केलेल्या जगापर्यंत
पुढे, पुढे तर त्याचे राज्य आम्ही आहोत ना तिथं

**विनोद गोडसे** तृतीय वर्ष, वाणिज्य

# छायायुगकवि सुमित्रानंदन पंत

**विदुला काळे**
द्वि. वर्ष साहित्य.

हिन्दी साहित्य का ऐसा कौन रसिक हो सकता है, जो पंतजी का नाम नहीं जानता ? शीतल राका के समान आपकी धवल काव्य-प्रतिभा अपने स्निग्ध, कोमल और मधुर रोशनी से रसिक जनों को मोहित करती थी। हिन्दी पद्य रचना में व्यक्तिनिष्ठ, सौंदर्यवादी तथा चैतन्यवादी काव्य-संप्रदाय का युगारंभ करने में आपका हाथ था। आपकी मृत्यु के साथ इस सौंदर्यवादी छाया-युग का अंत ही हुआ है।

आपका जन्म १९०० में हिमालय की गोद में हुआ था। मगर बचपन में माँ के चल बसने के कारण प्रकृति-देवी ही आपकी 'माँ' बनी थी। वहाँकी उन्मुक्त प्रकृति ने आप जैसे भावुक चंचल किशोर को काव्य-रचना की प्रेरणा दी। 'बाल विहंगिनी' कविता में आपने भोर का बहुत प्यारा वर्णन किया है। आप उस बाल विहंगिनी से कहते हैं-

प्रथम रश्मि का आना रंगिनी
तू ने कैसे पहचाना,
कहाँ कहाँ है बालविहंगिनी
पाया तू ने यह गाना ॥

अंग्रेजी साहित्य से जब आपका परिचय हुआ, तब 'रोमँटिसिझम' के कवियों की ओर आप आकृष्ट हुए थे। खास करके शेली, कीटस आदि कवियों का प्रभाव आपकी रचनाओं पर होने के कारण आपका शब्द चयन तथा ध्वनि सौंदर्य का बोध बढा। बँगला तथा मराठी साहित्य में इसी प्रकारकी रचनाएँ हो रही थीं। आप महाकवि रविन्द्रनाथ ठाकुर की रचनाओं से बहुत प्रभावित हो गए। झरनों-पंछियों के स्वरों में स्वर मिलाकर आप गाने लगे।

'वीणा' पंतजी का सर्वप्रथम काव्यसंग्रह है। इसमें तोतली बोली में एक बालिका का उपहार है जो 'मधुबाला की, मृदु बोली' सा मनोरम है। १९३२ में लिखी। 'नौका विहार' कविता में आपने ग्रीष्म में क्षीण हुई गंगा नदी का तथा चाँदनी रात का किया हुआ वर्णन बडा ही सुन्दर है। आप कहते हैं-

'शांत स्निग्ध ज्योत्स्ना उज्ज्वल
अपलक अनंत नीरव भूतल
सैकत शय्यापर दुग्ध धवल
तन्वंगी गंगा ग्रीष्म विरल
लेटी है श्रांत क्लांत निश्चल'

यही कारण है कि पंतजी 'प्रकृति के कवि' कहलाते है। 'संध्या के बाद' कविता में आपने इसी प्रकार का सुंदर चित्र शब्दों में निबद्ध किया है। साँझ के सूरज की किरणों को आप 'निझर' कहते है—

'सिमटा पंख साँझ की लाली
जा बैठी अब तरुशिखरों पर
ताम्रपर्ण पीपल से शतमुख
झरते चंचल स्वर्णिम निर्झर !'

'सावन भादो' कविता में तो आप अपने गीतोंद्वारा रसिकों के चित्त को भिगोते हैं। आप प्रकृति से इतना प्रेम करते है कि आपकी प्रेयसी भी इससे ज्यादा आपको मोहित नही कर पाई हो। यह प्रकृतिवर्णन 'छायावादी' ढंग का है।

मगर आप केवल प्रकृति के कवि नहीं हैं, वेदना व निराशा के भी हैं। इसीलिए तो आपने कहा है—

'वियोगी होगा पहाल कवि, 'आह' से उपजा होगा गान।'

'गुंजन' में आप अंतर्मुख बने हैं। इसलिए आप जन्म में मृत्यु और वसंत में पतझड़ के दर्शन करने लगे। फिर 'छायावाद' से 'बुद्धिवाद' की ओर आप मुड़ गए। चिन्तन का प्राधान्य रचना में होने के कारण

आपका अपूर्व भावात्मक काव्य सौंदर्य कहीं खो-सा गया।

समयानुकूल रूप लेना आपकी कविता की विशेषता थी। इसकी वजह से मार्क्सवादी विचारों को लेकर आपने 'प्रगतिवादी' रचनाएँ कीं। 'युगान्त' में प्रगतिवाद का प्रारंभ, तथा 'युगवाणी' में उसका विकास है। 'ग्राम्या' में आपने भारत के ग्रामों का चित्र प्रस्तुत किया है। आप अब अलंकारों के प्रति, छंदों के प्रति उदासीन बने थे। 'भारत-माता' कविता में आपने भारत की अवस्था का, दुर्दशा का चित्रण किया है। पुरानी रूढियों को आप दूर हटाना चाहते हैं। 'ताजमहल' कविता में आप कहते है—

'हाय! मृत्यु का कैसा अमर अपार्थिव पूजन,
जब विषण्ण निर्जीव पडा हो
जग का जीवन।

इस प्रकार के विचारों के कारण आप एक 'चिंतन वादी तथा प्रगतिवादी' कवि कहे जाने लगे। आपने प्रगतिवाद को उपयोगितावाद मानकर छायावाद का खण्डन किया।

१९४३ के समय आप पॉंडेचरी में योगी अरविंद घोष से मिले। इस परिचय का परिणाम आप की रचनाओं पर हुआ। प्रगतिवाद आपको संतोष नहीं दे सका था। आपने स्वर्णकिरण, 'स्वर्ण धूलि' आदि काव्य संग्रहों में उच्च सांस्कृतिक आंदोलन को मानव कल्याण के लिए आवश्यक मानकर उसका विवेचन किया। इसी चिंतन से 'लोकायतन' महाकाव्य की निर्मिति हुई।

आप प्रधानतः कलाकार थे। इसीलिए संगीत और साहित्य का कलापूर्ण सुन्दर समन्वय आपके काव्य में मिलता है। आपकी कोमलकान्त माधुर्यपूर्ण पदावली का निखार 'गुंजन' तक मिलता है। इसके बाद बुद्धिनिष्ठ प्रगतिवाद के कारण वह काव्य सुंदर नहीं बन सका। भावपक्ष के प्रति आप उदासीन बन गए। तथापि खड़ी बोली को काव्य के उपयुक्त ललित बनाने में आपका बडा सहयोग है। गुप्तजी ने खडी बोली को प्रतिष्ठा दी तो आपने उसे श्रृंगारित किया।

१९३५ के बाद की गिनीचुनी रचनाओं के 'चिदम्बरा' काव्य संग्रह ने आपको ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त करा दिया। मगर आलोचक कहते हैं कि आपकी बहुतसी अध्यात्म-वादी तथा समाजवादी रचनाएँ मर्मस्पर्शी नहीं हैं। फिर भी इससे आपका महत्त्व कम नहीं होता।

६० वर्षोंसे अधिक समय तक पद्य साहित्य के नभ में निरंतर चमकनेवाले इस नक्षत्र के आगे रसिक नतमस्तक होते रहेंगे।

★

# जीवन दर्शन

**प्रभाकर वडणे**
प्रथम वर्ष कला

जीवन एक चुनौती है — उसे स्वीकार करो।
जीवन एक संघर्ष है — उसका सामना करो।
जीवन एक कर्तव्य है — उसे पूरा करो।
जीवन एक खेल है — उसे खूब खेलो।
जीवन एक गीत है — उसे गाते रहो।
जीवन एक अवसर है — उसका उपयोग कर लो।
जीवन एक स्वप्न है — उसे साकार करो।
जीवन एक यात्रा है — उसे पूरा करो।
जीवन एक स्नेह है — उपयोग करो।
जीवन एक सौंदर्य है — उसकी प्रशंसा करो।
जीवन क्षणभंगुर है — उसका मूल्य समझो।
जीवन एक प्रतिज्ञा है — उसे पूरा करो।
जीवन एक वरदान है — उसे ग्रहण करो।
जीवन एक पीडा है — उसे सहन करो।
जीवन एक पहेली है — उसे बुझो।
जीवन एक साहसिक कार्य है – उत्साह से करो।
जीवन एक चक्र है — गतिमान रहो।

★

# मानव्य शाखा की जय !

**अनुराधा पेंद्राम**
द्वितीय वर्ष कला

**महाविद्यालयों में मानव्य ( आर्टस ) शाखा की जो हालत है वह किसीसे छिपी नहीं। ऐसा क्यों ? क्या इस शाखा में ही कोई खोट है ?......इस लालित्यपूर्ण निबंध को पढिए।**

इतवार का दिन था। संध्या का समय। बाहर का वातावरण कैसा रंगीन था। नीले, पीले, गेरुए बादल पश्चिम दिशा को सुशोभित कर रहे थे। पंछियों का मधुर शब्द जी की कली को खिला रहा था। भला ऐसे समय पर क्या घर में बैठा जाएगा। मैं अपनी बहन के साथ घूमने निकली। हम पार्क गए। बच्चों के झूलेवाले स्थान के समीप बैठ गए। दिल कह रहा था कि जाऊँ और झूले पर पेंग लगाऊँ। मगर हाय ! बचपन तो पंछी की तरह उड़ गया है। अब मैं कॉलेजिनी बनी हूँ ! जयशंकर प्रसाद की पंक्ति याद आई–'वे कुछ दिन कितने सुंदर थे !'

और लो ! बचपन का नाम लेते ही मेरी पुरानी बाल्य-सखी मेरी ही तरफ आती हुई दिखाई दी। इतने वर्ष यहाँ छिप गई थी। "अरी सुजाता। कहाँ मर गई थी ?" उसने बताया कि मैं छठी कक्षा के बाद दूसरे गाँव गई थी और एस. एस. सी. में छिहत्तर प्रतिशत अंक लेकर पास हुई और– "और अब तू शास्त्र शाखा की विद्यार्थिनी है। यही न !"

"अरी तूने कैसे पहचाना ? क्या फेसरीडिंग का अभ्यास कर रही आजकल ?"

"इसके लिए मुद्राज्योतिष की क्या जरूरत ? यह तो एक नियम ही है कि जिसे ६०-७० प्रतिशत के ऊपर अंक मिलते है वह कॉलेज में शास्त्र का विद्यार्थी बन जाता है और जिसे ५० या ६० प्रतिशत के ऊपर अंक मिलते हैं वह वाणिज्य शाखा की तरफ जाता है।"

"यानी यह कहो न कि तुम मानव्यशाखा की तरफ गई हो और..."

"ना ना, मैं मानव्य की विद्यार्थिनी तो हूं लेकिन मैने भी एस. एस. सी. में पैंसठ से ज्यादा प्रतिशत अंक पाए थे।"

"अच्छा ! तब तो तुमने बडी मूर्खता की कि मानव्य की ओर गई। क्या रखा है उस मानव्य में ? क्या होगा उसकी पढाई करके ?"

"सरासर मूर्खता ! हाँ भई, ठीक भी है। आजकल जो उठता है मानव्य को गालियाँ देता है।"

"क्यों न दे ? बताओ, मानव्य सीखकर तुम्हे क्या मिलेगा ? नौकरी मिलेगी ? सम्मान मिलेगा ?"

"तुम्हें क्या मिलनेवाला है, यह तो सुनूँ।"

मैं एक तरफ उसके साथ बातें कर रही थी और मन में सोचती भी जाती थी। बेचारी किस नीरस भावनाहीन क्षेत्र में कूद पडी है। मुझे याद आया। स्कूल में उस छोटी उम्रमें भी यह सुंदर कविताएँ करती थी। जब देखो ग्रंथालय में अपना फुरसत का समय काटती थी। किंतु सब छोडछोडकर अब सुबह से शामतक प्रयोगशाला में मरखप रही है। जहाँ हम सुंदर कहानियाँ, उपन्यासों, कविताओं और इतिहास, भूगोल, अर्थशास्त्र की जीवंत बातों का रस लूटते हैं वहाँ ये यांत्रिक उपकरणों के साथ नीरस, आनंदहीन चेष्टाएँ करते हैं। इधर हम इतिहास के महान व्यक्तियों के संपर्क में आते हैं तो ये प्रयोगशाला में चूहों और मेंढकों काटने में व्यस्त रहते हैं।

सुजाता ने बेहिचक मुझे मूर्ख की उपाधि दे दी थी। मैं जानना चाहती कि वह आगे क्या बनना चाहती है ? सुजाता ने झट से जवाब दिला कि हम सायन्स के लोग मेडिकल और इंजीनियरिंग की तरफ जाते हैं और आर्टस ग्रेज्युएटों को नौकर रख लेते हैं।

मैंने कहा, "मनोराज तो तुम्हाला अच्छा है। लेकिन

वह मनोराज है। क्या सब के सब वैद्यक और अभियांत्रिकी में प्रवेश पा सकते हैं ? "

सुजाता–" सब नहीं पाते हों। लेकिन शास्त्र को पढ़े बिना वहाँ कैसे जा सकते हैं ? "

मैं–" तुम सवाल को टाल रही हो। और जो तुम्हारी दशा है वही वाणिज्यवालों की भी है। समझी ? "

सुजाता–" अनुराधा, तुम्हारे कहने से क्या होता है ? यह बताओ कि देश को आज कौन चला रहा है ? हमारी रेलगाडियाँ, हमारे कारखाने, हमारी बँक्स, बड़ी बड़ी इमारतें, पुल, बांध ( डॅम्स ) ये सब कौन बनाता है ? यहाँ तुम्हारी कहानी और कविता काम नहीं आती। "

